## "आजच्या हिंदु जीवनांतील ध्रुववस्तीचे अवशेष" या पुस्तकाचा

# उपोद्घात

'The Knowledge of History of the society is obtained from two sources. One is the study of words and usages which in existing social organization are evidently survivals from an ealier time.........To peruse the details of such study, the student must acquaint himself with the researches of Folklore, Philology, Archaeology and Ethnology.' *

Prof. Gidhings—Sociology p. 254.

यूरोपखंडांत उपलब्ध असणाऱ्या पौराणिक कथांचें निरीक्षण करून त्यांवरून आज तेथें नांदणारी आर्यांची शाखा एके काळीं ध्रुवप्रदेशावरून तेथें येऊन राहिली असावी अशा प्रकारची विचारप्रणाली कांहीं संशोधकांनीं जगापुढें मांडण्याचा प्रयत्न केला. कदाचित् हा त्यांचा प्रयत्न नुसता प्रयत्न या नांवानेंच लोकांस ज्ञात राहून त्यास सिद्धांताचें स्वरूप प्राप्तहि झालें नसतें. परंतु या गाथाशास्त्राच्या आधारें उभारलेल्या शोधाला भूस्तरशास्त्राचा दुजोरा मिळाला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत भूस्तरशास्त्रांत झालेल्या प्रगतीनें त्यापूर्वी प्रचलित असलेल्या एतद्विषयक ज्ञानांत व कल्पनांत जवळ जवळ क्रांतिच घडवून आणली. आज बर्फानें अच्छादित असणारा निर्जन असा ध्रुवप्रदेश एके काळीं सुंदर हवामानाचें फळाफुलांनीं गजबजलेलें नंदनवन होतें व त्या नंदनवनांत आतां अयनप्रदेशांत विपुलपणें असणारे प्राणी व वनस्पति सरांस वाढत होते असा निर्वाळा भूस्तरशास्त्रवेत्ते देत आहेत. आणि त्याबरोबरच तें एके काळचें नंदनवन उद्ध्वस्त होऊन तेथील वनस्पति व प्राणिसृष्टीची धांगाधांग होण्याचें कारणही त्यांनीं शोधून काढिलें आहे. तें म्हणजे हिमप्रलय.

शास्त्रज्ञांत हिमप्रलय कधीं झाला याबद्दलच्या कालगणनेंत मतभेद आहेत. तसेंच हिमप्रलय एकदां झाला कीं अनेकदां झाला याबद्दलहि मतभेद असला तरी ध्रुवप्रदेशाच्या वसाहतीची धाताहत हिमप्रलयामुळें झाली हा शोध

---

* Rhys:—Hibbert Lectures on Cattic Heathendom.

१. —टिळक आर्यलोकांचें मूळस्थान पान २८६

२. Geikie:-Fragmenta of Earthlore. p. 266.

सर्वसामान्य आणि सर्वमान्य आहे. या हिमप्रलयामुळें पृथ्वीच्या हवामानांत फरक पडून तें अधिक थंड होऊं लागलें व उत्तरगोलार्धातील प्राणी उत्तरेकडून दक्षिणेकडे म्हणजे शीतकटिबंधांतून उष्णकटिबंधाकडे जाऊं लागले आणि मूळचे उष्ण कटिबंधांतील प्राणी व वनस्पति अधिकांश नामशेष झाले.

जगांत आज प्रमुखपणें मिरविणाऱ्या आर्यवंशाचा पाळणा या उत्तरध्रुव-प्रदेशांत आणि तोहि हिमप्रलयापूर्वी हलवला गेला असें कित्येक विद्वान् मानतात, तर कांहींच्या मतें या पाळण्यांतूनच पृथ्वीच्या पाठीवरील अखिल मानवजातीच्या संसाराला सुरुवात झाली असें आहे.

यूरोपियन विद्वानांच्या या गाथाशास्त्रावर ( Mythology ) उभार-लेल्या व भूस्तरशास्त्रावर (Geology) आधारलेल्या शोधाला हिंदुस्तानांतून एक मोठा दुजोरा मिळाला. कै. लो. मा. बाळ गंगाधर टिळक यांनीं आपल्या Arctic Home in the Vedas या ग्रंथानें वेद व इतर प्राचीन वैदिक वाङ्मय आणि त्याच्याच तोडीचे पारशांचे आवेस्तादि धर्मग्रंथ यांतूनही या ध्रुववसतिस्थानाच्या सिध्दांताला कशी पुष्टि मिळते हें दाखवून दिलें. त्यानंतर एक पाऊल आणखी पुढें टाकण्याचा प्रयत्न करून मला असें दाखवावयाचें आहे कीं आर्यांच्या ध्रुववसतिस्थानाचे पुरावे नुसत्या वेदादि प्राचीन संस्कृत ग्रंथांतच आहेत असें नाहीं. तर हिंदूसमाजाच्या आजच्या जीवनांतहि ते उत्सव, सण, विधि, म्हणी, गाणीं, गोष्टी व समजुतींच्या विविध बुरख्यांखालीं ठळकपणें जीव धरून आहेत.

वेदादि प्राचीन संस्कृत ग्रंथांत उत्तर ध्रुव आहे म्हणजे ओघानेंच ज्यांचे ते धर्मग्रंथ आहेत ते लोकहि एक वेळ ध्रुवावरच रहाणारेच होत हें ठरतें. आणि यामुळें भारतीय आर्यांची शाखा हीसुध्दां एके काळीं ध्रुवावर रहात असावी, असें निष्पन्न होतें. कारण वेदांचा सांभाळ ब्राह्मणांनीं प्राणापलीकडे केलेला आहे. लोकांनीं ते चोरूं नयेत, त्यांत बदल होऊं नये, त्यांचा विसर पडूं नये यासाठीं त्यांनीं अनेक विधिनिषेधांचें कांटेरी कुंपण निर्माण करून आपल्या असामान्य धर्मनिष्ठेचें आणि पुराणप्रियतेचें प्रत्यंतर जगाला पटवून दिलें.

वेदाचें अक्षरच काय पण कानामात्रांतही बदल न होऊं देण्यासाठीं डोळ्यांत तेल घालून जपणारा समाज आपले इतर आचारविचार आणि कल्पना यांचे बाबतींत भरमसाट धरसोड करणारा आणि नेहमीं नव्याचे मागें

---

१. Giekie:—Geology p. 395

२. Warren:—Paradise found or the Cradle of the Human Race at the North pole.

घाव घेणारा होणें स्वभावतः शक्य नाहीं. मग असा एक प्रश्न विचारावासा वाटतो कीं, जर हिंदूंच्या वेदांत ध्रुव दिसतो तर तो त्यांच्या जीवनांत कुठें तरी आढळला पाहिजे. यूरोपांतील लोकांचें ध्रुवविषयक वसतिस्थान दर्शविण्याला त्यांच्या जवळ वेदांसारखे प्राचीनतर ग्रंथ नव्हते. त्यांच्या चालीरिती, समजुती आणि दंतकथा यांतूनच त्यांना या सिद्धांतापुरता पुरेसा मालमसाला मिळूं शकला.

जर त्यांच्या रितीरिवाजांतून अशी प्राचीन परंपरा सिद्ध होऊं शकते तर जी गोष्ट वेदादिधर्मग्रंथांमुळें सिद्ध झाली आहे; तिला नुसता टेंकू देण्याइतकेहि धागेदोरे हिंदूजीवनांत जीव धरून राहूं शकले नाहींत असें म्हणणें म्हणजे हिंदूंचे आचारविचार व उच्चार हे मुळींच इतिहासगर्भ नाहींत असेंच समजावें लागेल.

लोकमान्य टिळकांना या गोष्टीची जाणीव असल्यानें त्यांनीं वेदांतून पुरावे पुढें मांडतांना विवेचनाच्या ओघांत कुंभकर्णाची दीर्घ निद्रा, दक्षिणायनांत मृत्यूचा निषेध वगैरे प्रस्तुत काळीं समाजांत आढळणाऱ्या तदनुषंगिक गोष्टींचाहि आपल्या ग्रंथांत निर्देश करून ठेविला आहे. वस्तुतः वेदांतील प्रमाणांच्या मानानें त्यांचें मूल्य हिशेबीं धरण्याजोगें नसलें तरी एकंदर विषयाला अनुकूल स्वरूप प्राप्त होण्यांत त्यांचा थोडासा वांटा आहे हें कुणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं. तशांत अशा वेद-निरपेक्ष गोष्टी स्वतंत्रपणें पुढें मांडल्या तर त्यांना स्वतंत्र मूल्य प्राप्त होऊन समाजाच्या एका अज्ञात अंगावर त्यायोगें प्रकाश पडण्यास मदत होईल.

असा विचार करूनच प्रस्तुत लहानशा पुस्तकांत संग्रहित केलेल्या गोष्टी जगापुढें मांडण्याचा उपक्रम मी करीत आहें. अर्थात् माझें हें कार्य म्हणजे टिळकांनीं या विषयावर भरलेल्या जहाजांत अर्धी सुपारी टाकण्यासारखें आहे. तथापि त्यांच्या हयातींत जर हें कार्य घडतें तर ती ज्या क्षेत्रांतून मी मिळविली त्या क्षेत्राच्या नाविन्यामुळें त्यांनाहि आपण दाखविलेल्या दिशेनें प्रयत्न होत आहेत असें पाहून आनंद झाला असता. असो.

ध्रुववस्तीचे अवशेष म्हणून मी कांहीं म्हणी, गाणीं, गोष्टी, वाक्प्रचार आणि विधि यांची एक मोटच बांधली आहे. ती मोट बांधतांना ते अवशेष आज टिकून आहेत याबद्दल पूर्ण खात्री करूनच मग त्यांवर लेखणी उचलली आहे. बारा कोसांवर भाषा बदलते व रितीरिवाजहि बदलतात; यासाठीं मी उपयोगांत आणलेल्या सर्व गोष्टी हिंदुस्तानांतील सर्व हिंदुसमाजांत निरपवादपणें अस्तित्वांत आहेत असा कोणींहि ग्रह करून घेऊं नये. उलट खास खानदेशांतील भाषेचे भिन्न प्रकार आणि भिन्न चाली यांचें चांगलें प्रदर्शन

आढळून येतें; तेव्हां मी सांप्रत ज्या भागांत राहातों आणि जेथील हिंदूंच्या जीवनांचें मी जवळून निरीक्षण करूं शकलों त्या विवक्षित हिंदू जीवनांतीलच हे अवशेष आहेत व अशा अर्थांचेंच मर्यादित नांव या पुस्तकास द्यावयास पाहिजे होतें असेंहि एकदां वाटतें. परंतु त्यांत शास्त्राज्ञा म्हणून येणाऱ्या पंचकाचे विधि, संक्रांतीसारखा अखिल भारतीय सण, शयनी आणि प्रबोधिनी एकादशी, वगैरे कांहीं गोष्टींवर तर सर्व हिंदुमात्रांचा सारखाच हक्क आहे हें पाहून ती मर्यादा घातली नाहीं.

माझ्या या प्रयत्नांत इतिहासाचीं साधनें या दृष्टीनें विधींच्या तपशिला-बरोबर भाषेलाहि मी फाजील महत्त्व दिलें आहे असा कांहीं वाचकांचा समज होण्याची मला भीति वाटते. परंतु इतिहासाचें साधन म्हणून भाषेचें महत्त्व किती मोठें आहे याचा थोडासा विचार व्हावयास पाहिजे.

'वर सांगितलेल्या (इतिहासपूर्व) कालाचा इतिहास जमविण्यास जीं आतांपर्यंत साधनें उपलब्ध आहेत त्या साधनांमध्यें भाषाशास्त्र अधिक महत्त्वाच्या अधिक पायऱ्या सांगेल अशी आमची समजूत आहे. शरीरलक्षणें कांहीं पुरावे देईल आणि अत्यंत प्राचीन कालापर्यंत देखील संशोधकास नेईल; तथापि मनुष्याचीं परिभ्रमणें आणि विविध कालचे त्याचे समुच्चय यांवर प्रकाश पाडण्यास शरीरलक्षणशास्त्र असमर्थ आहे. आजच्या पुराव्या-वरून कोणत्या गोष्टी अधिक कालपर्यंत टिकतात आणि कोणत्या गोष्टी कमी कालपर्यंत टिकतात हें पाहिलें पाहिजे, आणि त्यावरून कोणत्या पुराव्यास महत्त्व द्यावयाचें हें ठरविलें पाहिजे. आम्ही भाषाशास्त्रास फार महत्त्व देतों.' (पृष्ठ १५ प्रस्तावना खंड ३ ज्ञानकोश)

यानंतर दुसरा आक्षेप असाहि येण्याचा संभव आहे कीं मराठीसारखी सुसंस्कृत व वाङ्मयसमृद्ध भाषा अवगत असतांना ध्रुवप्रदेशाच्या शोधासाठीं अहिराणी सारख्या निर्ग्रंथ आणि अप्रगल्भ भाषेंतील म्हणी, गाणीं व गोष्टींची कांस धरावी लागते यांतच कांहींतरी पाणी मुरतें. परंतु यावरहि असें उत्तर देतां येईल कीं मराठीचा त्या दृष्टीनें उपयोग होणें अशक्य नाहीं. परंतु प्रगतिपर समाज आपलीं विविध अंगें इतकीं झपाट्यांत आणि बेमालूम बदलतो कीं त्यांत जुनें शोधणें फार जड जातें; तर मागासलेल्या समाजांत ठळकपणें जर कांहीं दृग्गोचर होत असेल तर तें जुनें जीवनच होय. 'जेथें लोकांचें समुच्चय रूपानें अस्तित्व आहे तेथें भाषा टिकते.' 'विसदृशाशीं संबंध आला म्हणजे भाषेचा लोप एकाएकीं होत नाहीं हें अनेक राष्ट्रांच्या इतिहासावरून दिसतें. भाषेची वाढ खुंटली असेल पण भाषा नष्ट होत नाहीं.'[1]

---

1 ज्ञानकोश प्रस्तावना खंड ३ पान १५

कै. इतिहासाचार्य राजवाड्यांनीं पूर्ववैदिक शब्द मिळविण्याच्या हेतूनें वारली वगैरे डोंगरी लोकांचीं गाणीं संग्रहित केलीं आहेत. तेव्हां आज अहिराणी, मराठीचेंच एक प्रादेशिक रूप आहे कीं काय असा संशय उत्पन्न होण्या इतक्या निकृष्ट अवस्थेत असली तरी तिच्यांत प्राचीन शब्द सांपडणार नाहींत असें म्हणण्याचें धाष्टर्य करतां येणार नाहीं.

'हाड्या उन्नाण' या प्रकरणांत मी हाड्या म्हणजे कावळा हा शब्द प्राचीन म्हणून धरून चाललों, हें वरवर पाहणारांस जरा चमत्कारिक वाटेल. परंतु त्याची फोड करून हें पटवितां येणें शक्य आहे. तो शब्द दोन शब्दांचा समास आहे. जसें– विह + ग = विहग; नृ + प = नृप; ख + ग = खग तसाच हा + ड्या; वि + ह = विह = आकाश. यापैकीं मी वि + ह या शब्दांतील दोन्ही घटकांचा अर्थ निरनिराळा दिला तर वि = विशेष आणि ह = उंच आणि दोघे मिळून विशेष उंच म्हणजे आकाश. आणि त्या 'विहला' 'ग' लावला म्हणजे पक्षी असा अर्थ होतो. हाड्या हा शब्द संस्कृत नाहीं, मराठी नाहीं; तथापि त्याचे घटक 'हा' आणि 'ड्या' हे अनुक्रमें 'विह' यामधील 'ह' व 'डी', डय उडणें यांतील 'डी' यांचे सहोदर आहेत हें नाकबूल करतां येणार नाहीं. इंग्रजी हाय् ( High ) मध्येंहि हा 'ह' ठळकपणें दिसूं शकतो. तेव्हां ओघानेंच म्हणावयाचें म्हणजे हाड्या हा शब्द जुनाट पूर्व वैदिक भाषेचा एक दुर्मिळ अवशेष आहे आणि त्याचें विशेष महत्त्व, त्या जुनाट पूर्ववैदिक भाषेचें संस्कृतीकरण होतांना तिच्यांतल्या ज्या आधिकांश शब्दांना प्रवेश मिळाला तसा याला न मिळतां तो जुन्या स्वरूपांतच जिवंत राहिला हें होय.

मराठींतही एक शब्दप्रचार ध्रुववस्तीशीं सुसंगत दिसतो. 'उदो' 'उदो' म्हणजे 'उदय' 'उदय' प्रमुख अर्थ उगवणें व पुढें मानमान्यता होणें वगैरे. देवीच्या संबंधांत त्याचा उपयोग होतो; हें सर्वविश्रुतच आहे. उदो बोला नवचंडिकेचा! उदो बोला आंबाबाईचा! देवीचा उदय होणें म्हणजे उगवणें याचा निष्कर्ष, आर्यांच्या प्राचीनतम उषादेवतेंतूनच सांप्रतच्या नवचंडिका, अष्टादशभुजा, अष्टभुजा, नवभुजा वगैरे देवींचा उद्भव होण्यांत झाला हें दाखवतो. व भिन्न भिन्न ठिकाणांच्या उषांच्या दिवसांची मर्यादाच त्यांच्या भुजांच्या संख्येत संकेतरूपानें व्यक्त करण्याचा हेतु दिसतो, हें म्हणणें सयुक्तिक नाहीं असें मला वाटत नाहीं. कारण उषा ही ध्रुवप्रदेशमूलक देवता आहे.

---

१ संशोधक त्रैमासिक वर्ष ४ अंक ३ पान ११९

२ टिळक:— आर्य लोकांचें मूळस्थान प्रकरण ५

ध्रुवप्रदेशावर दिसणारी वस्तुस्थिति आणि तिची यथार्थ निदर्शक शब्दसृष्टि ही घडी ध्रुवप्रदेश सोडल्यानंतर विसकटली गेली. नव्या वस्तुस्थितींत माणूस आला परंतु तिचें आकलन करून व्यक्त करणारी भाषा ही मूळची ध्रुवप्रदेशनिष्ठ असल्यानें या नव्या जगांत नवी भाषा किंबहुना परिभाषा निर्माण होईपर्यंत काळ लोटला; आणि मनुष्यानेंही जुन्या शब्दांवरच नव्या कल्पना व्यक्त करण्याची कामगिरी आरंभिली. याचा परिणाम भाषेच्या शब्दांवर अर्थाचे थर बसले. कांहीं थर स्थानांतरामुळें तर कांहीं कालांतरामुळें एवंच प्रत्येक थर हा मानवांच्या प्रगतीचा आणि परिभ्रमणाचा द्योतक झाला. मात्र त्याची संगति लावतां आली पाहिजे. माझी अशी ठाम समजूत आहे कीं, हिंदुस्तानांतील भिन्न भिन्न भाषा व रीतरिवाज यांचा सूक्ष्म अभ्यास झाला तर भारतीयांच्या भूतकाळावर पुष्कळच प्रकाश पाडतां येईल.

माझें लक्ष्य या विषयाकडे कसें लागलें हें सांगणें येथें अप्रस्तुत होईल असें वाटत नाहीं. मराठी साहित्यसंमेलनानें अहिराणी व मराठी या भाषांचें नातें ठरविण्यासाठीं एक समिति नेमून त्या समितीनें अहिराणी भाषेविषयीं कांहीं प्रश्न जाहीरपणें विचारिले. त्यावरून त्या भाषेचें मौलिक साहित्य जमविण्याची मला स्फूर्ति झाली. या भाषेंत लेखन कधीं झालें नाहीं म्हणून तिचें वाङ्मय म्हणी, गाणीं व गोष्टी, यांपेक्षां जास्त विकास पावूं शकलें नाहीं व आहे तेंहि कंठस्थ. अशा स्थितींत ऐकूं येतील तेथें मी म्हणीं व गाणीं उतरून घेण्याचा क्रम सुरू ठेवला. श्रावणांतील कानबाईच्या सणांत घरोघर रोटाचे गहूं दळण्याचें काम सुरू झालें म्हणजे त्या वेळीं गाण्यांनीं सर्व आळी गजबजून जाते. तेव्हां त्या प्रसंगाच्या तयारीनें मी लेखनसाहित्य घेऊन बसलों व गाणीं उतरून घेऊं लागलों. त्या गाण्यांत एक गाणें सहा महिन्यांच्या रात्रीचें होतें. टिळकांनीं 'आर्क्टिक होम' मध्यें उल्लेखिलेल्या ६ महिन्यांच्या कुंभकर्णाच्या निद्रेप्रमाणें आणखी असे दोन समज खानदेशांत प्रचलित आहेत तेंहि आठवले. वेरूळचीं लेणीं व प्रकाशाचीं देवळें सहा महिन्यांच्या रात्रींत बांधलीं गेलीं असा एतद्देशीय लोकांत समज आहे. यांच्या जोडीला आतां आणखी संक्रांतिपटांत नमूद केलेला संक्रांतीच्या आगमनाबरोबर उजाडणारा देवाचा सहा महिन्यांचा दिवसहि नजरेपुढें येऊं लागला. म्हणजे सामान्य खानदेशी माणसाला सहा महिन्यांच्या रात्रीचें चार प्रकारांनीं नकळत ज्ञान होतें असें आढळलें. हे बहुविध व परस्पर भिन्न क्षेत्रांतून आजलाही होणारे सहा महिन्यांच्या रात्रीचे उल्लेख म्हणजे घुणाक्षर न्यायानें घडणाऱ्या गोष्टी नसून, ज्ञात सत्यसृष्टीचाच स्वप्नांत जसा विकृत साक्षात्कार होतो तसेंच आजच्या हिंदूसमाजांच्या

आर्यांसारख्या प्रमुख घटक शाखेनें एके काळीं प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोष्टींचे काळाच्या ओघांत वाहात येतांना अवशिष्ट राहिलेले कण तर नाहींत ना अशा विचारानें प्रेरित होऊन प्रयत्नाला सुरवात करून हातीं आलेल्या साहित्या-पैकीं ध्रुववसतिविषयक भाग या लहानशा पुस्तकाच्या रूपानें ठाकठीक करून विद्वानांच्या पुढें मांडीत आहें.

कै. लो. टिळकांच्या ' आर्क्टिक होम इन् दि वेदाज् ' या ग्रंथावर प्रतिकूल टीका करण्याचा अनेक विद्वानांनीं प्रयत्न केला, परंतु तो सफल झाला नाहीं असा निर्णय प्रसंगोपात तिऱ्हाइताच्या भूमिकेवरून पहाणाऱ्या पद्धीच्या विद्वानांनीं दिला आहे. कै. चिं. वि. वैद्य यांनीं त्यांच्या ' History of Sanskrit Literature ' या ग्रंथांत असें स्पष्टच म्हटलें आहे. जानेवारी १९१८ च्या पुरुषार्थाच्या अंकांत विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनीं ' वेद व उपवेदपरिचय ' या नांवाच्या आपल्या लेखांत खालील उद्गार काढले आहेत.

' भूगोलाच्या दृष्टीनेंही ऋग्वेदाचें समालोचन केलें असतां ऋग्वेदाच्या स्थलासंबंधीं स्पष्ट स्पष्ट कल्पना होते. दीर्घकालीन उषा आणि अग्नीचें माहात्म्य यांवरून कांहीं सूक्तें जरी हिंदुस्तानाच्या बाहेर उत्तर ध्रुवाकडील प्रदेशांत किंवा त्या प्रदेशाची छाप मनावर असतां तयार झालेलीं असलीं तरी ऋग्वेदाचा बहुतेक भाग कुभू म्हणजे काबूल नदीपासून यमुनेपर्यंतच्या प्रदेशांत झालेला आहे. '

या उताऱ्यांतील जाड छापलेले शब्द तरी, ऋग्वेदांत ध्रुववस्तीचा मागमूस आढळतो आणि तोच त्याचा सर्वांत जुना भाग किंवा जुन्यांत जुन्या भौगोलिक संस्काराचा ठसा आहे हेंच पर्यायानें म्हणतात.

केसरीचे विद्वान् संपादक श्री. ज. स. करंदीकर यांनींही पुणें वसंत-व्याख्यानमालेंत १९३६ सालीं फा. हेरास यांना उत्तर देण्याच्या उद्देशानें या विषयाची समालोचना करणारें व्याख्यान देऊन लोकमान्यांचा ध्रुववस्तीचा सिद्धांत अद्याप असंडितच आहे असेंच प्रतिपादिलें आहे.

सन १९२१ सालीं श्री. अविनाश चंद्रदास कलकत्ता विद्यापीठांतील प्राचीन हिंदू संस्कृतीचे व इतिहासाचे अध्यापक यांनीं ' Rig Vedic India ' Vol. I या आपल्या ग्रंथाचा अर्धा अधिक भाग टिळकांच्या Arctic Home च्या खंडनांत खर्ची घातला. तो ग्रंथ छापखान्यांतून बाहेर पडण्यापूर्वीं टिळक वारले आणि त्यांच्या उत्तराच्या लाभाला संशोधक जग मुकलें. टिळकांच्या सिद्धांताच्या आधारावर आणखी कांहीं करूं म्हणणाऱ्या प्रस्तुत लेखकासारख्या

पुढच्या पिढीनें मागच्या आक्षेपकांना निरुत्तर करण्याचाही प्रयत्न साधल्यास करावयास पाहिजे, परंतु शोधक एक, टीकाकार पुष्कळ. तेव्हां पुष्कळांच्या पुष्कळ टीकांना उत्तरेंच देत बसायचें म्हटल्यास किती अडचणी उभ्या रहातील याची कल्पनाच करणें बरें. तेव्हां दोन्ही पक्षांचें म्हणणें ऐकून एका लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं निकाल देणाऱ्या न्यायाधिशाच्या निकालाप्रमाणें उपरोक्त कै. वैद्य व विद्यानिधि चित्राव वगैरेंच्या निर्णयाकडे बोट दाखवून आम्हाला पुढें चालूं लागणें सोईचें वाटतें. तशांत नवा पुरावा मांडण्यांत जुन्या सिद्धांताचें समर्थनच होतें.

पंचकाच्या प्रकरणांत अवेस्त्यांतील कांहीं उतारा जो टिळकांनीं दीर्घ रात्रीच्या पुष्ट्यर्थ घेतला आहे तोच मीही प्रेताचा अंत्यविधि कांहीं काळ तहकूब करण्याची ध्रुवप्रदेशावरची प्राचीन रीत अशा स्वरूपानें घेतला आहे. श्री. दासबाबूंनीं टिळकांच्या सिद्धांताचें खंडन करतांना या उताऱ्याचाही समाचार घेतला आहे. खालीं दोन्ही उतारे विस्तृत देत आहें.

‘ In fargards V and VIII of Vendidad where Ahura Mazda declares how the corpse of a person dying during winter is to be deelth with until it is finally disposed off according to the usual rites at the end of the season. Thus in Fargard V 10 ( 34 ), Ahur Mazda is asked ! If the summer is passed and the winter has come what shall the worshipers of Mazda do ? ’ To which Ahur Mazda answers In every house, in every borough, they shall raise three Katas for the dead, large enough no to strike the skull or the feet or the hands of the man; and they shall let the lifeless body lie there for two nights, three nights, or a month long, until the birds begin to fly, the plants to grow, the floods to flow, and the wind to dry up the waters from off the earth. And as soon as the birds begin to fly and the plants to grow and the floods to flow, and the wind to dry up the waters from off the earth then the worshiper of Mazda shall lay down the dead ( On the Dakhma ) with his eyes to-wards the sun. ”

In Fargard VIII, 4 ( 11 ), where the same subject is again taken up. Thus Ahura Mazda is asked ' If in the house of the worshiper of Mazda, a dog or a man, happens to die and it is raining or snowing or blowing or the darkness is coming on, when the flocks and the men lose their way, what shall the worshiper of Mazda do ? ' To this Ahura Mazda gives the same reply as in Fargard V. The faithful is directed, VIII 9 ( 21 ), to dig a grave in the house and there " let the lifeless body lie for two nights, three nights or a month long until the birds begin to fly, the plants to grow the floods to flow and the wind to dry up the waters from off the earth. " Here in the question asked to Ahura Mazda, darkness is distinctly mentioned along with snowing and blowing. "*

यावर श्री. दास यांचें भाष्य खालील प्रमाणें आहे.

" Mr. Tilak omits to take note of the facts that the sun in the tropics remains hidden behind clouds during the rainy season for days to-gether, and even for a month at a stretch and that during this period birds are in great distress, seldom stirring of their roosts and managing to ake out a miserable existance by feeding on such a things only in their immediate neighbourhoods may serve as their food. The disappearance of the sun in the first place, and the absence of the birds of prey in the second for days to-gethor during the rains, would prevent the worshiper of Ahura Mazda from disposing off the dead bodies, as much in the tropics as in the Arctic region where the sun disappears for months to-gether. The aforesaid direction of Ahura Mazda, therefore does not necessarily imply that his followers lived in the Arctic region. If the passage be carefully read, it will be found that Ahura Mazda had in his mind rather a contingency like boisterous rains lasting for days at a time, when he said that the dead body should be kept in a Kata until " The birds begin to fly, the plants to grow, the floods to flow and the wind

---

* Tilak :— Arctic Home in the Vedas pp. 272-3

to dry up the waters from off the earth. " than a Polar night lasting for several days and even months. The birds begin to fly as soon as the rains hold off intermittently, the plants begin to grow by being saturated with rain water the rivers are in flood as soon as the rain water is drained off from their basins into the channels. The very mention of the wind drying up the water from off the earth unmistakably points to rainfall and rainy wheather. "

वरील दोन्ही उतारे लक्ष्यपूर्वक वाचणाऱ्यांना हें सांगावयास नको कीं भक्ताला प्रेताचा अंत्यविधि कांहीं दिवसच नव्हे तर एक महिनाभर तहकूब करण्याचा उपदेश मझ्द करतो. आणि तसा उपाय शोधण्यासाठींच हा प्रश्न उपस्थित झाला आहे. उपरोक्त श्रीदासांच्या भाष्यांत अवेस्त्यांत वर्णन केलेली अडचणींची स्थिति अयनप्रदेशांत ( Tropics ) सुद्धां मुसळधार पाऊस सतत महिनाभर लागला तर उत्पन्न होऊं शकते असें भासविण्याचा प्रयत्न आहे. अडचण तर उत्पन्न होईल परंतु प्रश्न इतकाच कीं मझ्द भक्ताला तोच उपाय सांगणार नाहीं, तर त्यांत थोडा फरक करील. तो म्हणजे असा कीं घरांत जे तीन कट उभारायचे सांगतो त्यांत तें प्रेत दोन रात्रीं तीन रात्रीं किंवा एक महिनाभर ठेवायलाच सांगणार नाहीं तर कायमचें खोल गाडून टाकायलाच सांगेल. मुसळधार पाऊस पडणाऱ्या हवामानाच्या प्रदेशांत एक महिनाच काय पण तीन दिवस तरी प्रेत कोणी घरांत राहूं देईल काय ? प्रेताला सपाटून मुंग्या लागतील. तें कुजूं लागेल. तिसऱ्या काय पण दुसऱ्या दिवसापासूनच त्यांतून नाका तोंडावाटे घाण बाहेर पडूं लागेल आणि एक महिन्यांत त्याची काय अवस्था होईल त्याची कल्पनाच किळसवाणी आहे.

अर्थात् अवेस्त्यांतला उतारा ध्रुवप्रदेशच दाखवतो.

१ या प्रयत्नाला मूर्त स्वरूप देण्याचे कामीं प्रमुख आधार राजवाडे संशोधन मंडळ धुळें या संस्थेचा झाला आहे. ग्रंथसाहित्य व व्याख्यान आणि चर्चेला वाव, तसेंच या विषयावर प्रोटक निबंध वाचण्याची तयारी दाखवतांच अलाहाबाद येथें होणाऱ्या भारतीय इतिहास परिषदेच्या (Indian History Congress) अधिवेशनाला मंडळाचा प्रतिनिधि म्हणून उपस्थित होण्याची संधि, मंडळाच्या वाचनालयांत नसणारीं पुस्तकें मुंबईच्या रॉ. ए. सो. च्या लायब्ररींतून मागवून देण्याची तत्परता व शेवटीं संशोधकांतून पुस्तक छापून काढण्याचें कार्य अशा अनेक दृष्टींनीं मी मंडळाचा कायमचा ऋणी आहें.

मंडळाचे उत्पादक, सभासद व चिटणीस श्री. भा. वा. भट हे माझे संशोधनक्षेत्रांतले दीक्षागुरु होत. त्यांनींच वेळोवेळीं मार्ग दाखवून मजकडून हें काम करवून घेतलें आहे. याबद्दल त्यांचाही मी तितकाच ऋणी आहें.

तसेंच श्री. बाळाजी परशराम जोशी, खवाळें, ज्योतिषरत्न पं. नदुलाल शास्त्री, श्री. गजमल दलपत माळी मास्तर व रा. माणिक मंगा धनगर या सद्गृहस्थांकडून मला भिन्न भिन्न विषयांवर माहिती मिळविण्यास व मी मिळविलेली माहिती पडताळून पहाण्यास फारच मदत झाली आहे याबद्दल त्यांचे आभार मानतों. या छोट्याशा प्रबंधांत ज्या ज्या ग्रंथांचा मी माहिती घेतांना उपयोग केला त्यांचा जागजागीं उल्लेख केला आहे. तथापि कांहीं राहिले असतील तरी त्या सर्व ग्रंथांच्या लेखकांचेही मी आभार मानून हा उपोद्घात आटोपतों.

चैत्र शुद्ध १ शके १८६० } तारीख १०।४।१९३८ } भाऊराव रंगनाथ कुळकर्णी शिरपूर, प. खानदेश

# कांहीं अभिप्राय

## ( १ )

रा. भाऊराव रंगनाथ कुळकर्णी यांनीं 'आजच्या हिंदू जीवनांतील ध्रुववस्तीचे अवशेष' या त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथाचा कांहीं भाग मला वाचून दाखविला. त्यावरून समाजांतील रूढ चालीरितींचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची ग्रंथकर्त्यांची संशोधक दृष्टि वाचकाच्या प्रत्ययास आल्यावांचून राहात नाहीं.

कै. वा. लोकमान्य टिळक यांचें ( Arctic Home in the Vedas ) 'आर्यांच्या ध्रुववसतिस्थानाचे वेदांतील पुरावे' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून आर्यांच्या मूलस्थानासंबंधींच्या ज्या कल्पना पाश्चात्य संशोधकांनीं त्यापूर्वी प्रतिपादिल्या होत्या व प्रचलित केल्या होत्या त्यांमध्यें एक प्रकारची क्रांति झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांनीं आपला सिद्धांत ध्रुवप्रदेशांतूनच आढळून येणाऱ्या स्पष्ट चमत्काराचे निर्देश ऋग्वेदांतून व इतर वैदिक वाङ्मयांतून काढून दाखवून प्रस्थापित केला आहे.

आजपर्यंत दुर्बोध किंवा निरर्थक समजले जाणारे कित्येक ऋग्मंत्र ध्रुवसिद्धांताच्या आश्रयानें वाचून पाहिल्यास कसे सार्थ व सुबोध होऊं शकतात त्यांचींही उदाहरणें त्यांनीं आपल्या ग्रंथांत दिलीं आहेत. आपल्या सिध्दांताला भूगर्भ शास्त्र, गाथाशास्त्र व तौलनिक भाषाशास्त्र यांच्या दृष्टीनेंही कशी पुष्टि मिळते हेंही सप्रमाण दाखवून दिलें आहे.

पूर्वग्रहामुळें कांहीं जुने व नवे पाश्चात्य व पौरस्त्य पंडित त्या सिध्दांताविषयीं आपली साशंकता व्यक्त करतात. परंतु त्या ग्रंथांतील विचारसरणी व ऋग्मंत्रांचा त्यांनीं केलेला अर्थ यांत काय वैगुण्य आहे हें

कोणीही सप्रमाण दाखविण्याचा प्रयत्न केला नाहीं. त्यामुळें आतां तो सिध्दांत विद्वन्मान्य झाला असेंच म्हणणें प्राप्त आहे.

त्यानंतर आर्यांच्या ध्रुववसतिस्थानासंबंधीं संशोधनकार्य चालू ठेवणारा दुसरा कोणी विद्वान् संशोधक पुढें आलेला दिसत नाहीं. रा. कुलकर्णी यांनीं हें कार्य अंगीकृत करून जें संशोधन चालविलें आहे तें फार महत्त्वाचें व आर्यांच्या चालीरितींचे इतिहास पूर्वकालीन स्थितीवर प्रकाश पाडणारें आहे.

यानंतर तो सिद्धांत मान्य करून वैदिक व पौराणिक वाङ्मयाचें मंथन करण्याचा कोणाही पंडितानें उद्योग केल्याचें माझे अवलोकनांत नाहीं. नागपूर येथील वे. शा. सं. कृष्णशास्त्री घुले यांनीं ऋग्वेदांतील कांहीं मंडलांचें भाषांतर ध्रुवसिद्धांत मान्य करून केलेलें आहे. अलीकडे थोडे वर्षांपूर्वी त्यांनीं ' वैदिक सरस्वती'वर जो विद्वत्ताप्रचुर निबंध लिहिला त्यांतही या ध्रुवसिद्धांताचाच मुख्यतः अनुवाद करून आपलें प्रतिपादन केलें आहे.

समाजांतील निरनिराळ्या वर्गांत जे अनेक संप्रदाय, विधि, आचार व रूढि प्रचलित आहेत, त्यांची उपपत्ति काय असावी असा प्रश्न उपस्थित करून त्याचें उत्तर शोधण्याचा ते कसोशीनें प्रयत्न करतात व असा प्रयत्न करीत असतां त्यांच्या निदर्शनास आलें कीं त्यांपैकीं कांहीं गोष्टी निःसंशय ध्रुववसतिस्थानाकडे अंगुलिनिर्देश करीत आहेत. विद्वान्, व्यासंगी व संशोधक बुद्धीचे माणसाचे विचारशक्तीस चालना देणारा अशा तऱ्हेचा त्यांचा उद्योग त्यांनीं आज बरेच दिवस चालू ठेविला आहे. व आतां त्याचा निष्कर्ष या ग्रंथाचे रूपानें परीक्षेस्तव, विद्वानांचे समोर मांडला आहे. माझा असा विश्वास आहे कीं त्यांच्या या प्रयत्नांचें सर्व विद्वान् लोक स्वागत करितील व त्यांच्या या कृतीचा योग्य गौरव करून त्यांच्या संशोधनकार्यास प्रोत्साहन देतील.

धुळें, समर्थ वाग्देवता मंदिर<br>शके १८६० ज्येष्ठ शु० १४ शनिवार } (सही) माधव श्रीहरि अणे

( २ )

' श्री. भा. रं. कुळकर्णी यांनीं आर्यांच्या उत्तर ध्रुवाकडील वस्तीसंबंधीं खानदेशी भाषेंत व या प्रदेशांतील व्यवहारांत जे उल्लेख आढळतात त्यांविषयीं जो शोधपूर्वक निबंध लिहिला आहे त्यांतील कांहीं भाग वाचून दाखविला. त्यावरून त्यांनीं जे परिश्रम केले आहेत त्यांविषयीं सादर कौतुक वाटतें. त्यांच्या शोधाचा विद्वानांस विचार करावा लागेल.'

धुळें, ता. ३१-१०-३८ (सही) मा. वि. किबे<br>(सही) वि. स. वाकसकर

# आजच्या हिंदूजीवनांतील ध्रुववस्तीचे अवशेष

( लेखक– भा. र. कुलकर्णी बी. ए. )

## ( १ ) पंचक

" Language is eternally changing, so are manners, but an exploded custom or rite traced to its source and metained in opposition to its climate, is a testimony not to be rejected " Todds Rajsthan. ( I 69 )

पंचकाचा विधि सर्व खानदेशांत आज प्रचलित आहे. चारही वर्णांच्या हिंदूंचें या पंचकाकडे सहसा दुर्लक्ष होत नाहीं. धनिष्ठा व त्यापुढील चार नक्षत्रें ह्यांवर कोणाचाही मृत्यु झाला असतां तो पंचकांत मृत्यु झाला असें समजतात, आणि त्या बरोबर त्या मृत्यूचे अशुभ परिणाम टाळणारा एक विधि करतात. नक्षत्रपरत्वें अशुभाचें क्षेत्र भिन्न असतें. धनिष्ठा नक्षत्रावर मरणारा गांवांतील पांच मृत्यु घडवील असें मानतात. शततारका कुळ, पूर्वाभाद्रपदा आळी, उत्तराभाद्रपदा गृह व रेवती मातुळाकडील पांच मृत्यु घडवील अशी पूर्वापार समजूत आहे.

पंचकांत नुसता मृत्यूचाच निषेध नसून प्रेताच्या दहनाचाही निषेध आहे, आणि यासाठीं मरणें ईश्वराधीन असलें तरीपण प्रेताची विल्हेवाट लावणें मानवाधीन आहे. आणि पंचक संपेपर्यंत तशी ती लावूं नये असेंही शास्त्रवचन आहे. नक्षत्रें दोन प्रकारचीं; एक चांद्र नक्षत्र आणि

---

अथपंचकमरणविधिः ॥ आदौकृत्वाधनिष्ठार्धमेतन्नक्षत्रपंचकं ॥ रेवत्यंतं सदा दुष्टम शुभंसर्वदा भवेत् ॥ बालस्य वाथवृद्धस्य पंचकेषुमृतस्यच ॥ विधीनंयोन कुर्वीत तस्य विघ्नं प्रजायते ॥ दाहस्तत्र न कर्तव्यो विषादः एवंजातिषु ॥ नजलंदीयते तेषुत्व शुभं सर्वदा भवेत् ॥ पंचकानंतरं कार्यं कर्तव्यं सर्वमन्यथा ॥ पुत्राणां-गोत्रिणां तस्य संतापोऽप्युपजायते ॥ गृहे हानिर्भवेत्पृष्ठे ऋक्षेष्वेषुमृतस्तुयः ॥ पंचका-नंतरंकार्यं प्रेतदाहादिकं खलु ॥ अथवातद्दिने कार्योदाहस्तु विधिपूर्वकं ॥

ब्रह्मपुराणे—॥ धनिष्ठा पंचके जीवो मृतोयदिकथंचन ॥ पुष्करेयाम्य भेजीवो कुलजं मारयेत्ध्रुवं ॥ तत्रारिष्ट विनाशार्थं विधानं समुदीर्यते ॥ दाहदेशं शवंनीत्वास्ना-पयेत्रयतः शुचिः ॥ दर्भैस्तुप्रतिमाः कार्याः पंच वैसूत्र वेष्टिताः ॥ यवपिष्टेनानु लिप्तास्ताभिः सहशवंदहेत् ॥ प्रेतवाहः प्रेतसखः प्रेतपः प्रेतभूमिपः ॥ प्रेत हर्ता पंचमस्तु ना मान्येता निचक्रमात् ॥ [ शुक्लयजुर्वेदी कर्मदीपप्रदीप ]

दुसरें सौर नक्षत्र. पंचकाचें मोजमाप चांद्र नक्षत्राप्रमाणें होत असल्यानें त्याची कालमर्यादा जास्तींत जास्त पांच दिवसांपर्यंत आहे. याचा अर्थ असा कीं पंचकाच्या आरंभीं मृत्यु झाल्यास प्रेताची विल्हेवाट पांच दिवस रहीत करावयाची. परंतु इतक्या कालावधींत प्रेताची स्थिति पालटून त्यायोगें उत्पन्न होणारी दुर्गंधी वगैरे आरोग्याला विघातक गोष्टी लक्षांत घेऊन त्यावर तोड सुचवणारींही शास्त्रवचनें आहेत.

त्यां-अन्वयें प्रेताबरोबर दर्भाच्या काड्यांना लोकरीचें सूत गुंडाळून व त्यावरून जवाचें पीठ लपेटून पांच पुतळे करावयाचे व त्यांचें प्रेताबरोबर दहन करावयाचें म्हणजे पंचकामुळें उद्भवणारें अरिष्ट टळतें. प्रत्यक्ष व्यवहारांत कणकेचे पांच पुतळे करतात. कांहीं लोक जिवास जीव म्हणून त्या पुतळ्यांत पांच गोमाशा घालतात आणि अशा त्या पुतळ्यांचें दहन किंवा दफन करतात. गोमाशा कुत्र्याच्या अंगावरील पसंत करतात. गोमाशी पकडतांना एकादी हातांतून निसटून गेली तर निसटून गेलेल्या गोमाशांइतके मृत्यु होतील असा कयास करतात. या पांच पुतळ्यांचीं भिन्न भिन्न नांवें आहेत. (१) प्रेतवाह, (२) प्रेतसखा, (३) प्रेतपालक (४) प्रेतभूमिपालक आणि (५) प्रेतहर्ता. असा हा थोडक्यांत पंचकाचा विधि आहे. एका वर्षांत नक्षत्रचक्राची चंद्र सामान्यतः बारा वेळा प्रदक्षिणा करत असल्यानें सबंध वर्षभर या पंचकाच्या तांबड्या कंदिलाकडे लोकांचें लक्ष असतें, व कुठेंही मृत्यु घडला तरी ताबडतोब जोशाकडून या पंचकाची शहानिशा करून घेतात.

लोकांचे समज, रूढि, शकुन व लाभ-धार्जिण्यांच्या कल्पनांच्या मुळाशीं कुठेंतरी एक वेळचा अनुभव दडलेला असतो. आज आपणास त्या गोष्टी निरर्थक वाटतात आणि त्या तशा असतातही; परंतु एके काळीं किंवा काळाच्या उदरांत एकदां त्या आज आपण समजतों अशा फलदेत्या झाल्या होत्या येवढ्या पुरत्याच त्या सार्थ समजावयाच्या.

एकानें कधीं नव्हे तो आपल्या घरावर एक मजला चढविला आणि त्याचा मोठा कर्तासवरता मुलगा मेला. ठरलें. घराला हवेली धार्जिणी नाहीं. विहीर खोदण्यास आरंभ केला. मृत्यू झाला. विहीर अनिष्ट. समाजाच्या अंतरंगांत शिरून पहातांना असे विधि-निषेध घरागणिक दहापांचतरी सहजच आढळतात.

महादजी शिंदे पानिपत वरुन पळाले. मांडीखालीं घोडी होती. पाठलाग करणाऱ्या पठाणाच्या घोड्याचें खिंकाळणें ऐकून ती कांहीं केल्या पुढें जाईना. महादजीच्या जिवावर बेतली, परंतु तंगडीवर गेली. त्यांनीं नियमच करून टाकला कीं, शिंदे कुळांतील कोणीही घोडीवर स्वार व्हायचें नाहीं.

आतां युद्धोत्तर निदान हिंदुस्थानांत, स्वमवत् झाली. परंतु साध्या स्पेर्टीसही घोडी वर्ज्य. कारण, फक्त एकदांच काकतालीय न्यायानें घडलेलें, महादजी शिंद्यांचें. शेंकडों शिपायांनीं त्यापूर्वी व त्यानंतरही घोड्या वापरल्या असतील व वापरतील. परंतु असा वाईट अनुभव येणें नियम नसून अपवाद आहे. पण हा अपवादच नेमका ज्यांच्या वांट्याला आला त्यांनीं वाइटाच्या भीतीनें तो नियमानेंच टाळला. हीच कथा प्रत्येक विधिनिषेधाची. मात्र सर्वांचेंच मूळ आज ओळखतां येण्याइतकें सुलभ नाहीं. त्याला कारणें अनेक. त्यांत काळावधि आणि त्यांतून येतांना बदललेलें त्या त्या विधिनिषेधांचें स्वरूप.

पंचकाच्या निषेधाच्या बुडाशीं असाच एकवेळचा कटु अनुभव, पंचकांत प्रेताचा अंत्यसंस्कार बरोबरच्यांनाही घेऊन मरतो अशी भावना निर्माण करण्यास कारण झाला असला पाहिजे. त्याखेरीज अशा प्रकारचें शास्त्रवचन अस्तित्वांत राहणार नाहीं. आणि रूढितर मुळींच राहणार नाहीं.

यूरोपांत ख्रिश्चनांत ३।४ दिवस प्रेत ठेवून मग अंत्यविधि करतात. नार्वे सारख्या देशांत तर साधारणतः एक आठवडा प्रेत ठेऊन मग त्याची व्यवस्था करतात. परंतु त्या देशांत हवा थंड असल्यानें या अवधींत प्रेताच्या स्थितीवर म्हणण्यासारखा अनिष्ट परिणाम होत नाहीं. आणि पंचकाच्या पांच दिवसांच्या निषेधाचा विचार केला तर असें म्हणावेंसें वाटेल कीं, एके काळीं भारतीय, हिंदुस्थानाबाहेर उत्तरेकडे रहात असतील आणि त्याचें स्मारक हा अवशेष आहे.

परंतु नुसतें उत्तरेकडे म्हणून निभावून नेण्यांत कांहीं स्वारस्य नाहीं. आणि शिवाय नुसत्या पंचकांतच निषेध कां? केव्हांही मृत्यु झाला तरी प्रेताची पांच दिवस विल्हेवाट लावूं नये अशी चाल पडावयास हवी होती. परंतु पंचकाची धमकीवजा रूढि यापेक्षां कांहींतरी निराळ्या कारणानें पडली असावी.

या रूढीचा उल्लेख करणारे ब्रह्मपुराणासारखे ग्रंथावरून व तिच्या तपशिलावरून तिची पुरातनता प्रथमदर्शनींच सिद्ध होते. पांच पुतळ्यांच्या नामसाळिके वरूनतर आजच्यापेक्षां कांहींतरी निराळी समाजव्यवस्था असण्याच्या वेळची ती रूढि असावी असें वाटतें. आज प्रेतयात्रेला कमींत कमी चार लोक लागतात. आणि त्याचे पारिभाषिक शब्द, फारतर चार खांदे म्हणजे प्रेतवाहक आणि एक आग्या म्हणजे आग धरणारा, व पंचकाचा विधि ब्राह्मण-अब्राह्मण या सर्वांस सारखाच लागू असल्यानें क्रियाकर्मांतर सांगणारा सहावा भटजीही अवश्यक रहात नाहीं.

परंतु जुन्या तपशिलांत प्राचीन अंत्यविधीचें एक निराळेंच चित्र दिसतें. त्यांत एकच प्रेतवाहक आहे. म्हणजे प्रेत एकाद्या फळीवर घालून ओढीत नेत असतील. प्रेतभूमिपाळ आणि प्रेतपाळ या अगदींच नवीन गोष्टी आहेत. खिश्चनांचें व पारशांचें मसणवट राखणारे लोक असतात. हिंदूंचे जवळजवळ नसतातच. नाहीं म्हणावयास काशीसारख्या क्षेत्रांतून उत्पन्नाच्या बाबीमुळें कोणीं असावेत असें वाटतें. खेड्यापाड्यांतून गांवच्या महारास प्रेतांचीं वस्त्रेंप्रावणें वगैरे मिळतात, म्हणून त्यालाही प्रेतभूमिपाळ म्हणतां येईल. परंतु प्रेतपाळ आणि प्रेतहारक या व्यक्ति आणि त्यांचें कार्यक्षेत्र हीं तर काळाच्या उदरांत गडप झालेलीं आहेत.

पुतळे तयार करतांना दर्भांच्या काड्या व त्यावर लोकरीचें सूत आणि जवाचें पीठ. यांतसुद्धां थोड्या विचार करण्यासारख्या बाबी आहेत. हिंदुस्तानांत अधिकांश हव्यकव्यांत तांदळांचें, तिळांचें व त्याच्या खालोखाल जवांचें प्रयोजन असतें. अर्थात् यव हा हिंदुस्तानच्या बाहेर उत्तरेस थेट उत्तर ध्रुवापर्यंत होऊं शकत असे. तांदूळ आणि तीळमात्र तिकडे कधीं झाले नसतील.

आतां विशेष पाल्हाळ न करतां यांतून ध्रुवप्रदेश कसा दिसतो तें सांगतों. हीं पंचकनक्षत्रें सौर धरलीं तर त्यांचा कालावधि पांच दिवसांऐवजीं दोन सव्वादोन महिन्यांचा आणि तोही वर्षांतून एकदांच येतो. प्रेताची विल्हेवाट लावतांना त्या कामीं लागणाऱ्या लोकांना अनिष्ट असा हा दोन अडीच महिन्यांचा कालावधि आहे आणि तसा तो ध्रुव प्रदेशावर असणेंच असलें तर शक्य आहे.

एके काळीं ध्रुवावर हवा सुंदर, भूमि फळाफुलांनीं समृद्ध आणि जीवसृष्टि भरभराटीला आलेली असावी असें भूस्तरशास्त्रवेत्ते ठांसून सांगतात, परंतु ही स्थिति पालटायला कारण हिमप्रलय झाला. हा हिमप्रलय एका वर्षां दोन वर्षांत किंवा एकदम झाला नसून त्या प्रदेशाची हवा थंड होत होत आजच्या बर्फमय अवस्थेला येऊन पोहोचली असली पाहिजे. सुपीक जमिनींचें रेताड वाळवंट जसें नकळत हळू हळू होऊन जातें, तसाच हा फरक हळू हळू परंतु निश्चितपणें घडून आला असला पाहिजे. आणि अर्थात् प्रथम बर्फ पडायाला हिंवाळ्यांत सुरुवात होऊन आरंभीं हिंवाळाच तेवढा रहाण्याला दुःसह झाला असावा.

या थराला गोष्ट येण्यांतच मानवांच्या कित्येक पिढ्या गेल्या असतील आणि जसजसा हिंवाळा तीव्र तसतशी इतर ऋतूंतही थंडी कडक पडूं लागली असावी आणि मग मानवांनीं हळू हळू आपल्या सुखसोयी पहाण्याच्या प्रयत्नाला सुरुवात केली असावी. त्याचा पहिला पुरावा हा पंचकाचा विधि होय.

बाहेर कडक थंडी पडली आहे. जिकडे तिकडे बर्फमय अंधार. अशा वेळीं प्रेत बाहेर नेऊन तें जाळणें किंवा पुरणें म्हणजे हें कृत्य करूं पहाणाऱ्यांचें मरणच. वरून पडणाऱ्या बर्फानें, नाहींतर थंडीनें, त्या प्रेताबरोबरच त्यांचाही मृत्यु यावयाचा. बरें, हा थंडीचा काळ जाईपर्यंत प्रेत राहूं दिलें तर कडक थंडींत नासण्या कुजण्याची भीति नाहीं.

पांच सहा दिवसच काय, पण वर्षानुवर्षे प्रेतें बर्फांत जशींच्या तशीं राहतात. आस्ट्रेलिया, आर्जेंटिना, कॅनडा वगैरे देशांतून जनावरें मारून त्यांचें मांसळ धूड बर्फाच्या खोल्यांतून ठेवून मागणीप्रमाणें त्याचा पुरवठा दूरदूरच्या प्रदेशाला करतात. आणि त्या जनावरांचा जीव गेल्यापासून तें दुसऱ्या जिवाच्या पोटांत पडेपर्यंत २।४ महिन्यांचा काळ जाणें, हीतर नित्याचीच गोष्ट आहे. तेव्हां ध्रुवप्रदेशांत २।३ महिने प्रेतें कांहींही अनिष्ट फेरफार न होतां राहाण्यास कांहींही हरकत नाहीं.

नार्वेच्या उत्तरेकडील डोंगराळ भागांत लोकवस्ती अतिशय विरळ आणि खेड्यापाड्यांतून रहाणाऱ्या मेंढपाळ शेतकऱ्यांचें त्यांच्या चर्चपासूनचें अंतर ५।१० मैलही असूं शकतें. एखादे प्रसंगीं चर्च आणि अशी वस्ती यांत एखादें खोल फियोर्ड असतें. हिंवाळ्यांत एखादा मृत्यु घडतो. तशा वेळीं बर्फ पडल्यामुळें रस्ते धोक्याचे होतात. तेव्हां बर्फ वितळेपर्यंत त्या मृताचा प्रेतविधि थांबवून धरावाच लागतो. असा काळ कधीं कधीं महिन्यादीडमहिन्याचासुद्धां असतो. ही आतांच्या काळची गोष्ट.

तेव्हां २–३। महिन्यांच्या कालावधींत प्रखरतर हिंवाळा असा ध्रुवप्रदेशांतच आरंभीं जाणवला असेल. कारण उत्तरध्रुववृत्तापासून तों थेट ध्रुवापर्यंतच्या प्रदेशांत कमींत कमी चोवीस तासांपासून तर सहा महिन्यांपर्यंत रात्रीची व्याप्ति क्रमक्रमानें असते आणि या प्रदेशांतच असा वर्षाचा कांहीं भाग लोकांच्या व्यवहारांत त्रासदायक होऊं शकतो.

चांद्र नक्षत्रें घेतल्यानें पंचकांचीं एका वर्षांत बारा वेळां आवृत्ति होऊन घराबाहेर पडून कांहीं करूं म्हणणाऱ्यावर मरणाची आपत्ति येण्यासारखे प्रसंग वर्षांतून त्या त्या वेळीं उद्भवतील. किंवा एकदांतरी उद्भवले असावेत, असें वाटत नाहीं.

तेव्हां पंचकाच्या विधीला कांहीं उपपत्ति लावतां येण्यासारखी असेल तर माझ्या मतें ती हीच आहे. हिंदुशास्त्रकारांनीं उगाच काल्पनिक भीति निर्माण करून ठेविली आहे; हें म्हणणें या बाबतींत पटण्यासारखें नाहीं.

खालील अवेस्ता ग्रंथांतील पुरावा या पंचकावरील माझ्या भाष्याच्या समर्थनाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा आणि तंतोतंत लागू पडणारा आहे.

" हिंवाळयांत मृत झालेल्या मनुष्याची व्यवस्था कशी लावावी असा प्रश्न मझ्दाला केला असतां तो उत्तर देतो.

" प्रत्येक घरांत मृतासाठीं तीन कट उभारून त्यांत तें प्रेत दोन रात्रीं, तीन रात्रीं किंवा महिनाभर, म्हणजे पक्षी उडूं लागत, वनस्पति वाढूं लागत, प्रवाह वाहूं लागत, आणि वायू, पृथ्वीवरील पाणी शुष्क करूं लागेपर्यंत ठेवावें आणि मग पक्षी उडूं लागले, प्रवाह वाहूं लागले, म्हणजे मझ्दाच्या भक्तानें तें प्रेत सूर्याकडे डोळे होतील असें दक्यावर ठेवावें." [ वेंदिदाद, फरगार्ड ५-१० (३४) ]

" मझ्दाला असा प्रश्न विचारला आहे कीं, " जर भक्ताच्या घरांत एकादा कुत्रा किंवा मनुष्य मेला आणि जर तेव्हां पाऊस व बर्फ पडत असेल; आणि माणसें व जनावरें वाट चुकतील असा काळोख येत असेल तर भक्तानें काय करावें ? " यावर मझ्दाचें उत्तर पूर्वीप्रमाणेंच आहे. दक्षिणायनांत मरण येणें हें वाईट आहे. तिचें मूळही या उत्तर-ध्रुवावरच्या रात्रींत च आहे. "

( आर्टिक होम पान २०३-२०४ )

उपरोक्त उताऱ्यांत वर्षापैकीं कांहीं भाग बर्फाच्या वृष्टीमुळें लोकांच्या नित्याच्या व्यवहाराला घराबाहेर पडण्यासही कसा धोक्याचा होता, आणि त्यासाठीं प्रेतयात्रेसारख्या गंभीर गोष्टीही केवळ अमूल्य मानवी जीविताच्या सुरक्षिततेसाठीं कशा शास्त्राज्ञेनें पुढें ढकलण्यांत येत असत याचें सुरेख प्रत्यंतर येतें. ( शुक्ल यजुर्वेदी कर्मकांड प्रदीप )

उत्तरध्रुववृत्ताच्या आंत भारतीय आर्य आणि पारशांचे पूर्वज जेव्हां एकत्र नांदत असतील, त्या वेळीं त्यांना सोसाव्या लागणाऱ्या एका सामान्य संकटाला तोंड देतांना त्यांनीं त्या काळीं जी एक तोड काढिली होती, तिचें स्मारक अवेस्तांतील मझ्दाच्या आज्ञेच्या रूपानें इराणांत आणि पंचकाच्या विधीच्या रूपानें हिंदुस्तानांत आज अवशिष्ट आहे. आणि हे अवशेष म्हणजे या लोकांच्या पूर्वजांच्या एक वेळच्या उत्तरध्रुवप्रदेशावरील वास्तव्याचे बिनतोड पुरावे आहेत. जेव्हां एकाद्या गोष्टीचा हेतु दृष्टीआड होऊन ती केवळ रूढि म्हणून समाजांत जीव धरून राहाते, अशा वेळीं समाजांत तिचा अर्थ लावतांना किंवा ती आचरणांत आणतांना मनुष्य आपल्या तत्कालीन कल्पनांचें साहाय्य घेतो आणि मग त्या मूळ गोष्टीच्या स्वरूपांत नकळत बदल होऊन जातो. वस्तुतः बदल करण्याची इच्छा किंवा प्रांजल समजूत, तो जुनें स्वरूपच कायम ठेवतो अशी असते.

प्राचीन नकला-कारांची नकला उतरतांना जुन्या पोथींत जेथें एकादी माशी मरून चिकटली असेल, तेथें नव्या प्रतींतही एक माशी चिकटवण्याची एक गोष्ट सांगतात. ती माशी चिकटवण्यांत त्या नकलाकारांचा प्रांजलपणा अज्ञानानें कसा अनर्थ करतो हें कळतें.

आपल्या इकडे हरदासी नकलांत कासोटा सोडून वैश्वदेव करण्याची दंतकथा आहे. म्हातारे आजोबा गरिबींत थांडकी धावळी नेसत आणि म्हातारा वैश्वदेव करण्याला बसला कीं, कासोटा नेमका ताण बसून सुटून जाई. धावळी आंखूड आहे, ही जाणीव पूर्ण असल्यानें वैश्वदेव आटोपल्यावरच कासोटा जाग्यावर येई. नातवाच्या स्मृतिपटलावर कासोटा सुटल्याचें चित्र अक्कम होतें आणि भावना ही कीं, वैश्वदेवाच्या विधींत कासोटा सोडणें ही एक अवश्य बाब आहे. त्याच्याकडे कर्तेपण आलें. दिवस बरे आले. जुन्या धावळीची जागा नव्या लांबरुंद येवली कदानें घेतली. आतां हा प्रांजळपणें आपण होऊन कासोटा सोडून वैश्वदेव करूं लागला. ही गोष्ट, पंचकांची सौरनक्षत्रांवरून चांद्र नक्षत्रांवर गणना करण्याला व त्याची बारा वेळां आवृत्ति करण्याला काय कारण घडलें असेल, याची चांगली कल्पना आणून देईल.

एके काळीं सुसंगत असणाऱ्या गोष्टींची संगति कळेनाशी झाली कीं, माणसाच्या जिवंत बुद्धीला ती विसंगति बोचूं लागते. आणि तो आपल्या कुवतीप्रमाणें ती विसंगति काढून टाकतो. याचीं शेंकडों उदाहरणें देतां येतील.

भोजराजा आणि त्याचा प्रतिस्पर्धी गांगेयतेलंगण यांतील तेलंगणाचा तेली बनला आणि भोजाचा विजयस्तंभ तेल्याला साजेशी घाण्याची लाट बनला. इतकेंच नाहीं, तर हिंदी, मराठी व खानदेशी भाषांतही भोजराजा आणि गंग्या तेल्याची जोडी, म्हणीच्या रूपानें वज्रलेप झाली.

कुंभ व मीन या दोन राशी म्हणजे ४॥ नक्षत्रें, पंचकाला वर्ज्य आहेत. नांव पंचक, नक्षत्रें ४॥. प्रत्यक्ष मोजतांनाही नक्षत्रें पांचच धरतात. धनिष्ठा अर्धें नक्षत्र कुंभांत येतें. परंतु व्यवहारांत धनिष्ठा संपूर्ण धरतात म्हणजे एके काळीं पांचही नक्षत्रें पूर्ण या पंचकांत मोडत होतीं, व अजूनही मोडतात. परंतु लेखकानें सोकर्यासाठीं ठोकळ दोन राशिनामें घेऊन, नक्षत्रांचीं पांच नांवें टाळण्यांत, तीन नांवांचीच नव्हे, तर भरतीला अर्ध्या नक्षत्राचीही बचत केली. आणि पंचकांत प्रेतविधि होत नसे हें न विसरल्यानें व आपले प्राचीन पूर्वज जे विधि करीत, त्याबद्दल वाटणाऱ्या स्वाभाविक आदरानें ते पाळण्याचा कटाक्ष. यामुळें हिंदुस्तान-सारख्या उष्ण देशांत सौरमानानें होणारा दोन सव्वा दोन महिन्यांचा अवधि संक्षेपासाठीं चांद्र नक्षत्रें धरून पांच दिवसांवर आला. परंतु या सोयीबरोबर वर्षांतून एकदांच्या ऐवजीं बारा वेळां तो विधि करण्याची आपत्ति आली. बाब पांच मुठी कणकेचीच असल्यानें त्यांत अवघड असें कांहींच वाटलें नाहीं. अशी या बदलाची कारणपरंपरा सहज हुडकतां येणें शक्य आहे.

## २ सहा महिन्यांची रात्र

सर्व हिंदुस्थानांत आबाल-वृद्धांच्या तोंडीं कुंभकर्णाची कथा असते, आणि त्याच्या सहा महिन्यांच्या झोंपेला साजेसें त्याचें अवाढव्य शरीर असून त्याच्या हजामतीलाच शेंकडों न्हावी लागत, त्यानें श्वास घेतांच किलेक माकडें त्याच्या नाकांत ओढलीं जाऊन बेपत्ता होत, व त्याला जागवायचें म्हणजे मोठे मोठे नगारे, नौबदी, भेरी वाजवाव्या लागत, अशी सर्वत्रांची समजूत आहे. या कुंभकर्णाच्या सहा महिन्यांच्या झोंपेच्या मुळाशीं उत्तरध्रुव प्रदेशाची वस्तीच असावी, असा कयास रामायणांतील याशिवाय आणखी कांहीं वैदिक कल्पनांशीं साम्य स्थळें दाखवून कै. लोकमान्यांनीं नमूद करून ठेवला आहे.

खानदेशांत ही कथातर सर्वांस परिचित आहेच. परंतु त्याशिवाय आणखी दोन प्रकारें सहा महिन्यांची रात्र येथील लोकांना माहीत आहे. त्यांपैकीं पहिला प्रकार कानबाईचें गाणें. यामध्यें कानबाईला तिचे स्वामी बाहेर आले आहेत म्हणून दार उघडण्यास सांगण्यांत येतें, आणि ती परत आपल्या स्वामीला ' सहा महिन्यांची रात्र गेली, तेवढ्या अवधींत तुम्ही कुठें गेलां होतां ? ' असा प्रश्न करते. त्यावर स्वामी उत्तरांत मी वाण्याच्या दुकानावर गेलों होतों, आणि तेथून खारकांच्या व नारळांच्या गोणी आणल्या असें सांगतो. हें गाणें कानबाईच्या उत्सवांत घरोघर घोळून घोळून म्हणण्यांत येतें. आणि हें गाणें ऐकूनच प्रस्तुत विषयाचा विचार करण्याची मला स्फूर्ति झाली.

कानबाईचा सण श्रावणाच्या पहिल्या रविवारीं करितात. त्या दिवशीं संध्याकाळीं घरांतील कानबाईच्या दोन नारळांना धुवून पुसून कलशावर ठेवून त्या कलशाच्या गळ्यांत ऐपतीप्रमाणें पुतळ्यांच्या माळा, वज्रटीक, ठुशी वगैरे दागिने घालून नारळांत नथही अडकवून वर चांगला खण पांघरवून ठेवतात. कांहीं अधिक श्रीमंत लोक नारळाचे नुसते कलश ठेवून त्यांच्या मागें त्याच चौरंगावर हातापायांचा व मुखवटा घातलेला असा वंबरेएवढा कानबाईचा पुतळा सजवून त्याच्या आंगावर, हातापायांत, गळ्यांत खूप दागिने घालतात, आणि सुंदर मखरांत या देवीची स्थापना करतात.

या देवीच्या नैवेद्याला रोट असें म्हणतात. त्यासाठीं ठराविक मापाचे, घर किंवा वहिवाटीपरत्वें अडीच शेर, पांच शेर किंवा सव्वा शेर असे गहूं घेऊन ते त्याच दिवशीं शुचिर्भूत होऊन दळतात. कानबाईचा सण एकादे वेळीं टळला किंवा रहीत झाला तर त्याबद्दल पुढल्या वर्षीं रोटाला दुप्पट गहूं दळावयाचा, व हें मेहनतीचें काम असल्यानें ब्राह्मणेतरांत घरांतील

पुरुष मंडळीही मोठ्या हौसेनें दळूं लागतात, व एकादी स्त्री त्यांत बसून जात्यांत घास घालण्याचें आणि गाण्याची संथा देण्याचें काम करते. मागून सर्व पुरुष मंडळी मोठ्या उत्साहानें त्या गाण्याची री ओढण्याचें काम करतात.

या देवीची स्थापना ब्राह्मण, मराठे, सोनार, शिंपी, सुतार, न्हावी, चांभार वगैरे लोकांत होते. कोळी वगैरे लोक फक्त गहूं दळून त्याचे रोट ( पुरणाच्या पोळ्या व बरोबर खिरीचें भांडें ) जेथें कानबाई असेल त्या घरीं नेऊन देवीला नैवेद्य दाखवून आणतात.

ज्यांच्या घरीं देवी बसते त्यांच्या घरीं रात्रीं जागरण होऊन बायका गाणीं, फुगड्या, सोंगट्या वगैरे खेळतात. आणि पुरुषवर्गही आपापल्यापरी जागरण आणि करमणूक करतो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं नदी, विहीर किंवा तलावावर नेऊन त्या देवीची बोळवण करतात. बोळवण करण्याच्या मिरवणुकींत वाजेवाजंत्री व पुरुषमंडळीही भाग घेतात. मुलें गळ्यांत बैलांच्या घुंगुरांच्या माळा घालून हातांत टिपऱ्या घेऊन कानबाईपुढें नाचतात. नदीवर जाऊन पूजापत्री वगैरे सर्व पाण्यांत वहावून देऊन ते नारळ धुवून पुन्हा परत घरीं आणतात. व वर्षानुवर्षे किंबहुना पिढ्यान्‌-पिढ्या त्याच नारळांच्या जोडीवर ( ब्राह्मणांत ) किंवा एका नारळावरही ( ब्राह्मणेतरांत ) हा सण साजरा होतो.

रोटाचा गहूं दळल्यानंतर तें पीठ चाळल्यावांचून उपयोगांत आणायचें असतें. कित्येक घरीं त्याच्या पुरणपोळ्या करून त्या खिरीबरोबर, तुपाबरोबर किंवा दुधाबरोबरच खातात. तुरीच्या डाळीचें वरण अजीबात वर्ज्य असतें. भाज्या, पिठलें, कढी व दूध चालतें. कांहीं घरीं तिखट तळण वर्ज्य असतें. कुसती गंगाफळाची भाजीच फक्त करतात. पहिल्या दिवशीं पुरणपोळी करून पुढें तें पीठ संपेपर्यंत साध्या पोळ्या करतात. त्यांना तेल लावायाचें नाहीं. पूड घालायाचें नाहीं. हा रोट फक्त आपल्या कुळांतल्यांनींच खायचा. मुलगी एक वेळ चालेल, परंतु मुलीची प्रजा रोट खाऊं शकणार नाहीं.

वस्तुतः घरोघरीं रोट असला तरी एकमेकांकडे रोट खाण्याची कडक बंदी. रोट संपेपर्यंत धर्मादाय, उसनें देणें बंद. रोटाचा तुकडा कुत्र्यामांजरास मुळींच घालीत नाहींत, व संपवतांना तिसऱ्या, पांचव्या, सातव्या अशा विषम दिवशीं रोट संपवतात. नव्या सुना हटकून पहिला रोट खाण्यासाठीं आणतात. नोकरी पेशाचे लोक मुद्दाम रजा काढून घरीं येतात. कधीं कधीं नवसानें रोटाचे गहूं वाढवतात.

या रोटाचा ' उगत भाज्या ' नांवाचा एक प्रकार आहे. तो नवस मानला असेल तरच करतात. त्याचा गहूं नेहमींच्या रोटापेक्षां कमी असतो.

परंतु तो शनिवारीं रात्रींच दळून ठेवतात. व रविवारीं मोठ्या पहांटेस उठून सैंपाक करून देवीला नैवेद्य दाखवून भानू उगवायच्या पूर्वीं म्हणजे सूर्योदयापूर्वीं खाऊन संपवून टाकायचा असतो. हा कानबाईचा विधि.

कानबाईला ' कानबाई—' राणबाई ' असेंही म्हणतात. आणि तिच्या पूजेंत चालणारे नारळ आणले वाण्याकडून आणि ठेवले पूजेंत, असे चालत नाहींत. तर ते परणलेले असावे लागतात. ते परणण्याचा जो एक समारंभ असतो तोही पुष्कळसा नवसामुळें किंवा कुळाचार म्हणून करतात. त्याला ' राणादेवीचें लग्न ' असें म्हणतात. हें राणादेवीचें लग्न ब्राह्मणाकडे लग्नमुंजींत किंवा ब्राह्मणेतरांकडे फक्त लग्नाच्या वेळीं होतें.

घरांतील कोणाचें लग्न किंवा मुंज राणादेवीची करावयाची असली म्हणजे लग्न किंवा मुंजीच्या विधीच्या आदल्या रविवारीं राणादेवीची स्थापना करितात. वाजत गाजत जाऊन कुंभार व सुतार यांच्याकडून संसाराला लागणाऱ्या वस्तू माठ, चूल, लहान भांडीं, परळ वगैरे व सुताराकडून पोळपाट, लाटणें, तिपाई वगैरे साहित्य घरीं आणून ठेवतात. नंतर पुन्हा वाजत गाजत जाऊन शेतांतून शक्य तोंवर आंब्याच्या झाडाखालून काळी माती पूजा करून आणतात, आणि तेथूनच एक दीप लावून वाटेनें न विझेल अशा बेतानें नीट सांभाळून आणतात. त्या मातीला ' कस्तुरी आणणें ' असें म्हणतात. ब्राह्मणांत हा विधि सोवळ्यानेंच करतात.

घरीं ती कस्तुरी आणि दीप आणल्यावर शेजारीं शेजारीं दोन चौरंगावर दोन कानबाईचे नारळ ठेवून चांगलें मखर सजवितात, व त्या कस्तुरींत गहूं पेरतात. त्या दिवसापासून रोज पुरणाचा स्वयंपाक आठ दिवसपर्यंत चालतो. निदान देवाला दिवसा एकदां नैवेद्य दाखवण्यापुरतेंतरी पुरण घालावेंच लागतें. सकाळ संध्याकाळ मंगलवाद्यें व आरती होते. आणि इष्टकार्य काय असेल तें या देवासन्निध करतात.

कांहीं रूढि अशा आहेत कीं, लग्न मुंज वगैरे जें कांहीं कर्तव्य असेल त्याच्या आधीं राणादेवीचें लग्न लागून गेलेंच पाहिजे. राणादेवीच्या लग्नाला मुहूर्त म्हणजे स्थापनेचा रविवार किंवा स्थापनेच्या रविवारापासूनचा आठवा रविवार.

त्या दिवशीं गोरज मुहूर्तावर घोड्यावर बसलेला असा सूर्याचा पुतळा मातीचा करून त्यांत आणि राणादेवींत अंतरपट धरून मंगलाष्टकें म्हणून लग्न लावतात. या लग्नांत वधूवरांचा गोत्रोच्चारही होतो. त्यांत वधू जी रणासन्नादेवी तिचें गोत्र अगस्ती. प्रवर तीन. अगस्ति, दाढ्य आणि अच्युत. वर सूर्य. गोत्र काश्यप. प्रवर तीन काश्यप, वत्सहरण व नैवध्रव.

राणादेवीची पितृपरंपरा त्वष्टा बाप, विधाता आजा, आणि धाता पणजा; सूर्याची परंपरा, कश्यप पिता, मर्ची पितामह, आणि अर्ची प्रपितामह अशी असते. राणादेवीचें नांव ' रन्ना सन्ना ' असेंही कोणी उच्चारतात.

आठ दिवसांनंतर नवव्या सोमवारीं सकाळीं राणादेवीची मिरवणूक काढून ती नदी किंवा दुसऱ्या एकाद्या जलाशयाजवळ नेऊन बोळवतात. बरोबर पहिल्या दिवशीं एका पांटींत काळ्या मातींत पेरलेले गहूंही घेतात. या आठ दिवसांत त्यांचीं रोपें साधारणतः वीतभर उंचीचीं होतात. याला धान्या किंवा धान्य असें म्हणतात. मुलें त्या रोपटांचीं आपल्या शेंडीला आणि वेणीला झेपटें लावतात.

एका कुटुंबाचीं दोन विभक्त कुटुंबें झालीं म्हणजे स्वतंत्र कुळाचार करण्याची जरूर भासते. आणि अशा वेळीं कानबाईचा सण करण्यासाठीं परणलेल्या नारळांची गरज लागते. ते नारळ या राणादेवीजवळ परणतात. राणादेवीच्या प्रथम स्थापनेच्या दिवशींच त्या देवीच्या आजूबाजूस गरजू लोक आपापल्या नव्या नारळांच्या जोड्या आणून ठेवतात. आणि राणादेवीचें लग्न लागतांच ते नवे नारळही परणले जाऊन कानबाईची पूजा करण्याला अधिकृत होतात. या नारळांच्या विवाहाबद्दल तेथें काम करणाऱ्या भिक्षुकांस चार पैसे दक्षिणा मात्र द्यावी लागते.

राणादेवीचें लग्न एक खर्चाची बाब असल्यानें फार विरळ होतें आणि होतें तेव्हां त्याचा गाजावाजाही फार होतो. यामुळें गरजू मंडळी परगांवाहून-सुद्धां नारळ परणण्याकरितां पाठवतात आणि या सर्वांवर कळस म्हणजे धनगर लोक लग्नें लावण्यासाठीं या राणादेवीच्या सन्निध आपले वधुवर घेऊन येतात.

ज्याच्या घरीं लग्न असेल त्याच्या दाराशीं घरच्या लग्नाच्या जोडीला बाहेरून आलेल्या अशा कधीं कधीं पांच पन्नास लग्नाच्या जोड्या येऊन टेपतात आणि लग्नाचा मुहूर्त रात्रीं असला तर मोठी त्रेधा होते. धनगर जातींत फारच लहानपणीं लग्नें करण्याची चाल आहे. पाळण्यांतल्या आणि अंगावरच्या पित्या पोरांचीं लग्नें लावलेलीं प्रस्तुत लेखकानें आपल्या डोळ्यानें पाहिलेलीं आहेत.

लग्नांत प्रमुख विधि ' हातोळा ' लावणें हा असतो. लग्नपत्रिका भटाची भटानें टाळी दिली कीं, त्या सुमुहूर्तावर वधूचे हात वरानें धरायचे म्हणजे ' पाणिग्रहण ' करायचें. याला हातोळा म्हणतात. असे हात बराच वेळ धरून ठेवून वधुपित्यानें कन्यादान केलें कीं मग तो हातोळा सुटतो. जेव्हां वधुवरांचीं वयें दहापांच वर्षांच्या मागें पुढेंच असतात, अशीं पांच पन्नास वधुवरें राणादेवीच्या मांडवापुढें दाटीवाटीनें बसतात. लहान पोरें बिचारीं रात्रीं निजून जातात आणि ऐन लग्नाच्या वेळीं कसा तरी हातोळा लागतो. त्या गडबडींत वधुवरांची अदलाबदल होणें तर सामान्य बाब आहे. अशा गोष्टी खुळ्यासारख्या शहरींही घडलेल्या आहेत.

लोक अडाणी असले तरी कांहीं बाबतींत कायद्याचा हेतु लक्षांत घेऊन आपापल्या पूर्वीं ठरलेल्या जोड्यांतच खरोखर लग्नें लागलीं असें समजून पिवळे होऊन संसाराला लागतात. असा थोडक्यांत हा कानबाईचा व तिचें मूळ जें राणादेवी त्याचा हा सोहळा आणि विधि आहे.

( धनगरांच्या राणादेवीच्या विधींची विशिष्ट माहिती एकोताखालीं येईल ). जसा ख्रिश्चनांत दीक्षितावांचून दुसऱ्यास धर्माची दीक्षा देण्याचा अधिकार नाहीं आणि यासाठीं पुष्कळसे ख्रिश्चन आपली बाप्तिस्माची परंपरा थेट पोप सेंटपाल आणि त्याच्यामार्फत खास येशूपर्यंत नेऊन भिडवतात. किंवा पारशी आपला अग्नि मूळ इराणांत आणि त्यांना अवेस्तांत दिसणारा उत्तरध्रुव जर पटला तर आज उदवाड्याच्या अग्यारींत धुमसत असणारा अग्नि जो एकदां उत्तरध्रुवावर पेटला तो आज तागायत इंधन घालून सारखा धगधगीत ठेवला आहे, असें सहज म्हणूं शकतील. तशीच प्राचीन परंपरा या राणादेवीची आहे. हा विधि अजून पोथीगत नाहीं. खानदेश पुरताच मर्यादित पण खानदेशांत ब्राह्मणापासून चांभारापर्यंत सर्वांस चालू आहे. भिल्ल, कोळी वगैरे कांहीं जाती आणि मानभावासारखे कांहीं पंथ हे सोडले तर कानबाईवांचून घर सांपडणार नाहीं आणि परणलेल्या नारळांची परंपरा जर अखंड राहिली असेल तर उघड उघड जेव्हां लग्नें व्यक्तिप्रधान नसून संघप्रधान होतीं, म्हणजे एका पुरुषसंघाबरोबर एकदम दुसऱ्या स्त्रीसंघाचें लग्न लागावें ही जी मानवी विवाहसंस्थेच्या उत्क्रांतीची पायरी त्या वेळची ही जुनी परंपरा असावी असें म्हणावेंसें वाटतें.

कै. राजवाड्यांनीं मराठी नात्यागोत्यांचे वाचक शब्दांचा मूळ अर्थ शोधतांना ‘ वहिनी ’ या शब्दावरून हीच गोष्ट ध्वनित केली आहे ( संशोधक त्रैमासिक ). हिंदीभाषेंत बहू हा एकच शब्द पत्नी आणि सून अशा अर्थीं वापरतात. त्याचें मूळ संस्कृत वधु आहे हें सांगणें नको. या विधीच्या प्राचीनत्वाला पोषक समाजशास्त्रदृष्ट्या त्याचा इतका निष्कर्ष पुरे. आतां ज्याच्या गाण्यांत सहा महिन्यांत रात्र आहे त्या विधींत असें उत्तरध्रुव-प्रदेशापर्यंत नेऊन भिडवितां येण्यासारखें कांहीं हातीं लागतें का तें पाहूं.

कोणताही विधि काळाच्या ओघांतून येतांना मूळ स्वरूपांत टिकून राहणें शक्य नाहीं. हें जितकें खरें तितकेंच मानवांच्या स्वाभाविक पुराण-प्रियतेमुळें त्याचें प्राचीनत्व किंवा वैशिष्ट्य दाखविणाऱ्या गोष्टींचा सवस्वीं लोप होणें हेंही शक्य नाहीं. खून पचवतां येत नाहीं अशी समजूत आहे. म्हणजे कोठें कसा पुराव्याचा सुगावा लागेल आणि खुनाला वाचा फुटेल याचा नेम नाहीं. तसेंच प्राचीन इतिहासाचें आहे. कोठें कसें त्याला तोंड फुटून तो जगाला ज्ञात होईल याचा नेमच नाहीं.

रना आणि सन्ना यांचें लग्न आणि त्यांबरोबर इतर मानवांचें लग्न यावरून खालील अनुमानें संभवतात.

लोकमान्यांचें ( Vedic Chronology and Vedang Jyotisha पान ४०।४१ ) यांवर सोम व सूर्य यांच्या विवाहाचा उल्लेख केला आहे. या वेदांतील सोम आणि सूर्या यांच्या विवाहाचें हें अवशिष्ट रूप ' रना सन्ना ' देवतांचा विवाह असावा असें वाटतें.

रना, आणि लाटिन Luna ल्यूना हें चंद्राचें वाचक आहे. लचा र होणें स्वाभाविक आहे. ( Giles Manual of Comparative Philology. पान १४६ ) आणि सन्ना हें सूर्याचेंच नांव आहे. इंग्रजी सन शब्द संस्कृत: शंन: म्हणजे आमचें कल्याण करणारा शिवः याचाच एक पर्याय आहे. आणि सूर्य ही पहिली कल्याणकारक देवता असल्यानें यांत रणासन्ना म्हणजे वैदिक किंवा वेदपूर्व सोमसूर्या यांचा विवाहच असें म्हणावेंसें वाटतें, आणि तेंच सयुक्तिक दिसतें.

कै. राजवाड्यांच्या मताप्रमाणें संस्कृत ही भाषा अनेक छोट्या छोट्या भाषांच्या मिश्रणानें बनली आहे. तसेंच त्यांनीं ऋषि वगैरे शब्दांची व्युत्पत्ति देतांना मराठींत न सांपडणारे परंतु इंग्रजींत आढळणारे Rush सारखे धातु उदाहरणादाखल घेतले आहेत; हें मुद्दाम या ठिकाणीं सांगावेंसें वाटतें. प्रस्तुत लेखकानेंही अहिराणींतील दहापंधरा अगदीं अगम्य वाटणारे शब्दांची इंग्रजी आणि नॉर्स भाषांतील समानार्थी शब्दांशीं सांगड घालून दाखविली आहे. तेव्हां रना याचा चंद्र अर्थ करतांना कोणाला चमत्कारिक वाटावयाचें कारण नाहीं. इंग्रजींतील रेना हें नाम स्वच्छ, शुद्ध अशा अर्थाचें आहे. हिंदींत रैन हा शब्द असून त्याचा अर्थ रात्र आहे. रैन म्हणजे जर रात्र तर रैना, रणा म्हणजे रात्रिदेवता चंद्र अगदीं सरळ ओघानेंच येतें. चंद्र आणि त्यावरचें हरण हें जगप्रसिद्ध आहे. चंद्राला मृगांक म्हणतात. पाश्चात्यांत deer ची एक जात रेनडियर आहे.

त्यांतील रेन शब्द मूळ ' आइस् लँडिक ' भाषेंतील Hreinn या शब्दांवरून बनला. उवड उवड हा शब्द हरण दिसतो. त्यांतील पहिला हचा उच्चार काळाच्या ओघांत गडप होऊन मग त्यापासून ' H ' ही गळून नुसता रेन शब्द राहिला, व तो Deer ला लावला म्हणजे कोणतेंही हरण असा अर्थ होतो. Deer याचा अर्थ कोणताही जंगली पशु असा एके वेळीं होता, परंतु आतां तो नुसता हरण अशा अर्थीच उपयोगांत येतो. आतां रेनडियर याचा शब्दशः अर्थ हरण पशु हा होतो. भाषेच्या उत्क्रांतींत पुष्कळशा तिच्यांतील कांहीं अक्षरें विशेषतः प्रारंभींचीं गळतात. अर्थात् रणा हें हरणाचें रूप आणि हरणाची देवी म्हणजे ' रणादेवी ' म्हणजे मृगांक चंद्रच असा माझा या शब्दापुरता युक्तिवाद आहे.

सवा आणि सूर्याचा युरोपियन सन ( Sun ) एकच वाटतो. रणादेवीचें लग्न सूर्याशींच लागतें. सोमसूर्या यांत सूर्या स्त्रीलिंगी आणि सोम पुल्लिंगी असा अर्थ निघतो. परंतु अधिकांश आर्यांचें पारडें चंद्राला स्त्रीलिंगी करण्याकडे असल्यानें यांत तो वधु बनला आहे.

सोम-सूर्या यांच्या विवाहाची चिकित्सा माघी पूर्णिमेच्या दृष्टीनें करतांना टिळकांनीं त्या दिवशीं चंद्र दृश्य असून सूर्य अर्थात् त्याच वेळीं दिसणार नाहीं असें ध्वनित केलें. परंतु ध्रुवप्रदेशावर चंद्र व सूर्य दोन्ही समोरासमोर दिसणें वसंत संपातानंतर येणाऱ्या पौर्णिमेला शक्य आहे. आणि ते असे समोरासमोर दिसण्यांतच लग्न लावण्याचें वैशिष्ट्य आहे.

फाल्गुनी पौर्णिमासी संवत्सरस्य प्रथमा रात्री व फाल्गुनी विवाह नक्षत्र या दोन गोष्टींचा समुच्चयानें विचार करतांना हेंच दिसतें. चंद्र व सूर्य यांच्या पातळींत ५ अंशांचा कोन असल्यानें पुष्कळ वेळां सूर्य क्षितिजावर येतांना विरुद्ध बाजूला चंद्र पांच अंश वर दिसणें ध्रुवप्रदेशावर शक्य आहे.

याला सबळ करणारी आपल्यांतील एक कल्पना देतों. दिवसा पाऊस पडत असला तरी आकाशांतील ढगांमुळें पाऊस पडतांना क्वचित्च सूर्याचा उजेड पडतो. परंतु कधीं कधीं संध्याकाळीं पावसाची बारीकशी सर येते आणि ती सर सोडणारे ढग आकाशांत वर डोक्यावर असल्यानें पश्चिमेकडून येणाऱ्या सूर्य किरणांस आडवूं शकत नाहींत. याचा परिणाम ऊन आणि पाऊस हे एकाच वेळीं दिसतात. हें दृश्य विरळच असतें, परंतु जेव्हां दिसतें तेव्हां खानदेशांत मुलें टाळ्या वाजवून नाचून कोल्हाकोल्हीचें लग्न लागलें म्हणतात. म्हणजे अंधार आणि पाऊस यांत अनपेक्षितपणें सूर्यदर्शन होण्याशीं लग्नाचा संबंध जोडला गेलेला दिसतो. तो असा. दीर्घ, रात्रीनंतर उदयाबरोबर होणाऱ्या आनंददर्शक चालीचा ' रणासन्नाचें लग्न ' हा अवशेष आहे असें वाटतें.

वस्तुतः जर्मनी, नॉर्वे, ग्रीस, इराण व हिंदुस्तान यांत सहा महिन्यांच्या रात्रीच्या दंतकथा आढळतात. परंतु उपरोक्त कानबाईचें गाणें आणि त्यांतील हा सहा महिन्यांच्या रात्रीचा उल्लेख यांत दंतकथेपेक्षां अधिक तथ्य आहे, हें दाखविण्यासाठीं त्या विधीचें विस्तारपूर्वक विवेचन करून त्यांतून वैदिक आणि तत्सम कल्पनांचा सुगावा काढण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् नुसत्या सहा महिन्यांच्या रात्रींच्या दंतकथा हेही ध्रुववस्तीचे अवशेष आहेत; असें सर्व विद्वानांचें एकमत आहे. त्यांत असे वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख हेतर त्या मानानें अधिक महत्वाचे अवशेष होत असेंच कोणाचेंही मत होईल, अशी आशा आहे.

## ३ ' उठ देव सांवळा, बोर भाजी आंवळा '

कार्तिक शुद्ध एकादशीस प्रबोधिनी एकादशी म्हणतात. त्या दिवशीं देव उठतात व लग्नसराईला आरंभ म्हणून दुसऱ्या दिवशीं तुलसीविवाहानें सुरवात होते. बरोबर चार महिने पूर्वी आषाढ शुद्ध एकादशीला शयनी एकादशी म्हणतात. त्या वेळीं देव निजतात, चातुर्मास्याला आरंभ होतो आणि भिक्षावृत्तीनें राहणारे साधु या चार महिन्यांत कुठेंतरी एकाच जागीं मुक्काम ठोकतात.

देवळांतून रोज दुपारीं देव झोंपतात. त्यासाठीं दरवाजे बंद होतात. पुन्हा संध्याकाळीं उठतात. रात्रीं शेजारती होते आणि पुन्हा झोंपतात व पहाटेस पुन्हा काकडारती होऊन उठतात. परंतु या चातुर्मास्याच्या आरंभाला येणारी जी शयनी व शेवटीं येणारी प्रबोधिनी या दोन एकादशांचा संबंध आणि नामकरण तसेंच चातुर्मास्यांत प्रवास ( यती संन्यासी यांना ) व विवाह हे वर्ज्य असण्याच्या मुळाशीं कांहीतरी प्राचीन कारणपरंपरा दिसते. तिचा मागमूस असा फक्त पंचांगांत आणि ग्रंथांतच नसून प्रत्यक्ष व्यवहारांतही जीव धरून आहे.

### खोपटी उठवणें

खान्देशांत ज्यांच्या घरीं कुळदेवतांचे टांक, गणपती वगैरे आहेत ते शेतकरी या कार्तिकी एकादशीचे दिवशीं संध्याकाळीं आपल्या दारापुढें सडासंमार्जन रांगोळया घालून मग तेथें एक चौरंग मांडून त्यावर देव ठेवतात. व देवावर एक पांचचार ऊंसांचें खोपटें करतात. त्याला ' खोपडी ' म्हणजे ' घरकुल ' असें म्हणतात. त्या ऊंसाच्या खोपडीवर एक नवें धोतर किंवा उपरणें गुंडाळतात. ब्राह्मण येऊन देवांची पूजा करतो. या देवांत धंगड्या देव म्हणजे बाळकृष्ण असण्याबद्दल फारच आग्रह असतो. पूजेला लागणाऱ्या साहित्यांत बोरें, हरभऱ्याची भाजी, म्हणजे शेतांत हरबरा पेरल्यानंतर तीं झाडें उगवून वीतभर ऊंचीचीं झालीं कीं त्यांचीं अग्रें मुद्दाम खुडून टाकतात. याचें कारण त्यायोगें झाडाला मुळाजवळून किंवा मध्यें अधिक फांटे फुटून बहार जास्त यावा. ती खुडलेली भाजी वाळवून ठेवतात. आणि वेळीं अवेळीं वाळलेलीं बोरें घालून शिजवून भाकरीशीं खातात. या खोपडीला अशी गेल्या वर्षीची हरभऱ्याची भाजी, बोरें व आंवळा अशा वस्तू लागतात.

देवाची पूजा आणि आरती आटोपली म्हणजे भटजी आपल्या हातानें तें ऊंसाचें खोपटें हाकवितो, आणि त्या घरचीं पोरें व यजमान हातांत घंटी,

ताट, ताम्हण वगैरे घेऊन त्या खोपडी भोंवतीं वाजवत फिरतात, व तोंडानें ' उठ देव सांवळा, बोर भाजी आंवळा, ' ' उठ देव सांवळा, बोर भाजी आंवळा ' असें म्हणून नाचतात, व कांहीं देवाचा चौरंग उचलून धरतात.

देव उठवल्यानंतर त्याच चौरंगावरील देव काढून नंतर एका ५।४ वर्षांच्या मुलाला त्यावर बसवतात व त्याला त्या वर्षीं धान्याचे भाव राव काय येतील याबद्दल प्रत्येक वस्तूचें नांव घेऊन प्रश्न विचारतात. हीं मुलें जें सांगतील तें भविष्य खरें ठरतें, अशी पूर्वापार समजूत असते. ज्याप्रमाणें गुढीपाडव्याच्या दिवशीं पंचांग श्रवण करून भावी वर्षाचें भविष्य ऐकून घेण्याचा एक शास्त्रीय प्रघात आहे, तसाच हा कार्तिकांतील एकादशीला लहान मुलांकरवीं भविष्य जाणण्याचा प्राचीन प्रघात दिसतो. संवत्सराचा वर्षारंभ जरी कार्तिकांत असला तरी वस्तुतः ज्या वस्तूंचे भाव विचारायचे त्यांतील तिळी, भुईमूग, ज्वारी, कपाशी वगैरे वस्तूतर आधींच घरांत येऊन पडतात.

झालें. देव उठले. लग्नांना मोकळीक. वडे, पापड, कुडंया वगैरे करण्याला मोकळीक होते. संतमहंत आपल्या परिवारासह मुक्काम हलवून गांवोगांव संचाराला निघतात. देव निजले होते ते उठले असें समजतात.

या ' उठ देव सांवळा ' च्या व खोपडी हालवण्याच्या मुळाशींही ध्रुवप्रदेशांतील वास्तव्य आहे.

कृत्तिकांपासून देवयानाला सुरवात होत असे. कृत्तिकांत वसंतसंपात होता आणि कृत्तिका, नक्षत्रांचें मुख होत्या वगैरे गोष्टी अगदीं विवेचनपूर्वक स्पष्ट आणि साधार ' ओरायन ' च्या तिसऱ्या प्रकरणांत येऊन गेल्या आहेत.

" तैत्तिरीय संहितेच्या काळीं वसंतसंपात कृत्तिकांमध्यें होता असें दाखविण्यास सबळ आधार मिळतो. कारण उदगयनारंभ माघ पूर्णिमेला झाला; म्हणजे दक्षिणायनारंभ मघा नक्षत्रांत सूर्य असतांना झाला पाहिजे; म्हणजे अर्थात् वसंतसंपात कृत्तिकांमध्यें आलाच. अशा रितीनें वेदांगज्योतिषाच्या खेरीज तैत्तिरीय संहिता व ब्राह्मण यांत आढळणाऱ्या चार निरनिराळ्या वचनांवरून वसंतसंपात कृत्तिकांमध्यें होता हें स्पष्ट दाखवितां आलें. एक, नक्षत्रचक्रास व तदधिष्ठित देवतांस कृत्तिकांपासून आरंभ केलेला आहे असें सांगणारें वचन. दुसरें, कृत्तिका, नक्षत्रांचें मुख आहेत असें स्पष्ट वचन. तिसरें, कृत्तिका देवनक्षत्रांचा आरंभ आहे हें वचन; व चवथें, माघ पूर्णिमेला उदगयनारंभ होत असे असें स्पष्ट सांगणारें सत्रारंभदिवसाविषयींचें विवेचन. या सर्व ठिकाणीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणें वसंतसंपाताचा संबंध कृत्तिकांशीं लाविलेला आहे; व ही गोष्ट सिद्ध करण्यास आणखी पुराव्याची गरज आहे असें वाटत नाहीं " ( वेदकालनिर्णय पा. १८ ).

आतां त्याच्या पुढें थोडें असें अनुमान केलें कीं, हिंदुस्तानांतच दक्षिणायन, उत्तरायण ऊर्फ वेदकालीन देवयान व पितृयान ही कालविभागणी होण्याचें कारण नाहीं. देवांचा प्रकाशमय काल पितरांचा–अंधकारमय काल असा असल्यानें ज्या अर्थीं देवयान ही संज्ञा कालगणनेच्या दृष्टीनें ध्रुवावरच जन्माला येऊन तेथेंच सार्थ झाली, तशी ती हिंदुस्तानांत जन्माला येण्याचें कारणच नव्हतें. कारण येथें उत्तरायणांत आणि दक्षिणायनांत दिवसांच्या लांबींत फरक होत असला तरी तो ध्रुवाइतका होत नाहीं. आणि तेथें दक्षिणायनाचा बाऊ होता तेवढा येथें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं आणि नव्हतें.

" दक्षिणायनांत मरण येणें वाईट आहे अशी जी आपल्याकडे कल्पना आहे तिचें मूळही या उत्तरध्रुवावरच्या दीर्घ रात्रींतच आहे. "

( आर्क्टिक होम पा. २०४ ).

उत्तर ध्रुवावर असणारा समाज ( Nomadic ) भटका किंवा फिरता असावा. त्यांचें खोपटी हालवण्याची वहिवाट हें आणखी एक प्रत्यंतर वाटतें. खोपटी हालवली कीं, तळ हालवण्याला मुहूर्त झाला. कडक थंडीच्या चार महिन्यांत तो समाज आणि त्यांचे देव अर्थात्‌च घोरत एकाच जागीं पडत असावेत. आणि वसंताच्या सुरवातीला एकदम जागे होऊन आपला डेराडंडा हालवून प्रवासाच्या पूर्वतयारीला लागत असावेत. अशा प्रवासाच्या आधीं आपल्या संसाराला लागणारी सर्व तरतूद तेव्हांच उरकवून घेणें ज्यास्त सोयीचें असल्यानें लग्नाचा धडाका याच वेळीं उडणें ज्यास्त श्रेयस्कर असेल. चार महिनेपर्यंत चाललेली आवडनिवड आणि प्रणयाराधनाचा निष्कर्ष शेवटीं एका दीर्घ काळोखानंतर उदयाचलीं येणाऱ्या सूर्याच्या सुंदर आणि कोंवळ्या किरणांत त्याच्या साक्षीनें कायमचा जगजाहीर करण्यांत येत असेल.

कारण यानंतर सर्व टोळ्या किंवा कुळें उद्योगानिमित्त पांगून एकमेकां-पासून दूर जात असावींत व त्यानंतर जीवनकलहाच्या धकाधकींत विवाहाचा विचार करण्यासही फुरसत रहात नसावी.

" सहा महिन्यांच्या रात्रींतील ध्रुवभूमीची स्थिति वर वर्णिली आहे. सूर्योदय झाला म्हणजे तेथील स्थितींत विलक्षण पालट होत असे. आकाशांत सर्वत्र प्रकाश पसरे, पाऊस पडूं लागे, वृक्षवेली वाढीस लागत, नद्या भरून येत, जिकडे तिकडे फलपुष्पांची समृद्धि होई, पशुपक्षी आनंदानें नाचूं बागडूं लागत, माणसांचे अनेकविध व्यवसाय चालू होत, सगळी सृष्टि जणूं काय हसूं लागे.

" तेथील भाषाही चमत्कारिक असे. सूर्य अस्तास गेला म्हणजे सहा महिने आकाशांत सतत चालून दमलेला देव निजावयास गेला असें म्हणत.

पहांटेच्या प्रकाशाचे तांबडे पिवळे पट्टे आकाशांत दिसूं लागले, म्हणजे इंद्राच्या देदीप्यमान रथावरील ध्वज दिसूं लागले असें म्हणत. सूर्य उगवला म्हणजे विष्णु झोंपेंतून उठला, सूर्योदयाबरोबर प्रभातेचा शेवट झाला म्हणजे प्रिय-कराच्या प्रथमालिंगनानें उषा मेली, असें ते लोक म्हणत. जड सृष्टींत जें जें कांहीं घडे तें तें सर्व देवराक्षसादि अतिमानुष जीव ज्ञानतः करितात, ते देवराक्षस खातेपिते व चालते बोलते आहेत, प्रार्थनेनें व नैवेद्यानें ते तृप्त होतात, दुःशब्दानें ते रागावतात, असा त्यांचा समज असे. सूर्य उगवल्यावर उत्पन्न होणारीं फुलें व फळें हीं झ्यूसच्या ( आकाशाच्या ) समागमानें डीमीटरला ( पृथ्वीला ) झालेलीं मुलें होत, अशी त्यांची कल्पना होती. विष्णु उठल्याबरोबर त्याचें पृथ्वीशीं लग्न झालें. या लग्नापासून धनधान्यरूप अनेक अपत्यें होतील अशी त्यांची खातरी असे. हिंदू लोक विष्णूचें पृथिवीशीं लग्न झालें असें म्हणतात. जर्मन थॉरचें झिझाशीं झालें, असें म्हणत. या लग्नाला मूर्त रूप देण्यासाठीं त्या वेळच्या लोकांनीं स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियांची योजना केली होती. उभा दंड हें सूर्याचें निदर्शक ( Symbol ) आणि पेला, पेटी किंवा गलबत यांच्यासारखी एखादी पोकळ वस्तू पृथिवीचें निदर्शक मानीत असत. मनुष्याला अत्यंत अवश्य जें विपुल धनधान्य त्यास प्रसविणाऱ्या पृथिवीच्या निदर्शकाकडे उत्सवाचा भर असे, असा कोक्स साहेबाचा या बाबतींत अभिप्राय आहे." ( शिमगा पा. २१ ) ( Cox, Mythology of the Aryan Nations ).

भीलकोळी म्हणून सह्याद्रींत एक जात आहे. या जातीचे लोकांत लग्नाची मोठी गमतीची चाल आहे. वधुवरांचें पटलें म्हणजे भटाभिक्षुकांची वाट न पाहातां ते संसाराला लागतात आणि गांवांत कुठें एकादें लग्न निघालें तर ती संधि साधून त्याच मांडवांत जाऊन आपणही पिवळे होऊन घेतात. केव्हां केव्हां ते पतिपत्नी म्हणून एकमेकांजवळ राहूं लागून त्यांना एकाद-दुसरें मूलही होऊन जातें. आणि नंतर मग ते आपल्या कृतींत आणल्या गेलेल्या लग्नाला विधीची जोड देतात.

पश्चिम खानदेशांत शिरपूर तालुक्यांत सांगवी म्हणून एक आग्रारोडवर सातपुड्याच्या पायथ्याशीं गांव आहे. तेथें हे भीलकोळी शेती करण्यासाठीं येऊन राहिले आहेत. त्यांच्यांत प्रस्तुत लेखकानें, एका लहान वधुवरांच्या लग्नांत आधींच नवरा बायको म्हणून नांदून लेकुरवाळीं झालेल्या जोडप्यास पिवळें होतांना पाहिलें आहे.

भीलकोळी उत्तर ध्रुवावरचेच आहेत, आणि त्यांची ही चाल तेथीलच आहे, असें ध्वनित करण्याचा माझा हेतु नाहीं. मला फक्त असें दाखवावयाचें

आहे कीं समाजाच्या उत्क्रांतीबरोबर विवाहाला अशा अनेक पायऱ्यांवरून जावें लागणें शक्य आहे.

दुराणांतील ( Moota Marraige ) हंगामी लग्नपद्धति हीसुद्धां अशा भटक्या समाजांतच जन्माला आली असावी. असो. या प्रकरणांतून मला येवढेंच दाखवावयाचें आहे कीं ध्रुवप्रदेशांतील वास्तव्यांत घडणाऱ्या चातुर्मास्याच्या आवश्यक मुक्कामाचें स्मारक हें, शयनी-प्रबोधिनी एकादशीमधील विवाह वगैरे मंगलकार्यशून्य निष्क्रिय जीवन असून तुलसीविवाह हा सुमुहूर्तांचा किंवा सामुदायिक मुहूर्तांचा विवाह असून लोक तो केवळ रूढि म्हणून पाळतात.

ह्यांत आणखी एका अज्ञानी मुलाकडून येत्या वर्षाचें भविष्य जाणण्याची रीत ही त्याच्या स्थळ आणि काळावर प्रकाश पाडणारी बाब आहे. कार्तिकी एकादशीला शेतकरी अर्धेंअधिक शेतकीचें काम करून चुकतो. आणि नंतर हें भविष्य जाणण्याचें नाटक करतो. अर्थात् एके काळीं हे वर्षारंभीं होत असले पाहिजेत. त्याखेरीज ही प्रथा प्रचारांत असणें शक्य नाहीं. शास्त्रापेक्षां रूढि बलवान असते याचें कारण ती पुरातन असते.

तेव्हां आज एकविसाव्या शतकांत कार्तिकी एकादशीच्या दिवशीं खेडो-पाडीं खानदेशांतील हिंदुसमाजांत जो ' उठ देव सांवळा, बोर भाजी आंवळा ' असें म्हणण्याचा परिपाठ सुरू आहे, हा त्या समाजाच्या एक वेळच्या ध्रुव-प्रदेशावरील वास्तव्याचें निदर्शक आहे, असें अनुमान करण्यांत, घाई, दुरान्वय किंवा घरसोड होत आहे असें इतिहासज्ञास वाटेल असें वाटत नाहीं.

---

# ४ एकोत

खानदेशांत ' एकोत ' या नांवाचा एक कुळाचार आहे. त्याचा विधि एका रात्रीचाच असतो, परंतु त्यासाठीं फारच खटाटोप व खर्च करावा लागतो. हा चातुर्मास्य व अस्त वगळून कधीं एकाद्या लग्नमुंजीच्या निमित्तानें आधीं किंवा कित्येकांच्या घरीं नित्याचा असतो. ज्या वर्षी एकोत होणार नाहीं त्या वर्षीच्या एकोता निमित्ताचा पांच पैसे, सात पैसे असा कर काढून ठेवतात, व असे साठोसाठचे पैसे ज्या वर्षी एकोत होईल त्या वर्षी त्यांत खर्च करतात.

एकोतासाठीं सूर्योदयानंतर घरें सारवण्यापासून आरंभ करून संध्या-काळपावेतों सर्व वस्तूंची सिद्धता करून ठेवतात. त्या दिवशीं घरांतील एक प्रमुख पुरुष व स्त्री सकाळपासून सूर्यास्तापर्यंत अगदीं तोंडाला पाणीसुद्धां

न लावतां राहतात. सूर्यास्तानंतर आंघोळ करून मग तीं देवाची पूजा करतात. त्यांपैकीं पुरुषास भगत म्हणतात.

धनगरांत या विधीची व राणादेवीच्या विधीची थोडी निराळी रीत आहे. सर्वच मंडळी रात्रींतून सैंपाक करून जेवून सूर्योदयाच्या आंत सर्व कारभार आटोपतात. त्यासाठीं कुंभाराकडून कांहीं भांडीं मातीचीं व सूप टोपल्या बुरुडाकरून आणतात. परंतु धनगरांत याशिवाय विशेष म्हणजे आपलें नातेवाईक गणगोत जें येईल त्या सर्वांना पुरून उरण्याइतके कधीं एक मण किंवा दोन मण गहूं ज्या रात्रीं एकोत असेल त्या रात्रींच सूर्यास्तानंतर पुरुषमंडळीही लागून दळून काढतात. रात्रींतच त्यांच्या पुरणाच्या पोळ्या वगैरे सैंपाक करून या एकोतासाठीं ज्या सात गवरणी निवडल्या असतील त्यांना आधीं भोजनें देतात. याला ‘ भोजन भरणें ’ म्हणतात.

ज्याच्या घरीं एकोत असेल तो, ज्या स्त्रियांच्या शरिरावर कांहीं व्यंग नाहीं, अशा कुमारिका आणि चांगल्या आचरणाच्या सात स्त्रियांची या व राणादेवीच्याही विधीसाठीं ‘ गवरणी ’ म्हणून योजना करतो. गवरणी हें गौरीचें अनेकवचन आहे. त्यांच्या जोडीला एक भगत आणि दुसरा साधाभोळा भगत ( खानदेशी मूळशब्द ‘ आयाभोया भगत ’ ) अशीं नऊ पात्रें महत्त्वाचीं असतात. एकोताच्या आदल्या दुपारीं या लोकांना विशेषतः गवरणींना अभ्यंगस्नान घालून नवीं वस्त्रें देतात. त्यांत चोळी पांढऱ्या कापडाची असून तिचे कांठ फक्त हळदीनें पिवळे करतात. त्यांची गांवांतून मिरवणूक काढतात. त्यांच्या हातांत कलश देऊन त्यांतून खारका मनुका वगैरे भरतात.

रात्रीं करावयाच्या सैंपाकासाठीं एकजात बोरीचींच लांकडें वापरतात. एका ब्राह्मणाच्या सांगण्यांत असें आलें कीं, “ एकोताचा सैंपाक करण्यासाठीं जी चूल पेटवतात ती आगपेटीनें पेटवून चालत नाहीं ” तर चकमकीची चाल असावी असें दिसतें.

धनगरमंडळींत सूर्यास्तानंतर गहूं दळण्यालाच आरंभ होतो असें नव्हे तर एरंडीपासून दिव्याकरितां एरंडेलही त्याच वेळीं काढून दिवे लावतात, व रात्रींतच सैंपाक सर्व मण दोन मणांचा करून टाकून सूर्योदयाच्या आंत नेमलेल्या गवरणी व दोन्ही भगत अशांना भोजनें भरतात म्हणजे त्यांच्या वांट्याला येणारें अन्न त्यांच्या पुढें वाढतात.

अन्नांत पुरणाच्या पोळ्या, हरबऱ्याच्या डाळीचे मुटकुळे असतात. त्यांना नारळें म्हणतात. भाताला मोगरा म्हणतात. गवरणी व भगत यांच्या वांट्याला पंधरावीस माणसांना पुरेल इतकें अन्न येतें. त्यांना अन्न वांटून

झालें म्हणजे मग इतर लोकांना जेवण्याला मोकळीक होते. दुसऱ्या दिवशीं सूर्योदय झाला म्हणजे त्या गवरणींची वाजत गाजत मिरवणूक काढून त्यांना बोळवतात.

गवरणी म्हणून निवडलेल्या स्त्रिया कधीं कधीं एकोतवाल्याच्या गांवापासून पंचवीस कोसांवरूनही आणाव्या लागतात. येतांना त्यांना सवडीनें येण्याची मोकळीक असते. परंतु एकोताच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं तेथून निघाल्यानंतर सूर्यास्ताच्या आंत त्यांनीं आपल्या गांवीं पोहोंचण्याचा नियम असतो. यासाठीं सर्व सगेसोयरे मदत करण्याला तयार असतात, आणि एकोताच्या गांवापासून गवरणीच्या गांवापर्यंत निरनिराळ्या टप्यावर नव्या बैलजोड्या तयार ठेवतात. गवरणीच्या गाडीला बैलच चालतो. घोडा चालत नाहीं. अशा रितीनें भोजनांत मिळालेलें अन्न घेऊन ती गवरणी आपल्या गांवीं येते. धनगराव्यतिरिक्त इतर मंडळींत गवरणीचा विकल्प असतो. भगत सर्वांत लागतो.

या एकोताचा महा-एकोत या नांवाचा एक प्रकार आहे असें म्हणतात. त्यांत रात्रींतून धान्य दळणेंच नव्हे तर एकजात आंब्याच्या लांकडापासून पोळपाट, लाटणीं, बसण्याचे पाट, दिवे ठेवण्याच्या दिवठाण्या, तिपाया, घरट्यां वगैरेही एका रात्रींतच कराव्या लागतात आणि हें काम अतिशय खर्चाचें, खटाटोपाचें व त्रासदायक असल्यानें सहसा कोणी करीत नाहींत असें म्हणतात. परत, अशा या महा-एकोतानंतर सर्व वर्षभर पुरेल इतकें धान्य वगैरे सर्व संसाराला लागणारें साहित्य आधींच आणून ठेवतात. बारा महिनेपर्यंत कांहींही विकत आणावयाचें नाहीं असा नियम असतो, असें सांगतात. तें करतांना घरही नवीनच बांधलेलें असावें लागतें.

विधवा मृत झाली तर तिच्या प्रेतविधींत कसलाच शृंगार कोणत्याही हिंदू-जातींत म्हणजे धनगरांतसुद्धां करीत नाहींत. परंतु एकदां जी स्त्री रणादेवीच्या लग्नांत किंवा एकोतासाठीं गवरणी झाली होती, ती मरतांना विधवा असली तरीही तिला हळद, कुंकू, गुलाल, फुलांची फडकी वगैरे अलंकार घालून दहन न करतां पुरतात. ज्यांच्या अंगांत एकादा देव येतो अशा स्त्री किंवा पुरुषास पुरण्याची वहिवाट आहे. यावरून गवरणीची रूढि वैधव्यमूलक अलंकारत्यागाच्या रूढीपेक्षां जुनी आहे म्हणावयाची.

हा या एकोत नांवाच्या कुलाचाराचा थोडक्यांत तपशील आहे. याचा विचार करतांना हा मूळचा दीर्घ रात्रींतला असावा, हेंच स्पष्ट दिसतें. आणि अशा दीर्घ रात्रींत पूर्वी रात्रि-सत्रें करीत हें सांगावयास नकोच. काळमानानें

विधींत कांहीं बदल झाला असला तरी त्यांतून या रात्रिसत्रांचेंच चित्र दिसतें, हें फारसें भाष्य न करतांही कळून येण्यासारखें आहे. हिंदुस्तानांत एका रात्रींतून घिसाडघाई करून असा समारंभ पार पाडण्यांत काय वैशिष्ट्य असेल! आज साहित्य आणि साधनें सुलभ असतांनाही हा विधि उरकवतां- नाही नाकीं नऊ येतात, असें ज्यांच्याकडे तो कुळाचार आहे ते लोक सांगतात. या पूर्वीच्या काळीं जसजसें मागें जावें त्या मानानें अडचणी आणि साहित्याची दुर्मिळता जास्त. हिंदुस्तानांतल्या जास्तींत जास्त १२।१४ तासांच्या रात्रींत हें प्रकरण जन्माला येणेंच अशक्य आहे. जेथें रात्रीचा अवधि कांहीं महिन्यांचा असेल त्या प्रदेशांतच हे एकोताचे आचार उत्पन्न झाले असले पाहिजेत, असेंच कोणालाही साधकबाधक विचार करून म्हणावेंसें वाटेल, आणि तसा त्याला एक आधाराचा धागा वैदिक वाङ्मयांतून मिळतो.

"एकत, द्वित आणि त्रित ऊर्फ पहिला, दुसरा आणि तिसरा अशा तीन बंधूंची गोष्ट तैत्तिरीय ब्राह्मणांत आलेली आहे. द्वित आणि त्रित वेदांत आलेला आहे. त्रित या वैदिक देवाला प्राप्त्य म्हणजे पाण्यापासून उत्पन्न झालेला असें विशेष लाविलें आहे. त्रिताचा प्रकाशदेवतेशीं संबंध असून काळपरत्वें तो तमोमय कूपांत पडलेला होता असें दिसतें."

( आर्क्तिक होम. 'वैदिक कथा पान २४३ ).

उपरोक्त उताऱ्यांवरून एकत ही एक देवता होती असें दिसतें. त्यांपैकीं त्रिताचा प्रकाशाशीं संबंध होता म्हणजे पूर्वीच्या एकत आणि द्वित यांचा अंधार आणि संधिप्रकाश यांशीं ओघानेंच संबंध येतो आणि एकोताचा रात्रीचा आग्रह हा तैत्तिरीय ब्राह्मणांतील एकत म्हणजेच आजचा प्रचलित एकोत हें स्पष्ट करतो. तेव्हां हा असा निष्कर्ष काढण्यांत कोणाला कांहीं चूक वाटत असली तरच नवल म्हणावयाचें!

## ५ हाड्या उत्राण

खानदेशी ऊर्फ अहिराणी भाषेंत 'हाड्या उत्राण' असा एक शब्द- प्रयोग आहे. एकादा कामचुकार, आळशी किंवा उपद्यापी माणूस इकडे तिकडे भटकत असला तर त्यास उपमेनें 'हाड्या उत्राण' म्हणतात. चुकार मुलें शाळेंत जाण्याऐवजीं इकडे तिकडे भटकत राहिलीं तर त्यांस 'हाड्या उत्राण' म्हणण्याची एक प्रकारची शिवीच होऊन बसली आहे. शिरपूर तालुक्यांत या शिवीचा ऊर्फ वाईट उपमेचा सर्रास उपयोग करतांना प्रस्तुत लेखकानें निरक्षर बायाबापड्यांस व शेतकऱ्यांस पुष्कळ वेळां पाहिलें आहे.

हाड्या-उत्राण या शब्दांत हाड्या आणि उत्राण या दोन शब्दांचा समास झाला आहे. हाड्या म्हणजे कावळा आणि उत्राण म्हणजे संक्रांत. मकर संक्रांतीला उत्राण म्हणण्याचा खानदेशांत सरसहा परिपाठ आहे. यंदांची संक्रांत गाढवावर बसली असें म्हणावयाचें तर 'आवननी उत्रान गधडावर पसेल से' असेंच खानदेशी लोक म्हणतील आणि संक्रांतीच्या कराला उत्रानना ( उत्रानचा ) कर असेंच म्हणतात.

तेव्हां कावळा आणि संक्रांत यांचा जो हा सामासिक शब्द वाईट उपमेदाखल प्रचारांत आहे, त्याचा अर्थ काय हें पाहिलें पाहिजे. मराठींत संक्रांत म्हणजे संकट असा अर्थ होतो. संक्रांत भटकते हें विश्रुतच आहे. तेव्हां 'हाड्या–उत्रान' याचा अर्थ ( १ ) कावळ्यासारखी संक्रांत किंवा ( २ ) कावळ्याबरोबर भटकणारी संक्रांत असा होऊं शकेल. यांत कोणता अर्थ घ्यावयाचा, त्याच्या आधीं संक्रांतीचें ऐतिहासिक आविष्करण कांहीं करतां येतें काय आणि तें काय करतां येणें शक्य आहे, याचा थोडक्यांत विचार करतों.

संक्रांत म्हणजे संकट, हा रूढ अर्थ आहे. मूळ अर्थ सूर्याचें एका राशीवरून दुसऱ्या राशींत गमन. विशेषतः मकर राशींत गमन. या मकर संक्रांतीचा देवता म्हणून पूजा करण्याचा परिपाठ सुरू झाला आहे. आणि या देवतेचें वर्णन एखाद्या अक्राळविक्राळ राक्षसी सारखें असून ती ज्या ज्या वस्तूंचा स्वीकार करते त्या त्या महाग होतील, किंवा नष्ट होतील. क्रयविक्रय भीतिदायक होईल. ज्या दिशेकडून येते तिकडे सौम्य, जिकडे जाते तिकडे दुःख, जिकडे पहाते तिकडेही हानि, असें संक्रांतीचें फळ, सालोसाल आपण पंचांगांतून वाचतों. तिच्या वाहना-उपवाहनामध्यें गाढव, डुकर, हत्ती, घोडा, वाघ, सिंह, उंट, मेंढा वगैरे प्राणी असून खाद्यांत भिक्षान्नापासून इतर अनेक पदार्थ, टिळा मातीपासून कस्तुरीपर्यंत व वस्त्रें नागवी ते रेशमी वस्त्रापर्यंत सर्व तऱ्हेचे पर्याय त्यांत येतात.

या सर्व गोष्टींतून ऐतिहासिक घटनेवर जर कांहीं प्रकाश पडत असला तर तो असा पडणें शक्य आहे कीं, एके काळीं उत्तरायणामुळें ज्या देशांत सूर्य समृद्धीला कारण होत असेल त्या देशांत दुसरीकडचे लोक अशा संधीला घेऊन लुटालूट करून जात असावे व हें लुटालुटीचें, वेळ प्रसंगीं मनुष्य-बळाच्या अभावीं भिक्षेचें काम कित्येक वर्षे, पिढ्या चाललें असलें पाहिजे. त्याचें स्मारक हें संक्रांतीचें वर्णन व पर्व आणि तन्निमित्त करावयाचीं दानें वगैरे गोष्टी होत.

खानदेशांतील शहादें, तळोदें तालुक्यांतील गव्हाच्या हंगामाच्या वेळीं दूरदूरचे लोक गहूं कापण्यासाठीं येतात. येतांना आपल्या कोंबड्या बकऱ्या

वगैरे पाळींव जनावरें बरोबर आणतात. गहूं कापतात. साधलें तर चोऱ्याही करतात. याच संधीला ब्राह्मणापासून फकिरापर्यंत सर्व तऱ्हेच्या भिक्षेकऱ्यांची एक प्रकारें या तालुक्यांवर टोळधाडच लोटते. सध्यां बंदोबस्त ठीक असला तरीही खळयामळयांतून धान्याच्या चोऱ्या बेसुमार होतात. पूर्वीच्या काळीं पंजाबासारखे सुपीक प्रदेश सरहद्दीवरच्या पठाणांच्या टोळधाडीला पिकांच्या हंगामांत दरसाल बळी पडत आणि आतांही पडत आहेत.

अगदीं प्राचीन इतिहासांतही असा दाखला सांपडतो. एलामांत कस्साईट नांवाचे लोक गव्हाच्या हंगामांत घोड्यावर बसून येत. पुढें त्यांचेंच तेथें राज्य झालें, असा सुमेराचा इतिहास आतां उजेडांत येत आहे, त्यांत उल्लेख आढळतो. परवांच्या अबिसिनिया व इटलीच्या लढाईंत अबिसीनियन रानटी लोकांनीं लढाईवर जातांना पाळींव सिंह बरोबर नेले होते. हिंदुस्तानांत पाळींव चित्त्यांच्या साहाय्यानें अद्याप शिकार करतात. तेव्हां संक्रांतीच्या वाहनाउपवाहनांत सिंह, वाघ यांच्या समावेशांत अतिशयोक्तीबरोबर थोडासा सत्यतेचा भास होतो.

जिकडे जाईल तिकडे नाश, आणि पाहील तिकडे हानि, या गोष्टीतर हेंच दाखवतात. लुटारूंची टोळधाड जेथें जाईल, तेथें नाशापलीकडे काय होणार? या लुटारू टोळयांनीं ऊर्फ संक्रांतीनें स्वीकारलेल्या म्हणजे लुटलेल्या वस्तूंचा नाश किंवा महागाई होणें, हीतर स्वाभाविक गोष्ट आहे. नागव्या उघड्या लोकांनीं लुटालुटींत प्रामुख्यानें भाग घेतला असावा.

महाभारतकाळींही गरीब स्त्रिया नागड्या उघड्या राहूं शकत असें दिसतें. तर त्यापूर्वी रानटी टोळयांच्या टोळया वस्त्रांवाचून रहात असतील हें अशक्य नाहीं; आणि या लुटारू लोकांनीं वारा कोणत्या दिशेनें वाहतो हें पाहून प्रसंगीं चढाऊपणा बाजूला ठेऊन भिक्षांदेहीचाही मार्ग पत्करला असावा, असें भैक्ष्य वगैरे त्यांच्या भक्षणप्रकारावरून वाटतें.

अशा प्रकारें सालोसाल येणारें हें संकट असल्याखेरीज मराठींमध्यें संक्रांतीला जो संकट असा अर्थ प्राप्त झाला आहे तो झाला नसता. आपणही आतां विड्या ओढून फस्त करणारा मित्र आला म्हणजे 'आली विड्यांवर संक्रांत' म्हणतों.

असें हें संक्षेपतः संक्रांतीचें मूळ विशद केल्यानंतर ती पर्वणी बनण्याचें कारण काय झालें असावें याचा विचार करूं. भावी संकट टाळण्यासाठीं जपजाप्यें आणि दानें-स्नानें करण्याचा आपणांतच काय पण सर्व मनुष्यमात्रांत ज्याच्या त्याच्या धर्मकल्पनांप्रमाणें परिपाठ आहे. त्याचें निदर्शक हें संक्रांतीचें पर्व व त्याला अनुलक्षून पूर्वीच्या शास्त्रकारांनीं घालून दिलेल्या दानाच्या नियमांचें प्रकरण दिसतें.

मार्गे प्लेगाला लोक फार बळी पडूं लागले. तेव्हां ठिकठिकाणीं प्लेगदेवाचीं देवळें बांधलीं गेलीं. पुणें तालुक्यांत मौजे नावरें गांवीं प्लेग देवाचें देऊळ बांधलेलें आहे आणि त्याची दरसाल यात्रा भरते. पावसाळ्यांत महामारीचा उपद्रव सुरू होतो तो येऊन गांवाला त्रास होऊं नये म्हणून श्रावणांत खानदेशांतील बहुतेक गांवांत मरीआईचा उत्सव व जेवण करतात. भगत घुमतात. व गांवाला महामारीच्या उपद्रवापासून बचावण्यासाठीं चोघाभोंवतीं दारूची धार देण्याचा विधि करतात.

पंचवीस वर्षांपूर्वी शिरपूरसारख्या बारा हजार वस्ती व कोर्टकचेरी आणि सुशिक्षित लोक राहाणाऱ्या गांवींसुद्धां सर्वांनीं वर्गणी करून धार देण्याचा विधि करविल्याचें लोकांच्या स्मरणांत आहे. लहान मुलांना खोकला व ताप येण्याची सांथ सुरू झाली कीं घरोघर एका दगडाला शेंदूर फासून त्याची 'खोकली माय' ही देवता निर्माण होते व तिला दहींभाताचें बोहणें देतात. गोवर, कांजण्यांसाठीं शीतळा माय तशीच प्रसिद्ध आहे. अशा भावना-प्रधान व श्रद्धाळू समाजांत दरसालची लुटारू लोकांची टोळधाड ही संक्रांतीच्या स्वरूपांत देवता बनून तिचें पर्व व स्नान, दान हें लोकांत प्रसार पावणें अशक्य नाहीं.

हा संक्रांतीचा विधि किंवा सण कुठल्या प्रदेशांत प्रथम उत्पन्न झाला असावा, याबद्दल कांहीं या सणांत पुरावा आढळतो काय याचा आतां विचार करावयास पाहिजे. आजकालचें पंचांग संक्रांतीमुळें देवांचा दिवस सुरू होतो असें वर्णन देतें. देवांचा दिवस ध्रुव प्रदेशावरच अस्तित्वांत असूं शकतो. परंतु तो मकर संक्रांतीच्या वेळीं होत नसून त्याच्या नंतर तीन महिन्यांनीं वसंत संपाताच्या वेळीं होतो व कर्क संक्रांतीनंतर लगेच देवांची रात्र लागायच्या ऐवजीं शिशिर संपाताच्या वेळीं ती लागते. सांप्रत उत्तरायण म्हणजे सूर्याचें उत्तरेकडे गमन आणि दक्षिणायन म्हणजे दक्षिणेकडे गमन, असा अर्थ रूढ आहे. परंतु देवांचा सहा महिन्यांचा दिवस आणि सहा महिन्यांची रात्र यांना अनुकूल असा तो समज नाहीं. उत्तर गोलार्धांतील सूर्याचें भ्रमण म्हणजे उत्तरायण व दक्षिण गोलार्धांतील भ्रमण म्हणजे दक्षिणायन, ही व्यवस्था देवांच्या दिवसारात्रींच्या कल्पनेशीं जुळूं शकते. वैदिककाळीं उत्तरायण म्हणजे सूर्याचें उत्तर गोलार्धांतील भ्रमणच होय. या अर्थी हा शब्द रूढ होता हें टिळकांनीं वेदकालनिर्णयांत विशद करून दाखविलें आहे.

"उत्तरायण या शब्दाचेही दोन अर्थ होऊं शकतात. एक, वर सांगितलेला म्हणजे मकरपासून कर्कसंक्रमणापर्यंतचा काळ, व दुसरा म्हणजे

वसंतसंपातापासून शारदसंपातापर्यंतचा काळ. पहिल्या अर्थाप्रमाणें सूर्य उत्तरेकडे वळला कीं उत्तरायण सुरू होतें. आणि दुसऱ्या अर्थाप्रमाणें उत्तर गोलार्धात सूर्य जाऊं लागला कीं, उत्तरायण सुरू होतें. पहिल्या अर्थाप्रमाणें वर्षारंभ मकरसंक्रमणीं व दुसऱ्या अर्थाप्रमाणें तो वसंत संपातीं धरला पाहिजे; परंतु वार्षिक सत्रांतील मधल्या दिवसाला विषूवान् दिवस म्हणणें तसेंच वसंताला ऋतूचें मुख म्हणणें व आग्रयणेष्टि अथवा अर्धवार्षिक यज्ञ दर वसंत व शरद् या ऋतूंमध्यें करावे लागणें, या गोष्टींचा विचार करतां वर दिलेल्या दोन अर्थांपैकीं दुसराच विशेष ग्राह्य दिसतो व तोच खरा जुना अर्थ होय असें दिसतें.

"वैदिक ग्रंथांमध्यें उत्तरायणाचा जो संबंध आलेला आहे तो देवयान व पितृयान यांच्या वर्णनाच्या वेळेसच काय तो आहे. ऋग्वेदामध्यें देवयान व पितृयान हे शब्द पुष्कळ वेळां आलेले आहेत, तरी देवयान या शब्दाचा अर्थ त्यांत कोठेंही स्पष्ट केलेला नाहीं. बृहदारण्यक व छांदोग्य या उपनिषदांमध्यें देवलोक व पितृलोक यांचें सविस्तर वर्णन आहे. "अर्चिषोहरन्ह आपूर्यमाणपक्ष मापूर्यमाणपक्षाद्यान्षण्मासानुदङ्ङादित्य इति मासेभ्यो देवलोकं तेषां न पुनरावृत्तिः। धूमाद्रात्रिं रात्रेरपक्षीयमाणपक्षमपक्षीय माणपक्षाद्यान्षण्मासान्दक्षिणादित्य इति मासेभ्यः पितृलोकम्"। गीतेमध्येंहि अशाच प्रकारचें वर्णन आहे. "अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम्"। व लगेच पुढें "धूमो रात्रि स्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम्।" असें म्हटलें आहे. परंतु जोंपर्यंत सूर्य उत्तरेकडे असतो ते सहा महिने अथवा उत्तरायणाचे सहा महिने अशा अर्थाचे जे वर शब्द आले आहेत त्यांचा अर्थ काय? सर्व टीकाकारांच्या मतें त्यांचा अर्थ मकर संक्रमणापासून कर्क संक्रमणापर्यंतचे सहा महिने असा आहे. परंतु हा अर्थ वैदिक ग्रंथांतील वर्णनाच्या अगदीं उलट आहे. वर सांगितल्याप्रमाणें उत्तरायणाचे दोन्ही अर्थ होऊं शकतील, परंतु शतपथब्राह्मणामध्यें देवांचे ऋतु व पितरांचे ऋतु सांगितले आहेत त्यांत "वसंतो ग्रीष्मो वर्षा। ते देवा ऋतवः। शरद्धेमंतः शिशिरस्ते पितरो ... स यत्र उदगावर्ततेदेवेषु तर्हि भवति देवांस्तर्ह्यभिगोपायति-अथ यत्र दक्षिणावर्तते पितृषु तर्हि भवति पितृंस्तर्ह्यभिगोपायति"। असें म्हटलें आहे. यावरून उत्तरायणाच्या अर्थाविषयीं असलेल्या सर्व शंका नाहींशा होतील. जर वसंत, ग्रीष्म, व वर्षा हे देवऋतु आहेत व सूर्य जेव्हां उत्तरेकडे वळतो तेव्हां तो जर देवांमध्यें असतो, तर उघडच उत्तरायणाचा आरंभ वसंतसंपातापासून झाला पाहिजे. मकरसंक्रमणापासून त्याचा आरंभ होतो हें म्हणणें योग्य होणार नाहीं. कारण देवांचा पहिला ऋतु जो वसंत त्याला कोणत्याहि ठिकाणीं मकरसंक्रमणापासून आरंभ होत नाहीं. यासाठीं देवलोक,

देवयान किंवा उत्तरायण याचा अर्थ वसंतसंपातापासून शरदूसंपातापर्यंत होणाऱ्या वसंत, ग्रीष्म, वर्षा या ऋतूंच्या सहा महिन्यांचा काळ असाच घेतला पाहिजे." ( वेदकाळ निर्णय. पा. ९-१० )

उत्तरायण आणि देवांचा दीर्घ सहा महिन्यांचा दिवस हे जसे एके काळीं एक होते, तसेच उत्तरायणाच्या आरंभीं करावयाचा संक्रांतीचा सण हासुद्धां त्या वेळीं या वसंतसंपातमूलक उत्तरायणाच्या आरंभींच होत असावा असें वाटतें.

निर्णयसिंधु ग्रंथांत निरनिराळया संक्रांतीचा पर्वकाळ देण्यांत आला आहे:-निर्णयसिंधु ग्रंथ कमलाकर भट्टानें १५३४ च्या सुमारास काशीस लिहिला आहे ( वेंकटेश्वर आवृत्ति ), व त्यांत अनेक धर्मशास्त्रें, पुराणें वगैरे प्राचीन ग्रंथांतून उतारे देऊन निर्णय सांगितला आहे. वर्षांतील बाराही संक्रांतींचा पुण्यकाळ कांहींचा संक्रमणकाळाच्या आधीं, तर कांहींचा संक्रमण-कालानंतर असा सांगितला आहे. तो असा. ( निर्णयसिंधु पान ४ ) आंकडे घटिकांचे आहेत.

१० मेष, १० ( स्कंद पुराणानुसार. )
१० वृषभ.
  मिथुन १६.
३० कर्क.
१६ सिंह.
  कन्या १६.
१० तूळ १०.
१६ वृश्चिक.
  धन १६.
  मकर ४० घटिका ( हेमाद्रिमतें. ) २० ( माधव. )
१६ कुंभ.
  मीन १६.

उपरोक्त घटिकांची यादी निर्णयसिंधुकारांनीं संग्रहित केलेल्या श्लोकाधारें दिलेली आहे.

या यादींत हेमाद्रीच्या मतानें मकरसंक्रांतीनंतर ४० घटिका पुण्यकाळ सांगितला आहे. पूर्वीच्या धर्मशास्त्रकारांनीं कांहीं नियम सांगून नंतर त्यांना पुढें अपवाद सांगण्यांत एके वेळीं ते नियम अस्तित्वांत होते, या म्हणण्याला बाध येत नाहीं. कलिवर्ज्य प्रकरण हें त्याचें एक मोठें उदाहरण आहे. देशकालपरिस्थितीप्रमाणें आचारांत बदल करण्याची आवश्यकता असतां

तसा बदल करण्याची परंपरागत रूढि आपल्या काय, सर्वच देशांत आहे. ही गोष्ट येथें नमूद करण्याचें कारण पुण्यकाळ रात्रीचा निषिद्ध मानला आहे आणि एके जागीं याचा निषेध स्पष्ट शब्दांत सांगितला असतां पुन्हा त्याला अपवाद सांगितला आहे.

निर्णयसिंधु पान ६ वर निषेधाचा श्लोक असाः—

याम्युतरा पुण्यतमा मयोक्ता सायं भवेत्सा यदि सापि पूर्वा ॥
पूर्वातु योक्ता यदिसा विभाते साप्युत्तरा रात्रि निषेधतः स्यात् ॥

आणि याला वृद्ध वसिष्ठानें अपवाद सांगितला आहे. (पान १०)

' विवाह व्रत संक्रांती प्रतिष्ठा ऋतु जन्मसु ।
तथो पराग पातादौ स्नाने दाने निशा शुभा ॥ '

नियम म्हणून एक सर्वसामान्य सिद्धांत सांगून त्यांत वृद्ध वसिष्ठाच्या शब्दांत अपवाद देण्यांत त्या नियमाची अंमलबजावणी कधींतरी त्रासदायक किंवा अशक्यप्राय झाली असली पाहिजे, हें क्रमप्राप्त आहे.

आतां या पुण्यकाळाचा विचार करतांना पुण्यकाळ दिवसाचा घ्यावा, संक्रांतीच्या नंतर लगेच रात्र पडत असेल तर पुण्यकाळ दुसऱ्या दिवशीं समजावा, असा पहिला श्लोक सांगतो. परंतु जेव्हां पुण्यकाळ चाळीस घटिकांचा असेल आणि दिनमान ज्यास्तींत ज्यास्त जेथें ३६ घटिकांचें असेल अथवा मकर संक्रांतीच्या वेळीं तर सर्वांत लहान दिवस असणार म्हणजे मकर संक्रांतीचा पुण्यकाळ ४० घटिका सांगण्यांत लागोपाठ दोन दिवस पुण्यकाळ एक रात्र मध्यें गाळून मानला पाहिजे, हें उघड दिसतें. परंतु अशी रात्र असल्यास दुसऱ्या दिवशीं पुण्यकार्य करावें अशी आज्ञा आहे, त्याचप्रमाणें पुण्यकाळाची व्याप्ति एका दिवसापेक्षां अधिक असेल तर दुसऱ्या दिवसापर्यंत तो लांबवावा, असें वचनमात्र कुठें निर्णयसिंधूंत नाहीं. हेमाद्रीच्या नांवावर चाळीस घटका पुण्यकाळ दाखल आहे. त्याचा विचार करतांना हेमाद्रीसारख्या विद्वान् पंडितानें आपल्या लहरीखातर मकर संक्रांतीच्या वांट्याला ही वाढ दिली असावी असें वाटत नाहीं. तर त्याच्या अवलोकनांत पूर्वीच्या ग्रंथकारांच्या लिखाणांत त्याला हा अवधि आढळला असावा, आणि त्याचा त्यानें उल्लेख केला असावा असें म्हणावेंसें वाटतें.

तसेंच एके काळीं संक्रांतीच्या पुण्यकाळालाही रात्रीचा निषेध असल्यावांचून अपवादात्मक वसिष्ठाचें वाक्य निर्माण झालें नसतें. दुसरें कांहीं संक्रांतींचा पुण्यकाळ आधीं व कांहींचा नंतर त्यांत मेषेचा व तूळेचा उभयपक्षीं आणि कर्केचा पूर्व आणि मकरेचा उत्तरकाळ पुण्यकाळ देण्यांत

सुसंगतता दिसून येते. ती अशी–कर्क संक्रांतीनंतर दिवस लहान होतो, म्हणजे कर्क संक्रांतीचा पुण्यकाल ३० घटिका आधीं सांगण्यांत विसंगतपणा कांहीं दिसत नाहीं. कारण कर्क संक्रांतीचा दिवस उत्तर गोलार्धांत सर्वांत मोठा असल्यानें एक दिवस पुण्यकाळ लागणें शक्य आहे.

मकर संक्रांतीचा दिवस सर्वांत लहान दिवस होय. त्याचें दिनमान मुंबईलाच सुमारें २७ घटिका व कांहीं पळें असतें. तेव्हां या चाळीस घटिकांच्या मकर संक्रमणाच्या पुण्यकाळाची कांहीं संगती लावतां आली तर ठीक. नाहींतर हेमाद्रीसारख्या प्रकांड पंडिताच्या पदरीं भलताच आरोप बांधण्याची पाळी येणार. कर्क आणि मकर यांचें अनुक्रमें पूर्व आणि पर पुण्यकाळ देण्यांत दिवसाच्या वाढीकडे व पुण्यकालाला मागचा व पुढचा यांपैकीं मोठा दिवस सांपडावा अशी उघड उघड योजना दिसते. तशीच मेष व तूळ यांचे मागचे पुढचे दोन्ही पुण्यकाल देण्यांत त्या दिवसांच्या समानतेकडे साधारणतः लक्ष गेलेलें दिसतें. कारण या संक्रांती ठोकळमानानें वसंत आणि शिशिर संपाताच्या जवळ म्हणजे दिवस व रात्री सारख्याच लांबीच्या येण्याच्या काळीं येतात. या सर्व मुद्द्यांवरून मकर संक्रांतीच्या वांट्याला चाळीस घटिकांचा पुण्यकाळ देण्यांत एके काळीं कधींतरी सोयच साधली असावी.

उत्तरायणाचा पूर्वीचा अर्थ म्हणजे वसंत संपातापासून सूर्याचें चलन ऊर्फ देवयान. आणि उत्तरध्रुव प्रदेशाजवळ जेथें सहा महिन्यांचा दिवस या पूर्वीच्या उत्तरायणाबरोबर उजाडत असेल, त्या प्रदेशांत उत्तरायणाच्या संक्रांतीचा पुण्यकाळ चाळीस घटिका सांगण्यांत कांहीं विसंगत वाटत नसेल. तीच गत कर्क संक्रांतीच्या तीस घटका पुण्यकाळाची. कर्क संक्रांतीचा दुसरा निर्देश म्हणजे दक्षिणायनाला ऊर्फ पितृयानाला सुरवात करणारी संक्रांत असा अर्थ घेतला तर त्या संक्रांतीनंतर सूर्यास्तच होणार. म्हणजे सहा महिन्यांची रात्रच. अर्थात् तिचा पुण्यकाळ आधीं सांगणेंच अवश्यक आहे.

संक्रांतीनंतर देवांचा दिवस उजाडतो वगैरे कल्पना जरी आज काटेकोरपणें आपल्या उत्तरायणाशीं जुळत नसल्या तरी अद्याप पंचांगांतून जीव धरून आहेत. आणि विचार करणारास हें पुण्यकाळ प्रकरणही त्या देवयान ऊर्फ देवांच्या दिवसांच्या कल्पनेला कांहींसें पोषकच आहे असें आढळून येईल, असें वाटतें. म्हणजे संक्रांतीचा ऊर्फ खानदेशी उत्तराणीचा सण मूळांत उत्तरध्रुव प्रदेशाशीं कसा निगडीत आहे हें दिसून येईल.

आतां यांत आणखी एका भक्कम प्रमाणाची भर 'हाड्या' शब्दानें पडूं पाहावे तिचा विचार येथें करतों.

हाड्या हा शब्द कावळा अशा अर्थी खानदेशी भाषेत रूढ आहे. तो संस्कृत शब्द नाहीं. परंतु त्याचे सगेसोयरे आजही युरोपीयन भाषांत नांदतात. उदाहरणार्थ नॉर्स् भाषेत हॅवरे ( Havere—Norsk English book—नॉर्वे इंग्लीश कोश ) म्हणजे कावळा व इंग्रजींतील हॉवर ( Hover ) म्हणजे उडणें हें क्रियापद हे दोन्ही व खानदेशी हाड्या हा एक मूलगृहकालीन ( Indo European ) शब्द असावा असें वाटतें. प्राचीनतम भाषेला ऋषींनीं संस्कृत करतांना सर्वच शब्द त्यांनीं संस्कार करून घेतले, असें नाहीं. उलट संस्कृतही अनेक जातींच्या व टोळ्यांच्या बोलींच्या भेसळीनें निर्माण झालेली एक भाषा होती, व ती बोलण्याच्या उपयोगापेक्षां वाङ्‌मयाच्या व शास्त्राच्या आधारावर जास्त प्रगल्भ झाली हें म्हणणें जमेस धरल्यास तिच्यांत शब्द सांपडला नाहीं म्हणजे तो जुना नाहीं हें म्हणणें टिकत नाहीं.

"हाड्या उत्रान" या शब्दप्रयोगाचा अर्थ हाड्याबरोबर येणारी उतरान, हाड्या व उतरान किंवा कसाही केला तरी दोघांचें हें सामासिक शब्दांत स्मारक होण्यांत ते एकाच काळीं एकाद्या प्रदेशांत पादार्पण करीत असावेत. त्या खेरीज त्यांची अशी मोट बांधली जाणार नाहीं. पुणें, सातारा प्रमाणें यांचें सानिध्य हिंदुस्तानसारख्या देशांत अशक्य आहे. कारण येथें उत्तरायणाबरोबर कावळे येतात. एरव्हीं नसतात हें म्हणणें वस्तुस्थिति-निदर्शक नाहीं.

अत्यंत शीत प्रदेशांत ही गोष्ट पहावयास सांपडते. इंग्लंड, नॉर्वेसारख्या देशांत हिंवाळ्यांत सर्व पक्षी कडाक्याच्या थंडीच्या धाकानें दक्षिणेच्या प्रदेशांत पसार होतात, आणि पुन्हा वसंताच्या आरंभीं परत येतात. प्रत्यक्ष ध्रुवप्रदेशावरही हाच अनुभव लोकांस येतो.

"उत्तरध्रुवप्रदेशाकडील-वसंत-ह्या ध्रुव-प्रदेशांत वसंत सुरू झाला कीं, बर्फ हळूहळू वितळूं लागतें; व मधून मधून तांबडी माती दिसूं लागते. पक्ष्यांच्या झुंडीच्या झुंडी दक्षिणेकडून लोटतात व ध्रुवप्रदेश ५-६ महिनेपर्यंत गजबजून जातो. पक्ष्यांना, ह्या ओसाड प्रदेशांतही दलदलीच्या जागा, सरोवरें व नद्या वगैरे ठिकाणीं लागेल तेवढें भक्ष्य मासे वगैरे मिळतें. येथें ते घरटीं बांधून त्यांत अंडीं घालितात. अंड्यांतून बाहेर निघालेलीं त्यांचीं पिलें हिंवाळा सुरू होण्यापूर्वींच मोठीं होऊन उडावयास शिकतात; व हिंवाळा सुरू झाला कीं, आपल्या आईबापांबरोबर दक्षिणेकडे उडून जातात. ध्रुव प्रदेशांत सरोवरें, नद्या यांच्या कांठीं वास करणारे, पाण्यांत पोहणारे व पक्ष्यांचा माग काढणारे बहिरीससाणा, गरुडपक्ष्यांसारखेही पक्षी तिकडे जातात. ज्या वेळीं ऊन पडलेलें असतें त्या वेळीं फिंच व वार्बल पक्ष्यांचें

आनंदगान ऐकूं येतें. लहान लहान झुडपांतून शर्मिगन पक्षी फिरतांना आढळून येतात. ह्या पक्ष्यांचा रंग पांढरा असून ह्यांच्या पायांवर पिसें असतात.

" ह्याच वेळीं संमन व स्टर्जन जातीच्या माशांचे थवेच्या थवे समुद्रांतून निघून या प्रदेशांतील नद्यांत शिरतात. ते येथें थोड्या पाण्यांत अंडीं घालितात.

" रेनडियर नांवाचीं हरिणें याच सुमारास शेवाळ, लिचेन वगैरे वनस्पतींच्या शोधार्थ इकडे येतात. कारण दलदलीच्या प्रदेशांत उत्पन्न झालेल्या माशा त्यांस फार त्रास देऊं लागतात.

" पुष्कळ माणसेंही शिकारीसाठीं इकडे येतात.

" शरद्-सप्टेंबर महिन्यापासून थंडीस सुरवात होते. थंडी सुरू झाल्याबरोबर हंस वगैरे पक्षी दक्षिणेकडील मार्ग सुधारतात. रेनडियर व मासे आपल्या मूळस्थानीं जातात. मनुष्य सुद्धां ५–६ महिन्यांत जमविलेलीं कातडीं, मांस, पिसें, मासे वगैरे जिन्नस घेऊन परततात. आकाशांतून बर्फ पडूं लागतें, व सर्व जमीन, नद्या व समुद्र हिमाच्छादित होतात. ह्या बर्फामुळें जमिनीवर उगवलेल्या वनस्पतींचें रक्षण होतें." ( वेदांच्या काळाचा इतिहास पा. ५९ )

वरील उताऱ्यांवरून हें लक्षांत येईल कीं, हाच्या उतराण या शब्दसंघाचें मूळ असें उत्तर ध्रुवाजवळ किंवा उत्तरध्रुववृत्ताजवळ आहे हें म्हणणेंच तर्कशुद्ध आहे. त्यांत आणखी कावळ्याबद्दल आपल्या रूढ कल्पनांची आपण थोडी चिकित्सा केली तर हाच मुद्दा मुळाशीं आढळतो.

## कावळ्याचें ओरडणें व पाहुणा येणें

दाराशीं कावळा ओरडला तर आपण, कोणी पाहुणा येणार अशी कल्पना करतों. तीतरी अशा भटक्या टोळ्यांबरोबर कावळे येत असल्याखेरीज अस्तित्वांत रहाणें शक्य नाहीं. कावळा हा पक्षी माणसाच्या वस्तीचा एक घटकच आहे असें म्हटलें तरी चालेल. आणि या दृष्टीनें भटक्या टोळ्या त्यांचीं गाढवें, म्हशी, कुत्रीं, मेंढरें यांबरोबर कावळ्यासारखे पक्षीही उत्तरध्रुवप्रदेशाला नियमितपणें दरसाल भेट देत असावेत. उत्तरध्रुवप्रदेशांत वसंत आला तर जसा कोकीळ आपल्याकडे गाऊन त्याची वर्दी देतो, तसेच हे कावळे आधीं येऊन काव काव करून दीर्घ रात्रीच्या प्रभातीं लोकांना आपलें आगमन आणि आपल्या मागून येणाऱ्या धंदेवाईक लुटारू, भिकारी व भणंगांचें आगमन सूचित करीत असावेत, व त्यांच्या नियमित क्रमांतच कावळ्याच्या काव काव मधून निघणारा पाहुणे येण्याच्या ध्वनीचा जन्म झाला असावा.

## यमदूत

यमोसि यमदूतोसि वायसोसि महामुने ।

कावळयास यम, यमाचा दूत म्हणून संबोधण्यांत त्याचें रहाण्याचें स्थान दक्षिणेंत आहे हें ध्वनित होतें. आपल्याकडे और्ध्वदेहिक क्रियेंत पिंडाला कावळा शिवण्याच्या रूढींततरी हा ध्रुवप्रदेशच असावा असें वाटतें. उत्तर ध्रुवावर दक्षिणायनांत मरण वाईट. अर्थात् दक्षिणायनांत तेथें कावळे नसणार. कारण ते दक्षिणेकडे यमाच्या प्रदेशांत गेलेले असणार. त्या प्रदेशांत सर्वांना सारखेंच ज्योतिषाचें ज्ञान असणें शक्य नाहीं. दुसरें, सर्वच लोक सहा महिन्यांच्या रात्रीच्या कक्षेंत रहात असतील असें नाहीं, तर कित्येक त्यांच्या खालीं २।४ महिन्यांच्या अवधीच्या रात्रींत रहाणेंही शक्य आहे. अशा प्रदेशांत मृत माणसाला सद्गति लाभली हें समजण्याचें एक साधें साधन म्हणजे त्या दिलेल्या पिंडांचा कावळ्याकडून स्वीकार होणें हें असलें पाहिजे. अर्थात् कावळ्याचें अस्तित्व किंवा तेथली वस्ती उत्तरायणापुरतीच मर्यादित असणार. यासाठीं उत्तरायण आहे कीं नाहीं, हें पहाण्याचा किंबहुना तें आहे, याची खात्री करण्याचा एकमात्र उपाय हा पिंडांना कावळा शिवण्याचा आहे. कावळा न शिवला तर मृताचे प्राण घुटमळतात असा समज आहे, आणि आतां आपण आपल्या कल्पने-प्रमाणें मृताच्या अपूर्ण आशा पूर्ण करण्याचीं अभिवचनें देतों व कावळ्यांनाही तोटा नसल्यानें एक तासभराच्या कमी अधिक फरकानें तो पिंडाला शिवतोच.

या कावळ्या विषयक कल्पना आणि हाड्याउन्नान ही म्हण या आज हिंदुसमाजांत आढळणाऱ्या गोष्टींचें मूळ एक वेळीं उत्तर ध्रुव प्रदेशावरच जन्माला आलें असलें पाहिजे, असा इतक्या विवेचनावरून निघालाच तर निष्कर्ष निघतो.

## ६ ‘ दीन दीन ’

खेडेगावांत अत्यावश्यक असणाऱ्या गोष्टींत एकादा भगत असणें अगत्याचें असतें. भगताला देवऋषि असेंही म्हणतात. भगताच्या आंगांत कोणताही देव येतो. भगत घुमतो; आणि मग आजाऱ्यांना अंगारा, धुपारा किंवा औषध देऊन बरें करतो. कोणाचीं गुरें किंवा मालमत्ता हरवल्यास तिचा पत्ता लावण्याच्या कामीं खाणाखुणा सांगतो. निपुत्रिकांना पुत्र, निरुद्योग्यांना उद्योग देतो. थोडक्यांत भगत म्हणजे वैद्य, ज्योतिषी आणि मांत्रिक यांचें काम करणारा एक उपयुक्त प्राणी असतो.

ज्याच्या अंगांत येण्याला ' वारें ' म्हणतात. ज्याच्या अंगांत देव आला म्हणजे तो आपले केस पिंजारून तालावर नाचतो किंवा नुसताच बैठकीवर बसून सबंध अंग व मान हलवतो. त्याच्या घुमण्याच्या वेळीं वाजवण्याच्या वाद्यांना ' डाहांग ' म्हणतात व ते वाजवणारे ' डांके ' म्हणवतात. याच्या घुमण्याच्या वेळीं ते डाहांगा वाजवून गाणीं म्हणतात. त्यांना ' वह्या ' म्हणतात. या वह्यांतून त्या देवाची स्तुति असते.

ब्राह्मणांपासून खालीं सर्व जातींत भगत असतात व त्यांच्या अंगांत नाना प्रकारचे देव येतात. त्यांत खंडेराव, मरीआई, काळयाबहिरम ( काळभैरव ), म्हशासोर ( महिषासुर ), अग्न्यामय ( अग्निमाता ), चोग्यापाच्या वगैरे.

भगतास परंपरा लागते. वाटेल तो उठल्यासुटल्या भगत होऊं शकत नाहीं. ज्याच्या अंगांत वारें ( देवाचा आवेश ) येऊं लागतो तो उमेदवार त्याच देवाचें वारें येणाऱ्या भगतगिरी थाटलेल्या दुसऱ्या एकाद्या भगताकडे जाऊन एक विधि करून आपणास भगताची दीक्षा घेतो. या दीक्षा घेण्यास ' गेनमाळ टाकणें ' म्हणतात. गेनमाळ म्हणजे ज्ञानमाळ. गुरु भगत या शिष्य भगताच्या गळ्यांत मान्यतादर्शक एक फुलांची माळ घालतो आणि नंतर या नव्या उमेदवार अथवा शिष्य भगताची भगत म्हणून गणना होऊं लागते.

भगतांचे कांहीं संकेत, कांहीं परिभाषा व विधि अशाच वेळीं त्यास माहीत होतात आणि ते माहीत असण्यावरच त्याची प्रतिष्ठा अवलंबून असते. पुष्कळ जागीं नवशिक्या भगतांनीं दीक्षेच्या भानगडींत न पडतां आपला घुमण्याचा व लोकांची रोगराई बरी करण्याचा उपक्रम केलेला असला तरी त्यांना अशा दीक्षित भगतांची भीति वाटते आणि यासाठीं दीक्षा हें एक प्रमुख अंग होऊन राहिलें आहे.

हिंदूंच्या सर्व जाती जरी भगताच्या भजनीं लागत असल्या तरी त्यांत धनगर ही जात भगतावांचून राहाणें अशक्य आहे. धनगरांच्या प्रमुख तीन जाती मानतात. ( १ ) खुटेकर ऊर्फ अहेर किंवा अहीर धनगर. हे खानदेशांत प्रमुखपणें व इतरत्रही आढळतात. ( २ ) झेंडेकर किंवा ठेलारी. हे अजूनही भटके ( Nomades ) आहेत. हे आपले मेंढरांचे वाडे घेऊन गांवोगांव फिरतात. ( ३ ) हाटकर. यांपैकीं खानदेशांत हटकर जात फारच कमी. खुटेकर चांगली स्थाई झालेली आणि पुष्कळ संपन्न अशी असते. एके काळीं हेही मेंढरें पाळीत असतील परंतु फक्त घोंगड्या विणण्याच्या धंद्यामुळेंच ही जात स्थाई झाली. मेंढरें पाळण्याची त्यांना मनाई नाहीं परंतु ठेलाऱ्यांपेक्षां त्यांचें या कामांत पाऊल मागेंच असतें.

या खुटेकर अथवा अहीर धनगराच्या चालीरितींवरून त्यांच्यांत भगत ही बाब एक आवश्यक होऊन बसली आहे असें वाटतें. मानवी जीवितांतील प्रमुख संस्कार विवाहाचा हा भगतावांचून होत नाहीं, तसेंच राणादेवीचें लग्न व एकोत या दोन अतिशय महत्वाच्या कुळाचारांत भगत ही एक प्रमुख बाब असते.

या धनगरांचे देवही ठराविक आहेत. ज्यांच्या घरीं खंडेराव आहे त्यांना लग्नकार्याच्या आरंभीं खंडोबाचा गोंधळ, तळी भरणें व धनगराचें मेहूण जेवूं घालणें आवश्यक असतें. खुद्द धनगरांतही खंडेराव दैवताचें फारच प्रस्थ असतें. खंडेरावाची दुसरी राणी बानाई ही धनगराची मुलगी होती म्हणतात. परंतु इतकें असूनही खंडेराव दैवत हें धनगरांतील पहिल्या दर्जाचें दैवत नाहीं. त्यांचीं दैवतें पांच-( १ ) चांग्यादेव, ( २ ) पाच्यादेव, ( ३ ) काळ्या देव, ( ४ ) काळशा देव आणि ( ५ ) वन्या देव. यांपैकीं पहिल्या चार देवांचीं प्रमुख ठाणीं खानदेशांत अंचाळें, बेल्हाणें, वाघळी व भालेर या गांवीं आहेत. पांचवा वन्या ऊर्फ वनदेव गुप्त आहे म्हणून समजतात.

धनगरांच्या लग्नाला बाहिरो म्हणतात आणि तें देवाजवळच लागतें. मग तो देव कानबाई असो किंवा उपरोक्त चार देवांपैकीं कोणताही एक देव असो. विवाहेच्छु वधुवरांस त्या देवासन्निध नेऊन त्यांचें लग्न लागतें. घरोघर लागत नाहीं. घरींच लावावयाचें असल्यास कानबाईचा म्हणजे राणादेवीचा खटाटोप व खर्च करावा लागतो, व ब्राह्मणही त्या जागीं जाऊन तीं लग्नें लावतो.

या सर्व वर्णनावरून धनगर जातींत भगताची कशी मूलतः आवश्यकता आहे, हें कळून येईल. चांग्यापाच्या वगैरे पांच देव प्रारंभीं धनगरांचे असून मग त्यापासून इतरांच्याकडे गेले असें ते व इतर लोकही समजतात. बेल्हाणें येथें दरसाल श्रावणांत यात्रा भरते. त्या वेळीं शेंकडों भगत त्या ठिकाणीं जमतात. पुष्कळशा नव्या भगतांना दीक्षाही त्याच जागीं मिळते.

या भगतांपैकीं कांहींची प्रस्तुत लेखकानें गांठ घेतली असतां त्यांचीं वह्या नांवाचीं गाणीं व कांहीं गुप्त गोष्टींचा उलगडा करण्याला ते नाखुष दिसले. त्यांचें म्हणणें, देवाचें नांव कागदावर चढवावयाचें नाहीं म्हणजे देवाची हकीकत उतरायची नाहीं.

या भगतांचा नेहमींचा धंदा म्हणजे रात्रीं आपल्या मढींत किंवा जेथें लागेल तेथें 'बैठक करणें' म्हणजे अंगांत देव आणून घुमणें. घुमतांना फारच जोरानें अंग हलवतात व शरीरांत एक असेल त्या मानानें उड्या मारतात. नंतर 'गुड्या परजाणतात.'

असला भगत घुमत असला म्हणजे गरजू बुवा किंवा बाई चार ओंजळी गहूं व एक सुपारी आणि अर्धा आणा नेऊन त्या भगतापुढें ठेवते. ती गुढी झाली. मग भगत त्यांतील चिमूटभर गहूं घेऊन टाकून पाहून कांहीं कल्पना, कांहीं अनुमान वगैरेंच्या साहाय्यानें त्या गरजूव्यक्तिच्या प्रश्नांचीं उत्तरें देतो. रोग बरा होणें, हरवलेलीं गुरें किंवा वस्तू सांपडणें वगैरेंसारखे प्रश्न असतात. याला ' गुढी परजाणणें ' म्हणतात.

या घनगर भगतांची इतकी विस्तृत माहिती देण्याचें कारण कै० इतिहासाचार्य राजवाड्यांनीं ऋषि शब्दाच्या धात्वर्थावरून ज्या देवऋष्याचा बोध होतो म्हणून प्रतिपादन केलें आहे तो हा भगतच हें वाचकांच्या लक्षांत यावें.

" ऋषि या शब्दाचा अर्थ निरुक्तिद्वारा काय निष्पन्न होतो, तो पाहाणें जरूर आहे. ऋषि या शब्दांत ऋष् हा धातु व इ हा प्रत्यय आहे. इ प्रत्यय लागून वैदिक भाषेंत कर्त्रर्थक नामें होतात. जसें-हरि, अरि, असि इत्यादि. ऋष् गतौ म्हणून पाणिनीय धातुपाठांत हा धातु पठित आहे; परंतु कोणती गति तें सांगण्याची पाणिनीची प्रायः पद्धत नाहीं. सबब, ऋष् धातूनें कोणती गति दाखविली जाते तिचा छडा लावूं. ऋष् हा धातु साधा नाहीं, जोड आहे. मूळ साधा धातु ऋ, ऋ गतौ, म्हणून धातुपाठ सांगतो. भृशार्थक किंवा इच्छार्थक स् लागून ऋ + स् मिळून ऋष् हा जोड-धातु बनला आहे. ऋष् म्हणजे भृशत्वानें म्हणजे अतिशयेंकरून गति करणें, अर्थात् ऋषि म्हणजे कोणत्याही कारणानें अतिशयेंकरून गति करणारा माणूस. गतीचा अतिशय म्हणजे काय ? कांहीं दैवी स्फूर्ति होऊन व अंगांत संचार होऊन थै थै नाचणारा, पिंगा घालणारा व इतर सामान्य मनुष्यांना जे अंगविक्षेप अशक्य ते अंगविक्षेप अतित्वरेनें करणारा असा जो असामान्य गति करणारा माणूस तो ऋषि.

" ऋषि या शब्दाचा हा मूळार्थ होय, असा हा विलक्षण हावभाव करणारा, पिंगा घालणारा व अतर्क्य दैवी स्फूर्ति होऊन जोरानें धांवणारा माणूस समाजशास्त्राच्या कोण असावा बरें ? रानटी समाजांत पंचाक्षरी, देवऋषी किंवा Sorcerer म्हणून ज्याला म्हणतात, तोच पूर्ववैदिक रानटी समाजांतील ऋषि होय. हा रानटी ऋषि उर्फ Sorcerer परिणत होत होत वैदिक कालीं मंत्रद्रष्टा उर्फ ऋचांचा कर्ता झाला. ऋष् ह्या धातूला इंग्रजी प्रतिशब्द rush असा देतां येईल, व तो शब्द जोराची भृशगति दाखवितो. ऋ सामान्य गति दाखवितो व ऋष् जोराची भृशगति दाखवितो. हा ऋषि शब्द वैदिककालीं निर्माण झालेला नाहीं. हा शब्द आणि अर्थात् अर्थ

पूर्ववैदिक आहे, हें या शब्दाच्या निर्वचनावरून कळून येतें. हा शब्द इतका पूर्ववैदिक आहे कीं, जेव्हां हा शब्द प्रचलित झाला तेव्हां वैदिक लोकांचे पुरातन पूर्वज अप्रत्यय भाषा बोलत होते " ( संशोधक वर्ष ५ वें पान १४७ ).

कै. राजवाड्यांच्या म्हणण्याप्रमाणें समाजाच्या रानटी म्हणण्यापेक्षां प्रारंभिक अवस्थेंतील ती एक आवश्यक बाब होती. समाजाची प्रगति झाली तरी सर्वच अंगें सारखींच प्रगल्भशील नसल्यानें विसाव्या शतकांतही समाजाचे कित्येक घटक आपल्या प्राचीन पद्धतींना चिकटलेलेच राहातात, हें मानवांच्या विवाहादि संस्थांचा इतिहास निरखून पहाणाऱ्यास कळून येईलच.

या भगत अथवा भूतकालीन ऋषींची वाढ होऊन त्यांतून, ज्योतिषी, उपाध्याय, वैद्य व मांत्रिक असे चार पोटभेद ठळकपणें निर्माण झालेले समाजांत नांदत असतांना त्यांची मदत घेऊन वर पूर्वपरंपरा म्हणून भगताची वर्णी लावण्यांत रूढिप्रियता हेंच एक कारण आहे. एकविसाव्या शतकांत आगपेटी हाताशीं असतांनाही यज्ञांतील अग्नि लांकडें घासून पाडण्यांत तोच आग्रह आहे.

हे भगत आणि त्यांचा अनुयायी समाज किंचित्‌ही मुसलमानी समाजाचा किंवा धर्माचा ऋणी नाहीं. असें असतांनाही हे भगत अंगांत चांग्यापाच्याचें वारें आलें म्हणजे ' दीन ' ' दीन ' ' आज तो दीन ' असें ओरडतात.

मी पुष्कळशा भगतांच्या गळीं पडून त्यांना ' दीन म्हणजे काय असा प्रश्न केला. त्यावर कांहींनीं हें गुह्य सांगण्याचें साफ नाकारलें. कित्येकांनीं थोडें सांगितलें व कांहीं मंडळींनीं या देवाच्या कथा सांगून त्याचा संबंध दिवसाशीं आहे असा निर्वाळा दिला. देव भक्ताची परीक्षा घेत फिरत असतां जेथें दिवस निघाला तेथेंच तो थांबला असें एकानें सांगितलें. एकंदरींत या दीनचा अर्थ दिवस असाच आहे आणि ज्या भगतांच्या अंगांत चांग्यापाच्या या देवाचें वारें येतें ते भगत हटकून ' दीन दीन ' म्हणतात.

दीनच्या मुळाशीं ध्रुवप्रदेश आहे असें माझ्यापूर्वींच श्री. कर्वे यांनीं आपल्या ' शिमगा ' या पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे.

" हिंदुस्तानाबाहेर इराणांत राहणारे पारशी हे आपले अगदीं जवळचे आप्त. मृगाच्या मस्तकांतील शरावरून मृगाला ते तीर असें म्हणत. तीर शब्दावरून मार्गशीर्षाला हल्लीं ते तियर म्हणतात. तेथून सहाव्या महिन्याला त्यांच्या धर्मग्रंथांत दथुशो किंवा दिन असें नांव आहे. दिन म्हणजे सूर्योदयाचा-वर्षारंभाचा-मास ( वेदकाळ निर्णय पा. ४० ). अर्थात् आपला ज्येष्ठ. संस्कृत भाषेंत दिन शब्द दिवसवाचक आहे. हल्लींच्या फारशी भाषेंत दिन शब्द

धर्मवाचक झाला आहे. दिनमास हा अहुरमझ्दाचा ( परमेश्वराचा ) आवडता असा समजुतीनें परमेश्वराला प्रिय असलेल्या क्रिया करण्याचा महिना होऊन राहिला.

" कांहीं काळानें दिन या शब्दाला ' धर्म ' हा अर्थ प्राप्त झाला. हल्लीं या शब्दांत आवेशाची झाक आहे. ती प्राचीन काळीं अनुभवलेल्या आनंदाच्या पोटीं पहिल्यानें उत्पन्न झाली असेल. इंग्रजी भाषेंत दिन ( Din ) असा एक शब्द आहे. नामाप्रमाणें उपयोग करावयाचा असतां त्याचा अर्थ Long continuous noise-पुष्कळ काळपर्यंत टिकणारी ओरड-असा होतो; क्रियापदाप्रमाणें उपयोग केला असतां त्याचा अर्थ To vex with noise-कलकलाट करून त्रास देणें-असा होतो. ( Century Dictionary &c ) हे दोन्ही अर्थ आपलेकडील शिमग्यांतील ओरडीचीं प्रतिबिंबें आहेत. शिमग्याच्या ओरडींत मोठा गलबला करण्याचा व प्रसंगानुसार दुसऱ्याला चिडविण्यासाठीं त्रास देण्याचा असे दोन्ही हेतु असतात.

" दिन महिन्यांतील होळीच्या सणांत आनंदानें आणि आवेशानें लोक आरोळ्या मारीत आणि थट्टेनें ओरड करून दुसऱ्याला त्रास देत म्हणून इंग्रजी भाषेंत दिन शब्दाला वर दिलेले अर्थ प्राप्त झाले असावे. ग्रीक लोकांच्या बाखस नामक देवाला Noisy God म्हणजे ओरड करणारा देव असें म्हणतात. हा ओरड करणारा देव म्हणजे दिन महिन्यांत उगवणारा सूर्यच असावा. इंग्रजांचे पूर्वज आणि पारशांचे पूर्वज एकत्र रहात असतांना दिनमासाच्या उत्सवांत ठोकलेल्या आरोळ्या इंग्रजी भाषेंतील दिन शब्दानें सांठवून ठेविल्या असल्या तर या लहानशा शब्दाचे आपण उपकारच मानले पाहिजेत.

" दिन महिन्याच्या दहावे दिवशीं मोठाले अग्नि पेटवावे अशी पारशांची धर्माज्ञा आहे ( Arctic Home &c p. 371 ). हे अग्नि म्हणजे होळ्या होत. या दिवशीं दुसरे कोणते आचार ते पाळीत असत तें माहीत नाहीं. आपलेकडील रिवाजाप्रमाणें दिनमासाच्या पहिलेच दिवशीं सूर्यदर्शनाबरोबर होळीचा सण असावा, पण त्यांच्या धर्माज्ञेप्रमाणें तो दहावे दिवशीं म्हणजे ( पुनवेची रात्र पहिली धरून ) ज्येष्ठ वद्य नवमीस पडतो. हा एक मोठा फरक लक्षांत ठेवण्यासारखा आहे. हजारों वर्षांत असे थोडे बहुत फरक पडावयाचेच. त्यांचीं कारणें कदाचित् अज्ञातच राहतील. " ( शिमगा. पान २९ )

अर्थात् हिंदुस्थानांत आणि हिंदुसमाजांत ' दीन दीन ' ही आरोळी मुसलमानांच्या पूर्वीपासूनची आणि स्वतंत्रपणें अस्तित्वांत आहे हें दाखवून देण्यांत माझा उद्देश साध्य होतो असें वाचकांना वाटलें म्हणजे पुरे.

तसेंच खानदेशांतील रितीरिवाजांवरून, श्री. कर्वे ज्या शिमगा व होळीचें प्राचीनत्व प्रतिपादन करूं इच्छितात, त्यांत आणखी थोडी भर पडूं शकते. हें दाखवून दिल्यास या दोन शब्दाच्या प्रमेयाला एकप्रकारें पोषकच होईल अशा कल्पनेनें मी त्या सणाचें आणखी अधिक वैशिष्ट्य आणि साम्य दाखविण्याचा प्रयत्न करतों.

## होळी शब्दाचें मूळ

आपण होळी आणि होलिका असे शब्द उच्चारतों, परंतु त्यांची उपपत्ति क्वचित्‌च कुणीं लावण्याचा प्रयत्न केला असेल. होली किंवा होळी हा मूळ शब्द असून होलिका हें विशेष सौष्ठवासाठीं त्याचें रूप बनविलेलें दिसतें. पुष्कळ जागीं कुंडली हिला "कुंडलिका" असें म्हणतात. त्यांतलाच हा प्रकार दिसतो. होळी या शब्दासारखाच– Holly हा इंग्रजी शब्द आहे. त्याचा अर्थ A tree having glossy and spinny margined leaves and bright red berries ( Webster ) म्हणजे चमकणाऱ्या व कातरलेल्या किनारीचीं पानें व चमकदार आणि तांबडीं बोरासारखीं फळें येणारें झाड ( वेब्स्टर ). त्यानंतर दुसरा अर्थ झाडाची फांदी असाही आहे.

इकडे, होळी करतांना शमीचें चांगलें ४।५ इंच जाडीचें झाड तोडून आणून त्याच्या दांड्याचे दोन तुकडे करतात आणि ते एकमेकांना कोरड्या लांकडाच्या खिळ्यांनीं जोडतात. अग्रावर चौपटीसारख्या एकावर एक अशा दोन पट्ट्यांचे जोड एक फुटाच्या अंतरानें बसवून त्यांच्या शेवटांना भोकें पाडून त्यांतून तांबडीं निशाणें लावतात. एक निशाण त्या दांड्याच्या अग्राला असतें. तसेंच त्या पट्ट्यांच्या टोंकांना खोबऱ्याच्या वाट्या लटकत ठेवतात व वाट्यांना भोकें पाडून त्यांतून घातलेली दोरी अडकून राहाण्यासाठीं खारकांचा उपयोग करतात.

ती सजवलेली होळी नेहमींच्या ठिकाणीं आणून गाडली म्हणजे तिच्या भोंवतीं गोंवऱ्या, काड्या, लांकडांचा ढीग करतात. फाल्गुन शुद्ध प्रतिपदेपासून मुली शेणाच्या नानाप्रकारच्या आकृति सूर्य, चंद्र, नारळ, खारका, चाकोल्या वगैरे करून त्यांची माळ करतात व अशा माळा घरोघरच्या मुली आणून होळीवर टांगतात. होळी शिलगवली म्हणजे ती पडल्यावांचून तिला नैवेद्य दाखवीत नाहींत. ती लवकर पडावी या साठींच शमीच्या ओल्या दांड्यांना कोरड्या लांकडाच्या खिळ्यांनीं जोडण्याची पद्धत असते. ज्या वेळीं होळी पडते त्या वेळीं किंवा त्या आधींच ज्वाळा लागून वरच्या खोबऱ्याच्या वाट्या पडतात. तेव्हां बाजूच्या लोकांतून त्या मिळवण्याबद्दल पराकाष्ठेची धडपड सुरू असते. होळीचा दांडा दक्षिणेस पडला तर अशुभ असें समजतात.

एकदां होळी पडली कीं मग घरोघरचे नैवेद्य येतात व लोकही जेवण्याला बसतात. शहरांत एरंडाचें झाड आणून त्याची होळी करण्याची रीत आढळते, ती केवळ ' एरंडोपि द्रुमायते ' या म्हणीचें प्रत्यंतर म्हणून.

या उपरोक्त तपशिलांतून श्री. कर्व्यांना इष्ट असणारें आपल्या शिमगा आणि पाश्चात्यांचा नाताळ यांतील साम्य आणखी अधिक स्पष्ट होतें.

त्यांच्या ख्रिस्टमस ट्री मध्यें जी मुलांना खाऊ व देणग्या लपवण्याची चाल त्याचा अंधुक धागा आपल्या खोबऱ्याच्या वाट्यांत दिसतो. त्यांच्या त्या नाताळाच्या झाडाचें सौंदर्यसाधन इकडे ध्वजाच्या रूपानें अस्तित्व दर्शवितें, आणि त्याच्या यूल नांवाच्या जळाऊ ओंड्याचें काम शमीचें दांडकें करतें. होळीसाठीं शमीचेंच झाड निवडण्यांत या विधीचें प्राचीनत्व दिसतें. शाकुंतलांत गर्भवती शकुंतलेला कालिदास ' अग्निगर्भा ' शमीची उपमा देतो, म्हणजे शमीचें लांकूड लवकर पेट घेणारें आहे, आणि पूर्वीच्या काळीं त्याचा घर्षणानें अग्नि उत्पन्न करण्यासाठीं प्रामुख्यानें उपयोग होत असावा.

यूरोपांतील ख्रिस्तमसच्या सणाचें एक अंग म्हणजे एक लांकडाचा ओंडा ताजा तोडलेला आणून जळत ठेवायचा. होळीचें लांकूडही ताजेंच तोडलेलें असतें. तसेंच यूल हें नांव त्या ओंडक्याला मिळालें आहे. त्याचे मूळांतसुद्धां होळीला मिळू पहाणारा शब्द आहे. आइसलँडिक भाषेंत ( bjol ) हा शब्द आहे. त्याचें होळी किंवा Holly या शब्दाशीं गणगोत्र भाषाशास्त्रदृष्ट्या जुळूं शकतें. अर्थात् अशा दृष्टीनें विचार न करणाऱ्या पूर्वीच्या लेखकांनीं त्याचा डिसेंबर असा अर्थ केला आहे. हा त्या गणगोत्राला एक आधारच होय. आपल्याकडेही फाल्गुनाला शिमग्याचा महिना म्हणतात, म्हणजे यूल याचा अर्थ डिसेंबर म्हणजे होळीचा महिना असाच आहे.

" सेंचरी डिक्शनरींत यूल शब्दाचा अर्थ डिसेंबर असा सांगून व्युत्पत्ति देतांना यूलचा अर्थ चक्र असा देऊन कोशकार म्हणतो कीं, " या शब्दाचा संबंध आइसलँडिक ह्वॉल ( hjol ) शब्दाशीं लावून दक्षिणायनाच्या अखेरीस सूर्य उत्तरेकडे वळतो म्हणून यूलचा अर्थ डिसेंबर झाला असावा; पण डिसेंबर आणि चक्र यांच्या संबंधाची ही कल्पना खोटी आहे. उत्पत्ति-दृष्ट्या पाहतां यूल आणि ह्वॉल यांचें वर्णसाम्य ' अशक्य ' दिसतें. " उदगयनापासून सुरुवात केली म्हणजे दक्षिणायनाच्या अखेरीस संवत्सर-चक्राचा एक फेरा संपून दुसऱ्याला सुरुवात होते. अर्थात् यूल शब्दाचा चक्र हा अर्थ बरोबर ठरतो. कोशकाराला प्राचीन जर्मन लोकांच्या वर्षारंभाची माहिती नाहीं म्हणून त्याचा अभिप्राय चुकला आहे. कोशकारानें यूल शब्दाचा दुसरा अर्थ दारूबाजांची ओरड ( Noise of revelry ) असा देऊन तो

अर्थही लटका ( untenable ) असें म्हटलें आहे. यूलच्या उत्सवाचा खरा महिमा माहीत नसल्यामुळें हा अभिप्रायही चुकला आहे. यूल शब्दाचें 'दिन' शब्दाशीं अर्थाच्या दृष्टीनें अतिशय साम्य आहे. दिन हें एका महिन्याचें नांव होतें. त्या महिन्यांतील सणांत होणाऱ्या ओरडीवरून दिन शब्दाला ओरड असा अर्थ लाभला, तसाच यूलच्या उत्सवांतील आरोळ्यांनीं यूल शब्द ओरड वाचक करून सोडला.

" या उत्सवांत फ्रीयेच्या ( अग्नीच्या ) नांवानें डुकरांचे बळी देत असत. याच सणांत मिसलटो ( Misletoe ) नामक वेलीच्या मंडपाखालीं वाटेल त्या तरुणीचें चुंबन घेण्याचा प्रघात होता. या सणांत भारी दांडगाई चालत असे ( Pioneer, December 25. 1905 ). थॉर देवाप्रीत्यर्थ मोठाल्या होळ्या पेटवीत असत. ( Scandeinavian oncestors ... at their feast of Juul at the winter solstice used to kindle huge bonfires in honour of their god Thor" Century Dictionary. ) असल्या दांडगाईच्या सणांत त्या वेळचे लोक खूप दारू पिऊन ओरडत असत. याविषयीं कांहींच शंका नको. यूल शब्दाचा ओरड हा अर्थ या सणाच्या प्रसंगाचा आणि त्यांतील अन्य आचारांचा विचार करतां त्या कालाला उचित आहे. थॉर हा जर्मन लोकांचा बाखस दिसतो. म्हणूनच बाखसच्या उत्सवाचीं बहुतेक लक्षणें थॉरच्या उत्सवांत आहेत " ( शिमगा पान ४२ ).

वरील उताऱ्यांत यूल शब्दाचा ओरड हाही एक अर्थ असल्याचें सांगितलें आहे. आपण 'शिमग्या' चासुद्धां असा उपयोग करतोंच.

इतकें विस्तारपूर्वक आणि थोडें विषयांतर वाटणारें हें विवेचन करण्यांत माझा असा उद्देश आहे कीं, 'दिन' ही गर्जना प्राचीन सहा महिन्यांच्या दीर्घरात्रीनंतर उदयास येणाऱ्या सूर्याच्या स्वागताप्रीत्यर्थ होणाऱ्या आनंदाचें द्योतक आहे. हें श्री. कर्वे यांनीं आपल्या शिमग्यावरील निबंधांत जें प्रतिपादन केलें आहे तीच 'दीन' 'दीन' ही गर्जना आज कांहीं हिंदू भगतांच्या तोंडीं आढळते, व तिचेंही मूळ या उत्तरध्रुव प्रदेशाशीं निगडीत आहे, हें स्पष्ट व्हावें.

# ७ उखडला देव

खानदेशांतील लग्नविधि मोठा वैशिष्ट्यपूर्ण आहे. डॉ. केतकरांनीं आपल्या महाराष्ट्राच्या इतिहासांत श्रीमाळी ब्राह्मणांच्या लग्नपद्धतीबद्दल लिहितांना त्यांतील प्रत्येक विधीबद्दल बायका गाणीं म्हणतात व लग्न आटोपतें. ब्राह्मणांच्या मंत्रांपेक्षां बायकांच्या गाण्यांचेंच त्यांत जास्त प्रस्थ असतें असें दाखविलें आहे. जवळ जवळ तीच गोष्ट खानदेशांतील ब्राह्मणेतरांच्या लग्नांनाही लागू पडते.

त्यांना ब्राह्मण लागत असला तर तो फक्त गणपती, कलश, हातोळा लावणें ( इतरत्र याचा खुलासा केला आहे ), कन्यादान वगैरे गोष्टींत; परंतु याही पलीकडे त्यांत ज्या कांहीं चाली आहेत, त्यांत ब्राह्मणांवांचून कांहीं अडत नाहीं, आणि अशा ब्राह्मणांवांचून न अडणाऱ्या गोष्टी बऱ्याच आहेत.

## ( १ ) देवतऽ

( अहिराणी भाषेचें यथार्थ वाचन सांप्रत प्रचलित असणाऱ्या देवनागरी लिपींत होणें एक दोन बाबतींत अशक्य आहे. त्यांतील एक महत्त्वाची बाब म्हणजे पुष्कळशीं नपुंसकलिंगी अकारांत नामें व सर्वनामें शेवटचा अ दीर्घ म्हणून वाचावयाचीं असतात. तोच नियम भूतकाळीं अकारांत क्रियापदांना लागतो. वरचा ' देवतऽ ' हा शब्द वाचतांना त्याच्या शेवटील त हा वर्ण मराठी गाणें म्हणणें वगैरे एकारांत शब्द आपण बोलण्यांत अकारांत करतों व त्यांचा अनुस्वार कायम ठेवतों. अर्थात् वाचतांना गाणं, म्हणणं, यांत शेवटच्या वर्णावर जोर देतों ( accent ), म्हणजे तुलनात्मक दृष्टीनें मागील वर्णापेक्षां शेवटचा वर्ण दीर्घच करतों. तसें करण्याला त्यावरील अनुस्वारामुळें सूचकताच मिळते. परंतु अहिराणींत नपुंसकलिंगी नामें एकारांत नाहींत, तर मूळचीं अकारांतच आहेत. आणि त्यांचा असा शेवटल्या वर्णावरील जोर हा ती भाषा न ऐकलेल्याच्या ध्यानीं कधींही येणें शक्य नाहीं. उपरोक्त देवत हा शब्द देवतऽ असा वाचावयास पाहिजे, तेव्हां याचा यथार्थ उच्चार होईल. )

ब्राह्मणांत देवदेवक बसतें. त्याप्रमाणें त्यांच्यांत देवतऽ आणण्याची चाल आहे. या देवाण्यासाठीं चार पांच पुरुष मंडळी, दोन चार बायका व वाजंत्री असे निघतात. जातांना एक शाल किंवा उपरणें, चार माणसें चार टोकें धरतात. त्या घरांतील एक विवाहित आणि वधु विद्यमान असणारा पुरुष त्या उपरण्याच्या मध्यबिंदूला काठीनें उंच धरून तंबू केल्यासारखा चालतो. हातांत पूजेचें साहित्य घेऊन मागून त्याची विवाहित पत्नी त्याच्या उपरण्याच्या पदराला तिच्या लुगड्याच्या पदराची गांठ बांधलेली अशी

चालते. पुढें वाजंत्री व बरोबर इतर एकाददुसरा माणूस, पोरेंसोरें अशी ही मिरवणूक गांवांतील कुठल्याही एकाद्या देवळाकडे जाते. तेथें जाऊन देवापुढें पानाचा विडा ठेवून तेथून त्या पूजेच्या साहित्यानें देवाची पूजा करून त्याच ताम्हनांत घरांतले पूजेचे देव व शमीच्या आणि बोरीच्या काड्या घेऊन येतात. हें देवतऽ जाण्याच्या पूर्वीं तेथें या वस्तू आणून ठेवतात. परत येतांनाही वाजत तशाच थाटांत येतात.

जेव्हां एका कुटुंबांतून विभक्तपणामुळें दुसरें कुटुंब निर्माण होतें, त्या नव्या कुटुंबाला कोणतेंही शुभ कार्य विशेषतः विवाहाचें, करावयाच्या आधीं नवे देव बनवावे लागतात. त्यांत एक गणपती, दुसरी एकादी देवी, तिसरा खंडोबा असला तर त्याचे दोन टाक असा चार किंवा अधिक टाकाचा एक सटच करावा लागतो. तो सोनाराच्या घरून आणतांना अशीच मिरवणूक न्यावी लागते. मात्र तेथें बोर व शमीच्या काड्या लागत नाहींत. रणादेवीच्या किंवा प्रत्येक विवाहाच्या पूर्वीं कुंभाराकडून जीं भांडीं आणतात त्यावेळींही अशीच मिरवणूक निघते.

या देवताच्या चालींतील बोरीच्या आणि शमीच्या काड्यांचें वैशिष्टय, लोकांना एक प्राचीन चाल या पलीकडे माहीत नाहीं, परंतु ही चाल अत्यंत पुरातन दिसते. शमी आणि बोर यांच्या घर्षणानें इतर जातींच्या लांकडांच्या मानानें फार लवकर अग्नि पडतो. शमीच्या लांकडाची होळीसाठीं निवड करतात. हें 'दीन' 'दीन' या प्रकरणांत सांगितलेंच आहे. तसेंच रणादेवी किंवा एकोताचा सैंपाक धनगर समाजांत बोरीच्या लांकडांवरच करतात, हेंही विचार करण्यासारखें आहे. खेड्यांतील सुतार जांत्याला खुंटा व माकडी बसवतांना बोरीचें किंवा शमीचें लांकूड नियमानें वापरीत नाहींत. त्याचें कारण दळतांना घर्षणानें तीं लांकडें लवकर पेट घेतात. कित्येक वेळां सुताराचीं अल्लड पोरें अशी चूक करून बसतात, आणि मग जन्मभर त्यांच्या अज्ञानाचें प्रदर्शन म्हणून ही गोष्ट सांगण्यांत येते. कधीं कधीं वात्रटपणामुळेंही अशी खुंटा माकडी बसवून देतात, परंतु या विशिष्ट जातींचीं लांकडें या कामीं वापरायाची नाहींत, ही जाणीव सर्वांस असते.

जन्मलेल्या बाळकाची पांचव्या दिवशीं सटी ( षष्टी किंवा सटवी ) पुजावी लागते. त्या सटीच्या पूजेला लागणाऱ्या सामानांत तिनें या नवीन बाळकाच्या भविष्याचा पट लिहावा म्हणून एक कोरा कागद, दऊत, लेखणी, सुपारी, हळकुंड, वेखंड व बोर आणि आर लागते. बोर म्हणजे बोरीची लहानशी फांदी व आर हा कांटेरी जातीचा एक वृक्षविशेष आहे, त्याची फांदी, हे लागतात.

या गोष्टींचा विचार केला म्हणजे ह्या विधीची प्राचीनता लक्षांत येते. विवाहांत पाकनिष्पत्ति वगैरेसाठीं लागणारा अग्नि सिद्ध करण्यासाठीं असा मिरवणुकीनें वाजत गाजत शमी व बोरीचीं लांकडें आणण्याचें काम करण्याची ही चाल किती पूर्वी पडली असेल त्याची मोजदाद करणें येथें अशक्य आहे. तथापि भारतीय आर्य आणि अग्नि यांची ओळख होऊन त्यांनीं जेव्हां त्याला देवतापदाचा मान दिला असेल, त्या प्राचीन काळाची ही चालत आलेली रूढि आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें नाहीं हें खास.

## ( २ ) पोयतऽ

नवरा मुलगा व नवरी मुलगी यांना आपापल्या घरीं हळद लागते, व हळद लावल्यावर त्यांच्या गळ्यांत पोयतऽ घालतात. पोयतऽ म्हणजे कच्च्या सुताची जानव्यापेक्षां जाड आणि लठ्ठ अशी पिवळी केलेली लडी. संस्कृत उपवीत या शब्दापासून पोयतऽ हा शब्द झालेला दिसतो. त्याची यज्ञाशीं सांगड घातली जाण्यापूर्वीं तो अस्तित्वांत होता, आणि त्याचा अर्थ फक्त पट असा होता, असा पुष्कळ विद्वानांचा अभिप्राय आहे (लो. टिळक). आजही ब्राह्मण जानवीं घालतांना एक उपवस्त्राबद्दलही घालतात.

हें पोयतऽ घालतांना बायका गाणें म्हणतात. त्यांतला प्रमुख भाग असा आहे.

' तेथें ब्रह्मदेव ताणा कातती, तेथें प्रभू ताणा काततो.
तेथून हें पोयतऽ आणलेलें आहे.
तेथें देवकापसाचीं झाडें आहेत.
विष्णु कृष्ण हे कांड्या भरतात. ' वगैरे.

## यज्ञोपवीताचा मंत्र

यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्। यज्ञोपवीताचा प्रजापतीशीं संबंध आहे. खानदेशी लोकांत हा पोयत्याचा विधि होतांना ब्राह्मण लागत नाहीं. आतां गाणें आणि मंत्र यांतील प्रजापती मूळचा कुठला, गाण्यांतला कीं मंत्रांतला, ह्या वादग्रस्त मुद्द्याचा ऊहापोह न करतां असें म्हणतां येईल कीं, मानवांनीं वस्त्राचा प्रारंभीं उपयोग विवाहप्रसंगीं केलेला दिसतो. श्रेष्ठ व्यक्ति कदाचित् सदैव वस्त्रें वापरीत असतील, परंतु प्रत्येक व्यक्तीला विवाहाच्या वेळीं वस्त्र देणें हा प्रमुख शृंगार होता. देवाच्या पूजेंतही वस्त्रें अर्पण करण्याचा उल्लेख आहे, आणि पुढें पुढें कुठल्याही मोठ्या अधिकाराचें प्रतीक म्हणून वस्त्रें देण्याची चाल पडली.

गाण्यांतील ' ताणा ' कातणारा ब्रह्मदेव हा एक कोणीतरी वृद्ध कारागीर किंवा कुशल पुढारी आरंभीं वस्त्रादि निर्माण करणारा हळू हळू सर्व जगाला उत्पन्न करण्याचें श्रेय मिळवता झाला असावा. यांवरून विवाहांतील चालींचें पुरातनत्व दिसतें.

## ( ३ ) तेलन

हा तिसरा विधिही अत्यंत अर्थपूर्ण आहे. हा विधि लग्न लागण्याच्या आधीं रात्रीं करतात. त्या वेळीं घरांतील बहुतेक सर्व स्त्रिया एकत्र जमतात, आणि एका चाळणींत दिवा ठेवून ती चाळणी ज्या वस्तूवर तेलन पाडावयाचें त्या वस्तूवर धरतात, म्हणजे एक प्रकारें आरती करतात. व्यवहारांत ' तेलन पडणें ' म्हणजे पूजा होणें असा रूड अर्थ आहे. या तेलन पाडण्यामध्यें खालील वस्तूंवर तो दिवा धरून बाया गाणीं म्हणतात. गाण्यांत त्या त्या वस्तूची स्तुति असते. ( १ ) चूल. ( २ ) तांब्याचें पाण्यानें भरलेलें भांडें चुलीवर ठेवून त्याला ' कांदील पाणी ' म्हणतात. ( ३ ) पाटा ( शिळा ). ( ४ ) दिवा. ( ५ ) घुसळ खांब. ( ६ ) दरवाज्याचा उंबरठा. ( ७ ) देव. ( ८ ) उखड्ला देव. हें तेलनाचें संपूर्ण गाणें व त्याचा सरळ मराठी अर्थ शेवटीं परिशिष्टांत दिला आहे.

यांपैकीं महत्त्वाची बाब उखड्ला देव ही आहे. यांत मूळ शब्द उखड्ला. खानदेशांत उकीरड्याला उखड्ला म्हणतात, म्हणजे लग्नामध्यें उकीरड्याची पूजा करतात असें वरतरी दिसतें. बायकाही त्यांच्या गाण्यांत " उखड्ला म्हणतो मी उखड्ला देव " या उखड्ल्यावर पुंजा ( दोन अर्थ, एक पूजा साहित्य, दुसरा केरकचरा ) कोण टाकते ? त्यावर × × × बाई पुंजा टाकते. तिनें मोठा उखड्ला केला. तो गाडीवर वाहून नेला. त्या गाडीचे बैल लाल आहेत ' असा अर्थ आहे. तसेंच उखड्ल्या देवावर तेलन पाडण्यासाठीं घराबाहेर येतात व थोडासा केरकचरा टाकून मग त्यावर दिवा धरतात. म्हणजे तेलन पाडणाऱ्या स्त्रियांचेंही या उखड्ल्याबद्दल तो घरांतील घाण गदळ कचरा टाकून तयार केलेला उकीरडाच होय हें मत दिसतें. माझ्या मतें तो उखड्ला देव म्हणजे ' उकीरडा देव ' नव्हे. खानदेशांतील लोकांत उकीरड्याची पूजा करण्याची चाल आहे, तीच भालदेव हा सण होय.

हा उकीरडा नव्हे याला पहिलें कारण कीं रात्रींच पूजा करण्याची पद्धत व त्याचे इतर जोडीदार दुसरे देव यांचा विचार करतांना इतक्या प्राचीन काळीं, जेव्हां अग्नि, दीप, शिळा वगैरेंना मनुष्य प्राणी पूज्य मानूं लागला, तितक्या पूर्वी तो उकीरड्याला पूज्य मानीत असेल असें संभवत

नाहीं. जेव्हां मनुष्यसमाज शेती नाममात्र करीत असेल किंवा नुकताच करूं लागला असेल त्या वेळीं खताचा शोध तरी लागला असेल कीं नाहीं, जर समाज भटक्या स्थितींत असेल तर जमीन निकस होऊन खत मागते हें त्याच्या लक्ष्यांतही आलें नसेल. दुसरें, त्या वेळीं लोकसंख्येची आजच्या इतकी बेसुमार वाढ होऊन जमिनी पिकामागून पिकें घेऊन निसत्त्व झाल्या असतील असेंही वाटत नाहीं. आजही पहाडांत राहणारे भील, पावरे वगैरे लोकांना खताची मुळींच दरकार नसते. त्यांच्या गाई म्हशींचें शेणखत वायांच जातें. सातपुड्यासारख्या पहाडांत आज हजारों वर्षें राहणारे भील शेती करून असतांनाही त्यांना पहाडांत खताची गरज लागत नाहीं. ती इतरांना लागून खताचा सांठा जो उकीरडा तो देवत्व पावला असावा असें वाटत नाहीं.

खानदेशांत गव्हाची पेरणी करतांना पेरण्याची पांभर मोठ्या वाज्या-गाज्यानिशीं शेतांत नेतात. नंतर गहूं पेरणें संपलें म्हणजे त्या शेतांत ' सीता ' नांवाची एक शेंदूर फासून देवी बसवतात. ऋग्वेदांत सीता ही क्षेत्ररक्षक देवता आलेली आहे ( ज्ञानकोश, वेदविद्या ). वस्तुतः या तेलनाच्या देवतांत एकादी पांभर असावयास पाहिजे होती, परंतु तीऐवजीं घुसळखांब आहे, म्हणजे समाज त्या वेळीं पशुपालनप्रधान होता.

असा या शब्दाच्या बाहेरूनच विचार करून त्याचा उकीरड्याशीं संबंध नसावा असें म्हणतां येतें. आतां प्रत्यक्ष शब्दाच्या उपपत्तीकडे वळतों. संस्कृत उत्कर यापासून उकीरडा हा मराठी शब्द झाला आहे. खानदेशांत अशा अर्थी २ शब्द आहेत. एक उखड्का आणि दुसरा उकीर. व्युत्पत्तिशास्त्रदृष्ट्या उत्कर यापासून हे दोन्ही शब्द निघूं शकतात. त्यांपैकीं उकीरतर निःसंशय त्याच शब्दापासून निघाला आहे, परंतु उखड्का हा शब्द दुसऱ्या तऱ्हेनेंही सिद्ध होऊं शकतो.

काळाच्या ओघांत शब्दावर प्रत्ययांचीं पुटें चढतात. ( Giles Philology, Noun Morphology Chapter XVI ). एकाच अर्थी दोन दोन प्रत्यय लागतात.

जसें-" धर्मोच्या करितां अम्हांसि जगतीं रामानें धाडीयलें ॥
ऐसें जाणुनि रामभक्ति करितां ऐश्वर्य हें लाधलें ॥
आतां धर्मसख्या तुझ्या पुढतिं हा नम्रत्वतेनें असे ॥
इच्छा हो जशि मानसीं करितसे हा देह तूझा असे ॥

— रामदास —

या कवितेंत नम्रत्वतेनें हा शब्द भाववाचक नामाचे त्व आणि ता या एकाच अर्थाच्या दोन प्रत्ययांचा धनी झाला आहे. बोलतांना पुष्कळशा

लोकांकडून श्रेष्ठत्वतेला धन्यत्वतेला असे शब्दप्रयोग होतात. छवकळें हा शब्द छव् + क + ळें, क आणि ळ हे दोन्ही लघुत्वदर्शक प्रत्यय मिळून झाला आहे.

पूर्वीचा प्रत्यय किंवा शब्दार्ध याचा अर्थलोप होऊन पुन्हा त्याच अर्थी प्रत्यय किंवा शब्द आपण पुष्कळ वेळां योजतों. सह्याद्रि पर्वत या पर्वतनामांत अद्रि म्हणजे पर्वत हें लोक साफ विसरतात. जेथें मराठी सारख्या ग्रांथिक वाङ्मयाची परंपरा असणाऱ्या भाषेची ही स्थिति तेथें खानदेशीची काय अवस्था असेल, तिच्यांत अशा प्रत्ययांच्या जोड्या पुष्कळच आहेत.

शिपुड्ला = शिपाई + ड् + ला
म्हसड्ल = म्हैस + ड् + ल
कुतड्ल = कुत्र + ड् + ल
उखड्ला = उखा + ड् + ला

वरच्यापैकीं कुत्रा याचें कुतडां मराठीप्रमाणें ड हा तुच्छत्वदर्शक प्रत्यय लागून रूप होतें आणि त्याच अर्थी पुन्हा 'ला' हा किंवा 'ल' हा लागतो. इंग्रजींतही लघुत्वदर्शक ला म्हणजे L आहेच (Giles). म्हैसचें म्हसड्ही होतें, आणि म्हसड्ल असेंही होतें. तसेंच उखड्या किंवा उखडी हें नांव खानदेशांत घरोघर आहे. त्यांतून ड हा प्रत्यय काढला तर उखा राहातें. हें नांवदेखील पुरुष व स्त्रियांत सरास आढळतें. उखा नांवाचे पाटील आणि उखा पाटलीण यांचा तोटा नाहीं. रामराव आणि रामबाई, शिवराव आणि शिवबाई, लोक आपल्या आवडीप्रमाणें देवतेचें लिंग बदलून टाकतात. भगतांच्या अंगांत 'अग्न्यामाय' म्हणून प्रत्यक्ष अग्नि येतो आणि तो मग विस्तवावरून चालतो. अंगांत वारें येऊन विस्तवावर चालणारे भगत खानदेशांत गांवोगांवीं आहेत.

उखा असा मूळ शब्द उखड्ला देव यांत निघूं शकतो, आणि उखा म्हणजे उषा. पूर्वी उषा देवता होती. ऋषि तिचें स्तवन करीत आणि ती सूर्योदयाचें सूचक असल्यानें त्याच्या आदरास पात्र होती. तिची महती ध्रुवप्रदेशांतच जास्त. कारण तेथें उषःकाळ कित्येक दिवसांचा. हिंदुस्तानांत उषेला असें देवत्व मिळालें असतें, असें वाटत नाहीं. तेव्हां उषेचें देवत्वाचें मूळ खरोखर उत्तरध्रुव प्रदेशांतच आहे हें पुष्कळशा विद्वानांनीं सिद्ध केलेंच आहे.

उखड्ल्या देवावर रात्रीं तेलन पाडण्यांत त्यासाठीं घराबाहेर पडण्यांत आणि त्याच्या जोडीच्या प्राचीन पूज्य कल्पनांच्या घोळक्याकडे लक्ष्य दिलें तर हा उखड्ला देव म्हणजे उषा देवताच होय असेंच म्हणावें लागतें. [अपूर्ण]

Historical Society ) होतो. या बैठकींत लखनौ पदार्थसंग्रहालयाचे क्युरेटर रायबहादुर प्रयाग दयाल यांचें व्याख्यान झालें. त्यांत त्यांनीं लखनौ म्यूझियमची वाढ कशी झाली व यांत कोणत्या मौलिक आणि दुर्मिळ वस्तु आहेत वगैरे गोष्टींचा इतिहास सांगितला.

उपरोक्त रायबहादुर हे एक आस्थेवाईक इतिहासभक्त असून त्यांनीं प्रोत्साहन देऊन संयुक्त प्रांतांतील निरनिराळ्या वीस विद्यालयांतून लहानगीं वस्तुसंग्रहालयें ( Miniature Museums ) अस्तित्वांत आणलीं व पुढेंही अशी इच्छा बाळगणारांस मदत करावयास ते तयार आहेत. तसेंच आणखी एक दोघां विद्वानांच्या साहाय्यानें त्यांनीं शाळेच्या उपयोगासाठीं Coins and Inscriptions Suitable for Schools हें एक छोटेंसें पुस्तक लिहून इतिहासशिक्षणाला उल्लेखनीय हातभार लावला आहे.

## आजच्या हिंदूजीवनांतील ध्रुववस्तीचे अवशेष

( ले. भा. रं. कुळकर्णी शिरपूर )

( वर्ष ७ अंक ११२ पृष्ठ १८० वरून ) ' उखडूला देव ' पुढें चालू

उत्तरध्रुवप्रदेशांत दीर्घ रात्रिनंतर होणाऱ्या सूर्योदयाचे वेळीं लोक होळ्या पेटवांत, व बीभत्सपणें ( आजच्या दृष्टीनें ) वागत, कारण आनंदानें बेभान होत, असें ' शिमग्यांत ' श्री. कर्वे म्हणतात. बेभान म्हणण्यापेक्षां या संधीला भरामर विवाह होत असें म्हणणें जास्त सयुक्तिक दिसतें, आतांही स्त्रीपुरुषांना जेथें परस्पर ओळख, पारख आणि निवड करण्याची मोकळीक आहे, तेथें, शिमग्यांनकी कोणती बाब गाळतात? धुळवडीचा सणही समुद्र-कांठीं जाऊन साजरा होतोच. फरक इतकाच कीं शिमग्यांतील कार्यक्रम फार घाईनें ५।६ दिवसांत सामुदायिक रितीनें आटोपावा लागतो, तर हा आधुनिक शिमगा वर्षांनुवर्षे व व्यक्तिशः चालतो.

' विवाहनक्षत्रें ' म्हणून जो एक नक्षत्रांचा विशिष्टवर्ग पडला तो व देवनक्षत्रें म्हणून हे जे वर्ग याच्या मुळाशीं हें उत्तरायण व सहा महिन्यांच्या रात्रीचेंच कारण आहे असें वाटूं लागतें. ( स्फुट प्रकरण पहा )

या उखडूल्या देवांतील उपेच्या मदतीला आणखी एक आचार या लग्नांत असतो. तो म्हणजे हळदीचा. वधुवरांना लग्नाच्या आधीं पांच, नऊ, सात, चार किंवा तीन दिवस कधीं कधीं अकरा दिवस हळद लागते. म्हणजे लग्नांतिथीच्या आधीं अकरा दिवस वधुवर आपापल्या घरीं हळद

लावून बसतात. म्हणजे उषेच्या उदयाबरोबर लग्न लावायचें हाच त्याचा अर्थ होतो. आतां उषःकालाशीं त्याचा संबंध न राहिल्यानें हळदीचे दिवस, सोय व सवडीप्रमाणें ठरवतात.

आर्यांच्या एके काळच्या एकजिनसी समाजांतून ब्राह्मण्याचा विकास होतांना कांहीं जातींत प्राचीन परंपरा ह्या कशा जीव धरून राहूं शकतात, याचें उदाहरण म्हणून श्रीमाळ्यांची विवाहपद्धति विचार करण्यासारखी आहे. ब्राह्मणांच्या प्रत्येक जातींत शास्त्राशीं विसंगत असा थोडाबहुत आचार आढळतोच. शास्त्रांनीं आदर्शजीवनाचा जीव तोडून उपदेश करण्यांत कसूर केली नाहीं. तर समाजानें प्राचीन रूढीबद्दल वाटणारा जिव्हाळा कमी होऊं न देण्याबद्दल सावधगिरी ठेविली. याचा परिणाम समाजाच्या जीवनांतच त्याच्या प्रगतीचा इतिहास सांठवला गेला.

मनुष्याच्या आयुष्यांतील मोठी महत्वाची बाब म्हणजे विवाह आहे. तिचें असें ऐतिहासिक दृष्ट्या निरीक्षण करतांना अगदीं प्राचीन इतिहास हातीं लागणें क्रमप्राप्त आहे. कै० राजवाड्यांनीं भारतीय विवाहपद्धतींतून अगदीं मति कुंठित करणारे निष्कर्ष काढून हिंदूंच्या विधींच्या अणुरेणूंतूनही कसा इतिहास भरला आहे, हें दाखविलेंच आहे. या लग्नांत पूज्य म्हणून गणला जाणारा उखड्ला देव म्हणजे उकीरडा नसून उषा आहे व ही प्रथा ध्रुव-प्रदेशावरील प्राचीनतर वस्तीचा आज आमच्या जीवनांत आढळणारा एक अवशेष आहे असें ठरविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे कोरड्या विहिरीवर मोटा चालवण्यासारखें निष्फळ आहे असें नाहीं.

## ८ कन्हान

खानदेशांत बैल तयार करतांना गोन्हा एकदम गाडीला जोडीत नाहींत. आरंभींच त्याला गाडीला जोडलें तर तो ती वाटेल तिकडे घेऊन पळेल, आणि कुठेंतरी नेऊन कलंडावून देईल ही भीति असते. यासाठीं गोन्ह्यांना शिक-विण्यासाठीं ' कन्हान ' या नांवाचें वाहन उपयोगांत आणतात.

त्याला चाकें नसतात, तर दोन लांकडाच्या दांड्याच जमिनीवर घसरत जातात, आणि गाडी चालतांना ज्या जागीं ती गुरुत्वमध्य चाकाबाहेर जाऊन कलंडून जाईल, अशा जागींही ही कन्हान न कलंडतां जाऊं शकते. चाकांमुळें जो अल्पश्रमसाध्य वेग तो या वाहनांत नसतो. यामुळें नव्या गोन्ह्यांना थोडें वजन वाढून त्यांच्या दांडगाईला आळा बसतो व आडमार्गाला गेलें तरी तत्काळ उपडें होण्याची भीति नसते.

या कन्हानीवर मुलें हौसेनें बसतात. एकाच वेळीं दोन, प्रसंगीं तीन मुलेंही बसूं शकतात. प्रस्तुत लेखक लहानपणीं पुष्कळ वेळां कन्हानीवर बसला आहे. उत्तरध्रुववस्तीच्या खुणा म्हणून मला आढळणाऱ्या अनेक गोष्टींतही ही एक त्यांपैकींच असावी, असा माझा कयास आहे, आणि साधकबाधक प्रमाणांनीं या गोष्टीचा ध्रुवप्रदेशाशीं निघूं पहाणारा संबंध मी प्रस्थापित करायचा प्रयत्न करीत आहे.

कन्हान शब्दांत उघड उघड वहान शब्दाचा अपभ्रंश हान दिसतो. इंग्रजी Van व्हॅन्, व्हान आणि नॉर्स, व्हांग हें संस्कृत वहानाचेंच रूप अर्थात् हान हें रूप होणें साहजिक आहे. आतां त्याचें पहिलें पद कर म्हणजे काय ? इंग्रजीमध्यें कर Cur म्हणजे कुत्रा, आणि कन्हान म्हणजे कुत्र्याची गाडी. हा अर्थ चांगला जुळतो. बर्फावर चालणाऱ्या गाड्या कुत्रीं ओढतात आणि त्यांना चाकें नसतात. चाकावांचूनच्या गाड्या वैदिककाळींही असाव्यात असें विधर्थी म्हणून एक वहान वेदकालीन शब्दसृष्टींत आलेलें आहे. ( ज्ञानकोश-प्र. खंड )

उंटाच्या लांबलांब, मालाची वाहातूक करणाऱ्या तांड्यालाही 'कारवान' 'कॅरॅव्हॅन्' असें म्हणतात. स्वारी करण्याच्या जनावरांनाही वहान म्हणतात, आणि तें आजच नव्हे तर फार प्राचीन काळापासून. संस्कृतांत ज्या पशूवर बसतें त्याला तिचें वाहन म्हणतात. गणपतीचें उंदीर वाहान आहे. विष्णूचें गरुड, शंकराचें नंदी. एवंच, वहन करणारें तें वहान असा अर्थ मूळचा आहे.

खानदेशांतील कन्हान सांप्रत कांहींही वहात नाहीं, किंबहुना कांहीं वहाणें हा तिचा हेतु नाहीं, तरी तिचें वहान नांव कायम आहे.

बर्फावर चाकावांचूनच्या गाड्या उपयोगांत आणण्याचें कारण चाकें असलीं तर ती गाडी पाहिजे त्यापेक्षां अधिक वेगानें जाऊन वहान हाकणाऱ्याच्या ताब्यांत रहाणार नाहीं, परंतु तेंच बर्फाऐवजीं जमिनीवर चालवलें तर फारच मंद चालेल, म्हणजे या चाकें विरहित गाड्याचा बर्फाच्या प्रदेशाशीं कसा सुलभ संबंध आहे हें दिसून येईल.

एका भाषेंतील एखाद्या दुर्बोध शब्दाच्या अर्थावर त्या भाषेंत समाधानकारक उजेड पडला नाहीं तर तिच्या वर्गांतील इतर भाषांकडे धांव घेऊन त्यावरून त्याचा उलगडा करून घेण्याचा परिपाठ आहे.

उदाहरणार्थ, लुगडें हा शब्द घ्या. मराठींत त्याचा अर्थ फक्त स्त्रियांचीं विविधरंगी किनारदार वस्त्रें होत. वस्तुतः वस्त्रांवरून स्त्रियांचीं विशिष्ट वस्त्रें असा अधिक अर्थसंकोच होण्याची पुढची पायरी गांठणारा हा शब्द मूलतः

गुजराथी असून गुजराथींत त्याचा अर्थ नुसता वस्त्र असाच आहे. पुरुषांचीं वस्त्रेंही गुजराथींत लुगडींच होत आणि मराठी लुगड्या विरहीत वावरणारे पुरुष गुजराथ्यांच्या दृष्टीनें अक्षरशः उघडेच होत.

असा विचार केला तर खानदेशींत कऱ्हान शब्दामध्यें कर म्हणजे कुत्राच असावा, असें आणखी इतर शब्दांवर युरोपीयन भाषांमुळें जो प्रकाश पडतो त्यावरून म्हणावेंसें वाटतें. खानदेशीचे आणखी कोणते असे शब्द आहेत त्यांचें विवेचन येथें अर्थातच अप्रस्तुत आहे.

काळाच्या उदरांत भाषांतील शब्दच नाहीं तर कधीं कधीं त्याचा नुसता अर्थ गडप होऊन ते एक गूढ होऊन बसतात. हें कै. राजवाड्यां-सारख्या अधिकारी विद्वानांनीं जगाच्या निदर्शनास वेळोवेळीं आणलें आहे. तेव्हां कऱ्हान यांतील कर हा शब्द सार्थ असला पाहिजे हें उघड आहे.

हिंदुस्थानच्या व इराणच्या लोकांना कुत्रा चांगला परिचित आहे. पारशी त्याला देवाचा अवतार मानतात ( आर्क्टिक होम पान २५२ ). हिंदूही त्याला निदान महाराष्ट्रांत तरी तसाच मान देतात. खंडेरावाचा व कुत्र्याचा निकट संबंध असल्यानें विटाळशीच्या विटाळाचें अन्न कुत्र्याला सहसा घालीत नाहींत. दत्तात्रेयाच्या भोंवती कुत्र्यांची गर्दी सुप्रसिद्धच आहे; परंतु हिंदूंच्या कुटुंबांत एक वेळ कुत्राही महत्त्वाची बाब होती असें राजवाड्यांच्या श्वशुर शब्दाच्या व्युत्पत्तीवरून वाटतें. श्वशुरः म्हणजे कुत्र्यांवर देखरेख करणारा. आपल्या कुटुंबांतील किंवा कुळांतील कुत्र्यांवर देखरेख करण्याचें काम कर-ण्याची पाळी जित माणसाच्या वांट्याला येई आणि त्याच्या कन्या पत्नी-पदावर आरूढ होत, तर त्याची रवानगी कुत्र्यांच्या खात्याकडे होई. ( श्वशुरः— The old man who was an adept at the dog management. संशोधक वर्ष ४ थें, अंक ४, पान १३८ ). अर्थात् एका किंवा अनेक माणसांच्या स्वतंत्र व्यवस्थेला पुरण्याइतकें कुत्र्यांचें प्रकरण तेव्हां विस्तृत असलें पाहिजे. तें तीन हेतूंनीं. ( १ ) शिकार, ( २ ) संरक्षण आणि ( ३ ) वाहन. कोणत्याही गोष्टीबद्दल पूज्यता त्या गोष्टीच्या भयानकपणावरूनच उत्पन्न झाली असें नसून अधिकांश वांटा उपयुक्ततेचा असतो. असा कुत्रा एके काळीं उपयुक्त असला पाहिजे, आणि म्हणूनच त्याचें स्मारक देवतांचा अनुचर आणि श्वशुरादि शब्दांचा जनक म्हणून आज आपणांस आढळतें.

लहान मुलें प्रथम ओळख पटूं लागणाऱ्या प्राण्यांचें नामकरण त्यांच्या तोंडून निघणाऱ्या शब्दांतच करतात. जसें म्यांव, माऊ, काव, चिऊ, कुत्रा, भो, किंवा भू असा ओळखला जातो. हीच भाषेची प्राथमिक अवस्था आजच्या विस्तृत आणि संस्कृत व प्रगल्भ भाषेंतही असे.

'नाद सिद्ध' शब्द बरेच आहेत. उदाहरणार्थ घंटा, डमरू, झांज, धडपड, खडखडाट, टिटवी परंतु प्राचीन परंपरा कुत्र्याच्या आवाजाला भो पेक्षां गुरंऽऽ नेंच अधिक ओळखते.

'श्वानवत् गुरुंरायते' व्यवहारांत गुरगुरतो हें क्रियापद त्याच अर्थी आहे. आतां या गुरचा आणि इंग्रजी कर Curr चा संबंध जोडतां येऊं शकतो आणि त्यांतील दुहेरी र मुळेंतर मराठी गुरंऽऽ मधील 'र' नें बाहुल्याचा स्पष्ट अर्थबोध होतो. ग बद्दल क हा सर्वत्रच आढळतो. मराठी व खानदेशी गाय, संस्कृत गो याचें इंग्रजी काव ( Cow ) शीं एकजातीयत्वाचें नातें आहे, परंतु इकडे गुरगुरणें या क्रियापदा पलीकडे तो शब्द अन्य स्वरूपांत राहिला नाहीं. इंग्रजींत नाम म्हणूनही आहे. (Cur:—(1) A mongrel or inferior dog (2) A worth less snarling fellow. (3) Curr:— To make mormuring sound as of doves, owls, cats etc. ( Websters collegiate Dic. ).

तेव्हां कन्हान यांतील हान शब्द त्याचें इंग्रजी Van व्हॅन व संस्कृत वहानशीं जुळणारें गोत्र, कॅरव्हान सारख्या पर्शियन शब्दांत निघणारा वहातुकीचा अर्थ, यांच्या जोडीला, त्या वहानाच्या गतीचा अनुभव आणि त्याचा संभ्रत होणारा उपयोग हें लक्षांत घेतलें तर एके काळीं बर्फावर चालणारेंच तें वहान असावें आणि त्याचा कुत्र्यांकडून ओढल्या जाणाऱ्या गाड्यां प्रमाणें उपयोग होत असावा असें वाटतें. ही एकटी एकच कल्पना या बर्फमय प्रदेशांतील मुळाला जोडूं पहाणारी असती तर तिची इतकी बारीक चिकित्सा करून हा निष्कर्ष काढण्याच्या खटाटोपांत पडण्यांत स्वारस्य नव्हतें; परंतु पूर्वींच्या प्रकरणांतील गोष्टींवरून जेव्हां उत्तरध्रुवप्रदेश निश्चित आणि निर्विवादपणें दृग्गोचर होऊं लागतो, तेव्हां ढघड ढघड साम्य दिसणाऱ्या व विचारा अंतीं त्या साम्याला कारणपरंपरा आणि साम्य आढळत असल्यानें या गोष्टीचाही अंतर्भाव या ध्रुवप्रदेशांतील वास्तव्याच्या खाणाखुणांत करावासा वाटतो.

अहमदनगरसारख्या दुष्काळग्रस्त भागांतील लोक दूरदेशीं जातात. व पुन्हां असा दोन पैसे मिळाले कीं पटकन परत येतात. परदेशांतच राहून स्थायी होण्याला सहसा इच्छा होत नाहीं. जेव्हां पराकाष्ठेच्या आपत्ति किंवा विपत्तीमुळें माणूस हताश होतो तेव्हांच मातृभूमीचा त्याचा लोभ सुटतो. असेंच या उत्तरध्रुववासी आर्य जनांचें झालें असलें पाहिजे. त्यांच्याकडून दिवसेंदिवस बर्फाच्या वाढत्या जोराला त्यांनीं देववेल तेवढें तोंड देण्याचा प्रयत्न केल्याचा दाखलाच पंचक व कन्हान होत असें म्हणावेंसें वाटतें.

# परिशिष्ट १ लें

## १ तेलनाचें गाणें ( अहिराणी भाषेंत )

### १ चुल्हा देव ( चूल देवता )

चुल्हा म्हने मी चुल्हा देव । चुल्हा चंदन कपाटे
आन शीजे सवाखंडी । लोक जेवथीन लाखोपती
ह्या आननी कीर्ति मोठी । आखंड लागथीन तुपन्या धारी
नवरदेवना बाप दुनयादारी । च्यारी पंक्ती दिन्ह्यात दारी

### २ घुसळाना खांब ( घुसळ खांब )

धारन म्हने मी धारन देव । खांदे घातिल्या कुन्हाडी
गेला डोंगर परवती । धारन तोडीला निवाडी
धारन गाडी बैले आना । धारन नाड्यानें गुंफीला
धारन शेल्यानें झाकीला । धारन घुसळे व कोन
धारन घुसळे × ×[1] × बाई । तुटा तुटा रही दोर
लावा लावा मोती सर ॥

### ३ उखडला देव ( उखळ देव )

उखडला म्हने मी उखडला देव । उखडले पुंजा कोन टाके
उखडले पुंजा × ×[1] × बाई टाके । हातीं सोनाना खरोटा
झाडी उनी च्यारी वट्टा । इनी उखडला क्या व मोठा.

—×—

तेलनाच्या गाण्यापैकीं वर तीन नमुन्या दाखल दिलीं आहेत. त्यांचा भावार्थ—

( १ ) चूल म्हणतो मी चूल देव. चूल चंदनाच्या कपाटांत आहे. अन्न सव्वा खंडी शिजतें. लाखो लोक जेवतील. या अन्नाची कीर्ति फार मोठी आहे. नेहमीं तुपाच्या धारा लागतील. नवऱ्या मुलाचा बाप जगांत नांवाजेल त्यानें आपल्या दारशीं चार पंक्ति दिल्या.

( २ ) धारण म्हणतो मी धारण देव. खांद्यावर कुन्हाडी घातल्या. डोंगर, पर्वतावर गेला, निवडून धारण तोडला. तो गाडीबैलानें आणला. त्याला नाड्यानें गुंफून शेल्यानें झाकलें. धारणाजवळ कोण घुसळते. धारणाजवळ × × × बाई घुसळतें. रवीचा दोर तुटला. मोत्यांचा सर लावा.

---

१ नवऱ्या मुलाकडील किंवा मुलीकडील बाईचें नांव घालून.

( १ ) उखड्ला म्हणतो मी उखडका देव. उखडले कचरा कोण टाकते उखडल्यावर केर × × × बाई टाकते. हातांत सोन्याचा खराटा आहे. ती चारही ओटे झाडून आली. हिनें उखडला मोठा केला.

टीप:—मी मागील ' उखडला देव ' या प्रकरणांत यांत उषा आहे असें प्रतिपादन केलें आहे त्याला अनुलक्षून वरच्या गाण्याचा अलंकारिक अर्थ असा होईल.

' उषा म्हणते मी देव आहें. उषेवर पूजा ( अहिराणींत ' पुंजा ' ) कोण घालते. उषेवर पूजा × × × बाई घालते. तिच्या हातांत सोन्याचा खराटा ( पिवळा प्रकाश ) आहे आणि ती चारही ओटे ( दिशा ) झाडून ( उजळवून ) आली आणि उषा मोठी केली. '

## २ कानबाईचें गाणें ( सहा महिन्यांच्या रात्रीचें प्रकरण )

काळी घागर मोहरनी ते उपर आया गुंजा व ।
हुगाड कानबाई दार आहूर सामी उना तुन्हा व
' सव महिनानी रात व्हती ग्या व्हता कोठे व ' ।
' वाणीयाच्या दुकानी मी बसनु व्हतू तठे व
नारळच्या गोनी मी ते लई उनु दोनी व '.

### अर्थ

काळें आकाश पीतवर्ण दिसूं लागलें असून त्यावर किंचित् गुंजा (तांबडा) रंग आला आहे. कानबाई बाहे तुझा स्वामी आला आहे दार उघड. कानबाई म्हणते ' सहा महिन्यांची रात्र झाली तुम्ही कुठें गेला होता ? तिचा स्वामी म्हणतो ' मी वाण्याच्या दुकानावर बसलों होतों. दोन नारळांच्या गोणी आणल्या आहेत.'

टीप:—या गाण्यांत फक्त नारळाच्या ऐवजीं सुपारी, खारीक, खजूर असा बदल करून सर्व गाणें जसेंच्या तसें निदान दहा बारा वेळां तरी पुनः पुन्हा म्हणतात.

# परिशिष्ट २ रें

प्रकरण १ रें उठदेव सांवळा इ. च्या पुष्ट्यर्थ एकादशी महात्म्यांतील कांहीं श्लोक खालीं देतों.

इयमेकादशी ( आषाढ शु. ) राजन् शयनी त्यभिधीयते ॥ अ. १७
कर्कराशी गते सूर्ये शुचौ शुक्ले नु पक्षके ।

एकादश्यांजगन्नाथं स्वापयेन्मधुसूदनम् ॥ ५ ॥
तूलाराशिस्थिते तस्मिन् पुनरुत्थापयेद्धरीम् ॥

× × ×

सुप्तेत्वयि जगन्नाथे जगत्सुप्तं चराचरम्
विबुध्येत्वयि बुध्येत जगत्सर्वंचराचरम् ॥ अ. १७
अस्यां ( भाद्रपद शु. ११ ला ) प्रसुप्तो भगवानेत्यंग परिवर्तनम्
तस्मादेनां जनाः सर्वे वदंति परिवर्तिनीम् ॥ अ. २१

उपरोक्त श्लोकांतून देव आषाढ शु. ११ ला निजतो व कार्तिकीला उठतो व या चार महिन्यांत सारखा एकाच कुशीवर निजत नाहीं तर मध्यें भाद्रपद शु. ११ ला आपलें अंग बदलतो म्हणजे एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर होतो. वरें देव निजला म्हणजे सर्व जग निजतें व तो उठला म्हणजे सर्व जग उठतें. याचा सरळ उघड अर्थ असा कीं हा हरी म्हणजे नारायण जो पाण्यांत राहतो ( श्लोक १५ अ. १६ ) तो सूर्यच आहे. त्याच्या शयनाचा म्हणजे अस्ताचा काल म्हणजे शयनी. उदयाचा दिवस प्रबोधिनी व त्याची दक्षिणेकडील गति संपून उत्तरेस वळण्याचा या दोन्ही एकादश्यांतील दिवस म्हणजे परिवर्तिनी एकादशी होय. अर्थात् एके काळीं आज आपण मकर-संक्रांतीला पाहतों ती सूर्यस्थिति भाद्रपद शु. ११ च्या वेळीं अनुभवाला येत असावी व हे शयनी प्रबोधिनी एकादशीचा समारंभ करणारे आपले पूर्वज ४ महिन्यांच्या रात्रीच्या कक्षेत रहात असावे असें निःसंशय निष्पन्न होतें. निर्णयसिंधुकारांनीं नारदस्मृतीच्या नांवें अनध्यायांत खालील श्लोक जमा केलेला आहे. तोही हेंच दर्शवितो.

" अयने विषुवेचैव शयने बोधने हरेः
अनाध्यायस्तु कर्तव्यो मन्वादिषु युगादिषु "

# परिशिष्ट ३ रें

## अलाहाबाद इतिहास परिषदेंत झालेली चर्चा

प्रस्तुत पुस्तकापैकीं पंचक व सहा महिन्यांची रात्र या प्रकरणांतील संक्षेपतः माहिती घेऊन एक इंग्रजी निबंध अलाहाबाद परिषदेंत वाचला. त्यावर तेथें थोडीशी चर्चा झाली. प्रो. आळतेकर यांनीं ( १ ) हिंदूंच्या व्रतवैकल्यांचे ग्रंथ ६।७ शतकांत लिहिले गेले ( २ ) पंचक नक्षत्रांत शिशिर संपात होता काय ? ( ३ ) विवाहनक्षत्रें वगैरे नक्षत्रांचे जे प्रकार आहेत त्यांचाही संबंध उत्तर ध्रुवाशीं जोडावा लागेल. अशा प्रकारें टीका केली. त्यावर माझें उत्तर जें तेथें होतें व आतांही आहे तें असें:—

( १ ) व्रतें संग्रहित करणाऱ्या ग्रंथोत्पत्तीचा काळ म्हणजेच व्रतोत्पत्तीचा काळ हा नियम नाहीं. व्रतें त्यापूर्वी प्रदीर्घ काळपर्यंत प्रचारांत असूं शकतात. असतात.

( २ ) संपातचलनाबद्दल संशय नाहीं. तेव्हां तो पंचक नक्षत्रांत एके काळींच काय पण अनेक वेळां येऊन गेला आहे. परंतु मानवांच्या जिवंत स्मृतींत तो किती वेळां आला असेल हा प्रश्न आहे. वेदकालनिर्णयाच्या प्रश्नांत याचें उत्तर आहे.

( ३ ) विवाह नक्षत्रें, अंध नक्षत्रें वगैरे कल्पना मूळच्या ध्रुव प्रदेशोद्भूत असाव्या असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे आणि भारतीय फलज्योतिषांत असे ध्रुव वस्तीचे धागेदोरे अवशेष रूपानें राहिले आहेत असें सिद्ध करण्याच्या प्रयत्नांत मी आहें. माझ्या प्रयत्नांचें मूर्त स्वरूप एका लहानशा पुस्तकाचे रूपानें वाचकांना लवकरच सादर करण्याचें आश्वासन देतों.

आमच्या प्राचीन भारतविभागाच्या निबंधाचे अध्यक्ष डॉ. दि. बा. कृष्णस्वामी आयंगार यांनीं ( १ ) कानबाईचा सण उच्चवर्णी हिंदूंत आहे काय? ( २ ) पंचकांत अंत्यविधि लांबणीवर टाकण्याची स्पष्ट आज्ञा आहे काय ? असे प्रश्न विचारले होते. त्यांस अस्ति उत्तर आहे हें या पुस्तकावरून कळून येईलच. इतर प्रश्न कांहीं महत्वाचे नव्हते.